सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, ६ मार्च २०२६ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक ९८ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**विनम्र अभिवादन**



छत्रपती शिवाजी महाराज यांची आज तिथीनुसार जयंती

# महाराष्ट्राची आर्थिक घोडदौड कायम

◆ **मुंबई, ५ मार्च**


राज्याची अर्थव्यवस्था देशातील सर्वात मजबूत आणि गतिशील अर्थव्यवस्थांपैकी एक असून चालू आर्थिक वर्षात ती ७.९ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६ या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील संतुलित वाढ, पायाभूत सुविधांमधील मोठी गुंतवणूक आणि व्यवसाय सुलभतेसाठी केलेल्या सुधारणा यामुळे राज्याची आर्थिक स्पर्धात्मकता अधिक बळकट झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.

महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२५-२६ अहवाल विधानसभेत वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांनी तर विधानपरिषदेत राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सादर केला.

आर्थिक पाहणी अहवालानुसार २०२५-२६ मध्ये राज्याचे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ५१,००,५९७ कोटी रुपये इतके अपेक्षित आहे, तर वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न २८,८२,६९९ कोटी रुपये इतके राहण्याचा अंदाज आहे. तसेच राज्याचे दरडोई उत्पन्न ३,४७,९०३ रुपये इतके अपेक्षित असून ते अखिल भारताच्या दरडोई उत्पन्नाच्या (२,१९,५७५ रुपये) तुलनेत लक्षणीय अधिक आहे. पहिल्या सुधारित अंदाजानुसार २०२४-२५ मध्ये देशाच्या सांकेतिक स्थूल देशांतर्गत उत्पन्नात महाराष्ट्राचा वाटा १४ टक्के असून तो देशातील सर्वाधिक आहे.

**चलनवाढ नियंत्रणात**

एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत ग्रामीण भागातील सरासरी ग्राहक किंमत निर्देशांक ४०१.८ तर नागरी भागातील ३७६.७ होता. या कालावधीत ग्रामीण भागात २.० टक्के आणि नागरी भागात १.५ टक्के चलनवाढ नोंदविण्यात आली. जीवनावश्यक वस्तूंवरील जीएसटी दरातील सुधारणांमुळे किमतींवर सकारात्मक परिणाम झाल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे.




**सन २०२५-२६ मध्ये विविध क्षेत्रांत वाढ अपेक्षित आहे. यामध्ये कृषी व संलग्न कार्ये यात ३.४ टक्के वाढ अपेक्षित आहे तर उद्योग क्षेत्रात ५.७ टक्के आणि सेवा क्षेत्रात ९.० टक्के वाढ अपेक्षित असून सेवा क्षेत्रातील वेगवान वाढ राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा आधार देत असल्याचे अहवालात स्पष्ट केले आहे.**

**सामाजिक क्षेत्र**

सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही राज्याने प्रगती केली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत नागरी भागात ८.७५ लाख आणि ग्रामीण भागात १६.०५ लाख घरे पूर्ण झाली आहेत. जल जीवन अभियानामुळे ९० टक्क्यांहून अधिक कुटुंबांना नळजोडणी उपलब्ध झाली आहे.

**शेतकऱ्यांना मोठी मदत**



**राज्यातील शेतकऱ्यांना अवकाळी पाऊस व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीपोटी ११६.४० लाख शेतकऱ्यांना ९४.८२ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ९,०२२.३८ कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली. सौर कृषी पंप योजनेंतर्गत माहे डिसेंबर २०२५ अखेर राज्यात ७.३७ लाख सौर पंप बसविण्यात आले आहेत.**

**ऊर्जा आणि पायाभूत सुविधा**



**३१ मार्च २०२५ रोजी राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता ४१,०१९ मेगावॅट होती. नवीकरणीय ऊर्जेची क्षमता वाढत असून राज्य देशात तिसऱ्या क्रमांकावर आहे. सौर ऊर्जेच्या क्षमतेत गेल्या काही वर्षांत मोठी वाढ झाली आहे.**

**उद्योग आणि गुंतवणुकीत आघाडी**

महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ अंतर्गत राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यावर भर देण्यात आला आहे. डिसेंबर २०२५ पर्यंत ६३.८५ लाख सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांची नोंदणी झाली असून त्यातून २.५२ कोटींहून अधिक रोजगार निर्माण झाले आहेत.

*(तभा वृत्तसेवा)*

## 'धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६'ला मंजुरी

◆ **मुंबई, ५ मार्च**


राज्यात धर्मांतर आणि 'लव्ह जिहाद' रोखण्यासाठी कठोर कायदा करण्याच्या दिशेने राज्य सरकारने पाऊल टाकले आहे. 'धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६' या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मंजुरी दिल्याची माहिती मंत्री नितेश राणे यांनी दिली.

महाराष्ट्रात धर्मांतरविरोधी कायदा लागू करण्याच्या दिशेने राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला असून 'धर्म स्वातंत्र्य अधिनियम २०२६' या कायद्याला मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्याची माहिती समोर आली आहे. या निर्णयामुळे राज्यात बळजबरीने किंवा फसवणुकीच्या माध्यमातून होणाऱ्या धर्मांतरांवर आळा बसेल, असा दावा राणे यांनी केला.

विधानसभा निवडणुकीच्या वेळी राज्यात सक्षम धर्मांतरविरोधी कायदा करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार आता हा कायदा मंत्रिमंडळातून मंजूर झाल्याने हिंदुत्ववादी विचारांच्या सरकारने दिलेला शब्द पूर्ण केला असल्याचे राणे यावेळी म्हणाले. या कायद्याच्या माध्यमातून फसवणूक, दबाव किंवा खोट्या ओळखीच्या आधारे होणारे धर्मांतर रोखण्याचा उद्देश आहे. अशा प्रकारच्या घटनांमध्ये सहभागी असणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची तरतूद या कायद्यात असणार असल्याचेही ते म्हणाले. राज्यातील समाजात सुरक्षितता आणि कायद्याचे राज्य टिकवण्यासाठी हा कायदा महत्त्वाचा ठरेल.

*(तभा वृत्तसेवा)*

**विचारपुष्प**




जि ज्याप्रमाणे हिंदू आचार-विचारांत दोष-दुर्बलता यांचा शिरकाव झाला आहे. तसेच प्राचीन काळापासून काही उन्नत आदर्शांचा आविर्भावही होत आला आहे. आपल्या त्रुटी, आपले दोष, आपल्यालाच नाहीसे करावे लागतील, हे खरे आहे.

**- हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

**महत्त्वाचे**

**जागतिक तेजीमुळे शेअर बाजार उसळला**

**मुंबई** : जागतिक तेजीच्या बळावर देशातील शेअर बाजारांनी पुन्हा गुरुवारी उसळी घेत जवळपास एक टक्क्यांची उंची गाठून बंद झाला.



चार सत्रांपासून सुरू असलेली घसरण थांबल्यानंतर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ८९९ अंकांनी उसळून ८०,०१५ या पातळीवर बंद झाला. दिवसभराच्या सत्रात त्याने १,१८७ अंकांची उंची गाठली होती. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २८५ अंकांनी उसळून २४,७६५ या पातळीवर बंद झाला. मुंबई शेअर बाजारातील अदानी पोर्ट्स, एल ॲण्ड टी, एनटीपीसी, रिलायन्स इंडस्ट्रीज, भारत इलेक्ट्रॉनिक्स आणि इंटर ग्लोब एव्हिएशनला आज सर्वाधिक फायदा झाला. दुसरीकडे, टेक महिंद्रा, एचसीएल टेक, हिंदुस्तान युनिलिव्हर आणि आयसीआयसीआय बँकेला मोठे नुकसान झाले.

# राज्यसभेच्या सातही जागा बिनविरोध

## भाजपा-शिवसेना-राकाँकडून नवीन चेहऱ्यांना संधी



◆ **मुंबई, ५ मार्च**

राज्यसभेच्या सात जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली होती. गुरुवारी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सात जागांसाठी केवळ सात अर्ज दाखल झाल्याने ही निवडणूक बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता निवडणूक अधिकाऱ्यांकडून केवळ औपचारिक घोषणा बाकी आहे.

राज्यातील विधानसभा संख्याबळ लक्षात घेता भाजपला चार, राष्ट्रवादी काँग्रेसला एक, शिवसेनेला एक आणि महाविकास आघाडीच्या तिन्ही पक्षांना मिळून एक जागा जाणे अपेक्षित होते. त्यानुसार महायुतीने आपल्या संख्याबळाच्या जोरावर सहा जागांवर उमेदवार दिले आहेत. भाजपाने चार जागांवर उमेदवार देत काही नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे. तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून पार्थ पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून ज्योती वाघमारे यांना अनपेक्षितपणे संधी मिळाली असून, महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सात जागांवर सातच अर्ज आल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली आहे.

भाजपाने आपल्या चार जागांसाठी विनोद तावडे, केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्यासह माया इवनाते आणि रामराव वडकुते या दोन नव्या चेहऱ्यांना संधी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसकडून पार्थ पवार यांनी राज्यसभेसाठी अर्ज भरला असून हा निर्णय पक्षातील पुढील पिढीला राष्ट्रीय राजकारणात स्थान देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून ज्योती वाघमारे यांना उमेदवारी देत पक्षाने सर्वांनाच धक्का दिला. गजानन कीर्तिकर, आनंद अडसूळ, संजय निरुपम आणि राहुल शेवाळे अशा दिग्गजांची नावे शर्यतीत असताना, अचानक वाघमारे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ही वाघमारे यांच्यासाठी लॉटरीच आहे.

*(तभा वृत्तसेवा)*

**उमेदवारी अर्ज घ्यायला अधिकारी घरी गेले; ऐतिहासिक घटना**

महाविकास आघाडीकडून शरद पवार यांना राज्यसभेसाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली. प्रकृती अस्वस्थ असल्याने ते स्वतः अर्ज दाखल करण्यासाठी उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण केली. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अशी घटना पहिल्यांदाच घडल्याची नोंद केली जात आहे.

## भारत, चीनसाठी होर्मुझचा जलमार्ग खुला

◆ **तेहरान, ५ मार्च**

मध्य आशियातील युद्धाचा वणवा आता समुद्रापर्यंत पोहोचला आहे. जागतिक व्यापारासाठी अतिशय महत्त्वाचा असलेला सागरी मार्ग होर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणने ताबा मिळवत, तेल टँकर, लष्करी, नौदल आणि व्यापारी जहाजांना बंदी घालण्यात आली होती. पर्यायाने या मार्गावरील वाहतूक ठप्प झाल्याने आशियाई देशांना कच्च्या तेलाची आयात करणे कठीण झाले होते. अशातच इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने भारत, चीन आणि इतर आशियाई देशांसाठी होर्मुझचा जलमार्ग खुला करण्याची घोषणा केली. इस्रायल, युरोपियन देश आणि अमेरिकेसह त्यांच्या मित्र देशांच्या जहाजांना होर्मुजच्या सामुद्रधुनीतून प्रवेश मिळणार नसल्याचे इराणने स्पष्ट केले.

*(वृत्तसंस्था)*



श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात तरुण भारत, पुणेचा पहिला अंक श्री नरकेसरी प्रकाशन लि. (नागपूर)चे व्यवस्थापकीय संचालक धनंजय बापट यांनी अर्पण केला. यावेळी 'तरुण भारत'च्या पुणे आवृत्तीचे निवासी संपादक सचिन कापसे, सहयोगी संपादक विजय लाड, महाव्यवस्थापक (जाहिरात) अशोक शिंदे, उपमहाव्यवस्थापक प्रसन्न देशमुख मुख्य उपसंपादक अतुल तांदळीकर, जाहिरात व्यवस्थापक परेश गुल्हाने, नरेश राऊळ, पंकज गणोरकर, ललित शेंडे, प्रवीण धावडे आणि स्थानिक बातमीदार चारूदत्त टिळेकर उपस्थित होते

# धर्मापेक्षा सुरक्षा जास्त महत्त्वाची

## मुंबई विमानतळाजवळ नमाज पठनास हायकोर्टाची मनाई

◆ **मुंबई, ५ मार्च**

रमझान दरम्यान शहरातील विमानतळाजवळील आता पाडण्यात आलेल्या तात्पुरत्या शेडच्या जागेवर नमाज पठन करू इच्छिणाऱ्या टॅक्सी आणि ऑटो-रिक्षा चालकांना कोणताही दिलासा देण्यास नकार देताना, सुरक्षा धर्मापेक्षा जास्त महत्त्वाची आहे, असे मुंबई उच्च न्यायालयाने गुरुवारी म्हटले.

रमझान हा इस्लामचा अविभाज्य भाग असला तरी, त्याचे अनुयायी पवित्र महिन्यात कोणत्याही ठिकाणी विशेषतः सुरक्षेची चिंता जास्त असलेल्या विमानतळाच्या परिसरात नमाज अदा करण्याचा धार्मिक अधिकार असल्याचा दावा करू शकत नाहीत, असे न्या. बी. पी. कोलाबावाला आणि न्या. फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठाने नमूद केले.

सावधगिरी वाऱ्यावर सोडता येणार नाही, असे न्यायालयाने विमानतळ सुरक्षेच्या पैलूंवर वारंवार भर देताना सांगितले. न्यायालयात टॅक्सी-रिक्षा ओला-उबर मेन्स युनियनने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी सुरू होती. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरातील प्रार्थना केली जायची, ते एक तात्पुरते शेड मागील वर्षी अधिकाऱ्यांनी पाडले, असा दावा याचिकेत करण्यात आला.

*(वृत्तसंस्था)*

# तीन वर्षांच्या गोजिरीचा जागतिक विक्रम

## जर्मन इंटरनॅशनल पेटंट मिळविणारी सर्वात लहान व्यक्ती

**विधी शर्मा**

◆ **नागपूर, ५ मार्च**

अवघ्या तीन वर्षांच्या गोजिरी अजिंक्य कोत्तावार हिने जर्मनीकडून मान्यताप्राप्त इंटरनॅशनल पेटंट मिळवत जागतिक विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यामुळे ती जर्मन इंटरनॅशनल पेटंट मिळवणारी जगातील सर्वात लहान व्यक्ती ठरली आहे.

१२ डिसेंबर २०२२ रोजी जन्मलेल्या गोजिरीच्या नावावर २० नोव्हेंबर २०२५ रोजी या संशोधनाला अधिकृत पेटंट मंजूर झाले. त्यानंतर या कामगिरीची नोंद ओएमजी बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये 'सर्वात तरुण आंतरराष्ट्रीय (जर्मन) पेटंट धारक' म्हणून करण्यात आली आहे.

गोजिरीच्या नावावर नोंद झालेल्या या संशोधनामध्ये विशेष प्रकारच्या उपकरणाच्या साहाय्याने विविध आकारांचे पाण्याचे (साबणाचे) फुगे तयार करता येतात. या उपकरणात विशिष्ट आकाराचा बेस तयार करण्यात आला असून त्याच्या माध्यमातून त्रिमितीय (थ्री-डी) स्वरूपातील वेगवेगळ्या आकारांचे फुगे तयार होऊ शकतात. या कल्पनेतून विज्ञानातील प्रयोगशीलतेबरोबरच नवकल्पनांना चालना मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



सध्या गोजिरी नागपूरमधील मनीषनगर परिसरातील स्मॉल वंडर प्री-स्कूलमध्ये नर्सरी वर्गात शिक्षण घेत आहे. तिचे वडील डॉ. अजिंक्य कोत्तावार हे स्वतः संशोधक असून त्यांच्या नावावर ४८ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पेटंट नोंदलेले आहेत. महाराष्ट्रातील 'फुनसूक वांगडू' म्हणून त्यांची ओळख आहे. शेती व शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांचे नाव पद्मश्री पुरस्कारासाठीही सूचविण्यात आले आहे.

डॉ. कोत्तावार यांनी यवतमाळ येथे 'ऊबुंटू' ही प्रयोगशील शाळा सुरू केली असून 'प्रयोगातून शिक्षण' ही संकल्पना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे काम ते करत आहेत. गोजिरीसोबत खेळत असताना वेगवेगळ्या आकारांचे पाण्याचे फुगे तयार करणाऱ्या उपकरणाची कल्पना सुचल्याचे डॉ. कोत्तावार यांनी सांगितले. योगायोगाने या संशोधनामुळे अवघ्या तीन वर्षांच्या वयात गोजिरी कोत्तावार हिने जागतिक स्तरावर नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत.



**तरुण पिढीने केवळ नोकरीच्या मागे न धावता संशोधन आणि नवकल्पनांद्वारे समाजासाठी आदर्श निर्माण करावा, या विचारातून हे संशोधन मी माझी मुलगी गोजिरी हिला समर्पित केले. लहानपणापासून मुलांच्या मनात प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याची आणि समजून घेण्याची उत्सुकता असते. त्यांच्या कुतूहलाला योग्य दिशा दिल्यास भविष्यात मोठी संशोधने घडू शकतात.**

**- डॉ. अजिंक्य कोत्तावार,** गोजिरीचे वडील

**गोजिरीला प्रत्येक गोष्ट अनुभवण्याची उत्सुकता आहे. तिला गाणे आणि नृत्याचीही आवड आहे. त्यामुळे शक्य तितक्या विविध उपक्रमांमध्ये आम्ही तिला सहभागी करून घेतो. तिच्या सुप्त गुणांना ओळखून भविष्यात तिला संशोधन क्षेत्रात प्रोत्साहन देण्याचा आमचा प्रयत्न राहील.**

**- प्रांजली अजिंक्य कोत्तावार,** गोजिरीची आई

# भारत फायनलमध्ये



**इंग्लंडचा बेथल लढला पण भारताने सामना जिंकला | रविवारी न्युझीलंड विरुध्द अहमदाबादमध्ये अंतिम सामना**

मुंबई : टीम इंडियाने चौथ्यांदा टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. उपांत्य सामन्यात त्यांनी इंग्लडला ७ धावांनी नमविले. संजू सॅमसन सामन्याचा मानकरी ठरला. २००७, २०१४ आणि २०२४ मध्येही भारत अंतिम फेरीत पोहोचला होता. रविवारी भारताचा सामना अहमदाबादच्या मोदी स्टेडियवर न्यूझिलंडबरोबर होईल.

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर गुरुवारी झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात इंग्लंडचा ७ धावांनी पराभव करताना टीम इंडियाची चांगलीच दमछाक झाली. शेवटच्या चेंडूपर्यंत हा सामना उत्कंठापूर्वक झाला. २५४ धावांचा पाठलाग करताना इंग्लंडला २० षटकांत ७ बाद २४६ धावाच करता आल्या. जेकब बेथेलने ४८ चेंडूंत १०५ धावांची खेळी केली. पण, तो संघाला अंतिम फेरीत पोहोचवू शकला नाही. टीम इंडियाने २० षटकांत ७ गडी गमावून २५३ धावा केल्या. सॅमसनने ८९ तर दुबेने ४३ धावा केल्या. इशानने ३९, हार्दिकने २७ आणि तिलक यांनी २१ धावांचे योगदान दिले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...




### सोशल महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास कार्यशाळेचा शुभारंभ

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

सोशल महाविद्यालयामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व सोशल महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन व नेतृत्व विकास कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. रोपट्याला पाणी घालून कार्यशाळेचा शुभारंभ करण्यात आला. उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. वडजे यांनी आपत्ती ओळखून त्यावर योग्य व तात्काळ निर्णय घेण्याची क्षमता विकसित करणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले. संवेदनशीलता व सामाजिक बांधिलकी जपत नेतृत्व स्वीकारणे आणि समस्यांचे परिणामकारक निराकरण करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आय. जे. तांबोळी होते. व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. वीरभद्र दंडे, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. जे. के. मुल्ला तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. दीपक नारायणकर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. दीपक नारायणकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रहीसा मिर्झा यांनी केले. पाहुण्यांची ओळख डॉ. वंदना भानप यांनी करून दिली, तर आभार प्रा. तबस्सुम मोमीन यांनी केले. दुपारच्या सत्रात सायबर गुन्हेगारी प्रतिबंध व बॉम्बशोधक पथकाविषयी प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. पोलीस मुख्यालयातून अविनाश पाटील, प्रवीण भोपळे, नासिर बागवान, अनंत कोकरे, सचिन आंबलगी तसेच रामपुरे उपस्थित होते. कार्यशाळेसाठी डॉ. श्रीनिवास जगताप, डॉ. अण्णासाहेब साखरे, डॉ. युवराज सुरवसे, डॉ. पाटणकर, डॉ. सिदम तसेच डॉ. अमोल शिंदे उपस्थित होते.



### नेताजी प्रशालेचे १९ विद्यार्थी एनएमएमएस परीक्षेत उत्तीर्ण

**सोलापूर, दि. ५ मार्च-**


नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस प्रशालेच्या एकोणीस विद्यार्थी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झाले. साईराज येणेगुरे, नक्षत्रा वल्लाल, समर्थ बालगावकर, तनुश्री विठ्ठलकर, वर्षा पेंडम, वासंती कोंकत्ती, लक्ष्मी मैत्री, आदर्श विठ्ठलकर, चैतन्य बनसोडे, भावेश येमूल, श्रुतिका मामड्याल, सिद्धेश धुतरगावकर, ऐश्वर्या बाबा, आकांक्षा राच्छा, अखिल परिमेला, ओंकार कोलकुंदी, सौम्या लगशेट्टी, कृष्णा कोळी, अथर्व कोल्हापुरे आदी विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.सहशिक्षक राजेंद्र मुलगे, प्रकाश कोरे, विजयालक्ष्मी माळवदकर, चंद्रकांत कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार, मुख्याध्यापक रविशंकर कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे यांन अभिनंदन केले.




### शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात मराठी व राष्ट्रीय दिवस साजरा

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

येथील शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयात मराठी राजभाषा गौरव दिन व राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कॉलेज ऑफ एज्यूकेशन, बार्शीचे डॉ. एम.एस.डिसले होते तर अध्यक्ष म्हणून अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ दीपक गुंड होते. प्रा. जे. पी. गायकवाड यांनी प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. आरती चव्हाण, प्रियंका देवराम, प्रियंका दळवी, नूतन साळुंके यांनी मनोगत व्यक्त केले. सिद्धी शिंदे हिने कुसुमाग्रज यांची कणा ही कविता सादर केली.विज्ञान दिनानिमित्त मयूर सातपुते, स्नेहा गुंड यांनी मनोगत व्यक्त केले. विज्ञान शिक्षक प्रा. ए. एस.धुमाळ यांनी विज्ञान दिनाचे महत्व व उद्देश सांगितला. समृद्धी पाटील आणि बारंगुळे यांनी सूत्रसंचालन केले. सिद्धी डोईफोडे यांनी आभार मानले.



### पुणे मुख्यालयावर शेती महामंडळाच्या कामगारांचा १७ मार्च रोजी मोर्चा

**श्रीपूर, दि. ५ मार्च-**

राज्यातील एकूण १४ शेती महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबीत मागण्यांसाठी येत्या १७ मार्च रोजी पुणे येथील मुख्यालयावर विराट मोर्चाचे कामगार नेते सुभाष कुलकर्णी यांचे नेतृत्वात आयोजन केले असून या मोर्चात मोठ्या प्रमाणावर कामगारांनी सहभागी होण्याचे आवाहन श्रीपूर येथील कामगार संघटनेचे भालचंद्र शिन्दे यांनी केले आहे. रोजंदार सेवानिवृत्त कामगारांना न्यायालय निर्णयाप्रमाणे ग्रॅच्युइटीची रक्कम मिळावी. तसेच कामगारांची थकीत देणे अद्याप मिळाली नाहीत ती तातडीने द्यावी अशा कामगारांच्या मागण्या असून मागण्या मान्य होई पर्यंत आमरण उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती दिली.त्यावेळी पुणे जिल्हा प्रमुख सागर मिसाळ, राजू पठाण, बाळू शिंगाडे, काटे, ॲड. संजय चंदनशिवे, युवराज रनवरे मिराज मुलानी आकाश पवार दादा भालेराव शफी पठाण, जाडकर, शंकर मोरे, आबा कांबळे उपस्थित होते.

# तामलवाडी ते वडगाव रस्ता गेल्या महिन्यापासून ठेवला उकरून

**वाहनधारकांचे हाल; गुत्तेदार गायब झाल्याने नागरिकांतून संताप**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी ते वडगाव काटी हा रस्ता गेल्या महिनाभरापासून उकरुन ठेऊन संबंधित गुत्तेदार गायब झाल्याने नागरीक, शेतकरी वाहनचालक यांना या रस्त्यावरून ये-जा करताना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने त्यांच्यातून संताप व्यक्त केला जात आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून वडगाव काटी या रस्त्याची दयनीय अवस्था झाली होती. येथील नागरीकांच्या सततच्या मागणीमुळे साधारणतः ७ कि.मी. च्या या रस्त्याच्या कामाला मंजुरी देण्यात आली असून, प्रत्यक्षात कामाला सुरुवात करण्यात आली. जवळपास ७ कोटी २० लाख रु. चा निधी या रस्त्यासाठी मंजूर करण्यात आल्याचे लावलेल्या फलकावरून दिसून येत आहे. सध्या वडगाव काटी ते तामलवाडीपर्यंतचा या संपूर्ण रस्त्यावरचे जुने डांबरीकरण काढण्यात आले असून, पुर्वी असलेली खडी तशीच रस्त्यावर ठेवलेली दिसते. यामुळे वडगाव काटी येथून तामलवाडी येथे कामानिमित्त, व्यवसायासाठी येणाऱ्या नागरिकांना तसेच वडगाव काटी व तामलवाडी येथील शेतकऱ्यांना शेतात ये-जा करण्यासाठी मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावर असलेल्या मोठ मोठ्या खडीमुळे दोन चाकी वाहनचालक गाडीवरुन पडल्याच्या घटना घडत आहेत तर गाड्या पंक्चर होऊन नागरीकांना या त्रासाबरोबरच आर्थिक संकटाचाही फटका बसत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

गेल्या अनेक वर्षांपासून या खड्डेमय रस्त्यावरून नागरिकांनी प्रवास केला. नवीन रस्ता तयार होत असल्याने आता प्रवास सुखकर होणार असे वाटत असताना रस्ता उकरून गुत्तेदार गायब झाल्याने पुन्हा खराब रस्त्यावरुन प्रवास करावा लागत असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देवून तामलवाडी ते वडगाव काटी या रस्त्याच्या कामाला लवकरात लवकर गती द्यावी व नागरीक, शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी होत आहे.

## ९ मार्चपासून मनपाचा महिला महोत्सव; विविध सांस्कृतिक स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोलापूर महानगरपालिका यांच्या वतीने महिला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. ९ ते ११ मार्च या कालावधीत महिला व बालकल्याण विभाग तसेच DAY-NULM यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव संपन्न होणार आहे. महानगरपालिका आवार, इंद्रभुवन परिसर, सोलापूर येथे महिला बचत गट उत्पादित वस्तू व खाद्यपदार्थांचे भव्य प्रदर्शन व विक्री मेळावा आयोजित करण्यात आला आहे. प्रदर्शना ध्ये हाताने बनवलेले आरोग्यदायी व स्वच्छ खाद्यपदार्थ, विणकाम व शिवणकामाच्या वस्तू, लाकडी कोरीव काम, अगरबत्ती, धूप, मसाले, चटण्या, पापड, ड्रेस मटेरियल, साड्या, कडक भाकरी, शेंगा पोळी, धपाटे, नाचणी-ज्वारी बिस्कीट, हेल्थ ड्रिंक पावडर उपलब्ध असणार आहेत. महिला दिनानिमित्त विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. १६ वर्षांवरील सर्व मुली व महिलांसाठी स्पर्धा खुल्या असून नावनोंदणी आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र गुगल फॉर्म लिंक उपलब्ध करून देण्यात आली असून कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क साधूनही नोंदणी करता येईल.

स्पर्धेची प्राथमिक फेरी ७ मार्च रोजी कॅम्प प्रशाला, गांधी नगर येथे होणार आहे. स्पर्धेचे बक्षीस वितरण ११ मार्च रोजी सायंकाळी ८ वाजता होणार आहे. नोंदणीसाठी ९०११३८५२०० साधावा.

**स्पर्धांचे वेळापत्रक**

वैयक्तिक / सोलो डान्स - ९ मार्च २०२६, सायं. ५ वा. समूह नृत्य - ९ मार्च २०२६, सायं. ५ वा. होम मिनिस्टर (अंतर्गत विविध स्पर्धा) - १० मार्च २०२६, सायं. ५ वा. वैयक्तिक गीत गायन - ११ मार्च २०२६, सायं. ६ वा. फॅशन शो / वेशभूषा स्पर्धा - ११ मार्च २०२६, सायं. ६ वा.

## ज्ञानाच्या चांगुलपणाची बेरीज व्हावी : डॉ. श्रीपाल सबनीस

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.५ मार्च-**

समाजात केवळ माहितीचा साठा असून चालत नाही, तर त्या ज्ञानाच्या चांगुलपणाची बेरीज होणे काळाची गरज आहे, असे परखड मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज (सोलापूर) आणि शिक्षण प्रसारक मंडळ (अकलूज) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील स्मृती व्याख्यानमालेत' ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यावेळी स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी सर्वांचे स्वागत करीत या व्याख्यानमालेचा उद्देश सांगताना व्यक्तीपूजेपेक्षा विचारांची पूजा महत्त्वाची हि अत्यंत महत्त्वाची भूमिका मांडली.



डॉ. सबनीस यांनी सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. संवादाची संस्कृती जपण्याचे आवाहन डॉ. सबनीस यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महात्मा फुले, महात्मा गांधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यपद्धतीचा उल्लेख करत त्यांनी महापुरुषांनी नेहमीच जनहिताला प्राधान्य दिल्याचे सांगितले. यावेळी छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाट, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. अतुल लकडे, वासंती सबनीस, शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजित रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे, सिनेट सदस्य महेश माने, प्रा. मोटे, सचिन गायकवाड, बाळकृष्ण लोखंडे, सावंत आदी उपस्थित होते.

## महिला वन अधिकाऱ्यावर हल्ला करणाऱ्या वाळू तस्करांची तडीपारी लवकरच

- **जिल्ह्यातील अवैध उत्खननाविरोधात पोलिस-महसूल संयुक्त कारवाई**
- **महसूलमंत्री बावनकुळे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील खरातवाडी (ता. पंढरपूर) येथे अवैध मुरुम उपसा रोखण्यासाठी गेलेल्या महिला वन अधिकारी शीतल चाटे यांच्या अंगावर टिप्पर घालून त्यांना चिरडण्याचा प्रयत्न करणाऱ्या तस्करांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे. या प्रकरणातील आरोपींना तडीपार करण्याची प्रक्रिया पोलिसांनी सुरू केली असून, यापुढे महसूल, वन आणि पोलीस विभाग संयुक्त 'टास्क फोर्स'च्या माध्यमातून वाळू व मुरुम माफियांविरुद्ध मोहीम राबवतील, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली.

आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर-मंगळवेढा परिसरातील वाढत्या तस्करांच्या दहशतीचा मुद्दा सभागृहात मांडला. उत्तरात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, महिला अधिकाऱ्यांवरील हल्ला ही अत्यंत गंभीर बाब आहे. याप्रकरणी पोलिसांनी विविध कलमान्वये फौजदारी गुन्हे दाखल केले असून वन कायद्यानुसारही कारवाई सुरू आहे. अधिकारी अनेकदा एकटे कारवाई करायला जातात, तेव्हा असे हल्ले होतात. त्यामुळे आता गृह आणि महसूल विभागाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, कोणतीही धाड टाकताना किंवा अवैध वाहतूक रोखताना पोलीस आणि महसूल विभागाचे 'जॉइंट ऑपरेशन' (संयुक्त मोहीम) अनिवार्य असेल. पोलिसांनी आधीच संरक्षण देण्याची योजना तयार केली आहे, असे बावनकुळे यांनी नमूद केले. तस्करांवर वचक बसवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबत माहिती देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, आता 'ड्रोन मॅपिंग' प्रणाली विकसित केली जात आहे. ज्या ठिकाणी उत्खनन सुरू असेल, तिथे ड्रोनद्वारे सर्वेक्षण आणि गुगल मॅपच्या आधारे देखरेख केली जाईल. यामुळे अवैध उत्खनन आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय प्रभावी नियंत्रण मिळवणे शक्य होईल. अवैध उत्खननाच्या मागे मोठे रॅकेट कार्यरत असले तरी, आता पोलीस, महसूल आणि वन विभाग एकत्रितपणे ताकदीने या माफियांवर तुटून पडतील, असा विश्वासही महसूल मंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

## 'दक्षिण'मध्ये उद्यापासून छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

**तहसीलदार किरण जमदाडे**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान (टप्पा १) मार्चमध्ये राबवले जात आहे. या अभियानाचा उद्देश सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांचे महसूल विभागाशी संबंधित प्रश्न, जमिनीची कागदपत्रे आणि डिजिटल सेवांचे प्रश्न एकाच दिवशी निकाली काढणे हा आहे.



राज्याचे महसूलमंत्री बावनकुळे यांच्या आदेशानुसार दक्षिण सोलापूर तहसील कार्यालयाच्या वतीने उद्यापासून विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार किरण जमदाडे यांनी पत्रकारांना दिली. या माध्यमातून नागरिकांना सेतूचे दाखले देण्यापासून ते शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात येणार आहेत. या शिबिरात आरटीओ, मुद्रांक विभाग, महावितरण, महिला व बालकल्याण, ग्राम पंचायत विभाग, बांधकाम विभाग आदी विभागही सहभागी होणार असल्याचे तहसीलदार जमदाडे यांनी सांगितले. समाधान शिबीराच्या माध्यमातून मंडल स्तरावर आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात नागरिकांना उत्पन्न, जात, आदी प्रकारचे दाखले देण्यात येणार आहेत. याशिवाय सातबाराचे वाचन करुन जिवंत सातबारा उपक्रम घेण्यात येणार आहे. यावेळी गरज असलेल्या कुटुंबाना नवीन रेशनकार्डही वितरीत करण्यात येणार आहे. संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना यावेळी लाभ मिळवून देण्यात येणार आहे. यानिमित्ताने आरोग्य विभागाच्या वतीने नागरिकांच्या आरोग्याचीही तपासणी करण्यात येणार आहे. पोस्ट कार्यालय, बँका, सहकार विभाग, कृषी विभाग आदी विभागांच्या योजनांचा लाभ यावेळी पात्र लाभार्थ्यांना देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

पात्र शेतकर्यांना तीन लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अभियानाअंतर्गत शनिवार दि. ७ मार्च रोजी बोरामणी, शनिवार १४ मार्च रोजी होटगी, या ठिकाणी, शुक्रवार, १० एप्रिल रोजी वळसंग, शेळगी येथे तर १७ एप्रिल रोजी मुस्ती येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, ८ मे रोजी सोलापुरात व १५ मे रोजी बोरामणी येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांनी उपस्थित राहून सर्व योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार जमदाडे यांनी केले आहे.

### कै. विठ्ठलरावजी शिंदे प्रशालेला आदर्श शाळा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. ५ मार्च-**

सोलापूर जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ आयोजित आदर्श विज्ञान शिक्षक व आदर्श शाळा पुरस्कार सोहळा समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमासाठी पुणे विभाग शिक्षक संघटनेचे माजी आमदार दत्तात्रय सावंत व नूतन जिल्हा परिषद सदस्य रश्मी बागल, गटशिक्षणाधिकारी नितीन कदम, संजय जवंजाळ, डॉ. नूरअहमद कारंजे, अभय महाजन यांच्या हस्ते कै.विठ्ठलरावजी शिंदे प्रशाला अंबाड शाळेस आदर्श शाळा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रशालेचे प्राचार्य जवानसिंग रजपूत, प्रशालेचे जेष्ठ शिक्षक मच्छिंद्र पाटील, जूनियर कॉलेज विभाग प्रमुख विष्णू घाडगे, यशवंत प्रायमरी स्कूलचे प्राचार्य सोमनाथ होनमोठे उपस्थित होते.

## जातीवाचक शिवीगाळ व मारहाण प्रकरण; दोन्ही आरोपी निर्दोष

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ मार्च-**

फिर्यादी रमेश अंबादास भडकवाड वय ३५ वर्षे व फिर्यादीचा नातेवाईक बालाजी दिगंबर कांबळे वय ४० वर्षे, दोघे (रा. वाकाव, ता. माढा) यांना आरोपी तुषार बाळासाहेब नागटिळक वय १८ वर्षे व तेजस बाळासाहेब नागटिळक वय २२ वर्षे यांनी पुर्वीचा राग मनात धरुन त्या दोघांना फिर्यादी व त्याचे नातेवाईकांना काठीने मारहाण करुन जखमी केले व त्यांना जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या आरोपातुन बार्शी येथील अति. सत्र न्यायाधीश यांनी निर्दोष मुक्तता केली.

ता.२२/०७/२०१९ रोजी दुपारी ०१.०० वाजणेचे सुमारास फिर्यादी व त्याचा नातेवाईक रेल्वे स्टेशनवर थांबले असताना दोन्ही आरोपींनी पुर्वीचा राग मनात धरुन दोघांना काठीने मारहाण केली तसेच स्टेशनपासून आरोपीचे घरी घेऊन आले व तेथेही मारहाण करुन जातीवाचक शिवीगाळ केली म्हणून फिर्याद दाखल केली होती. सदरचा तपास ऊडझ सिध्देश्वर गोरे यांनी करुन आरोपी विरुध्द खटला कोर्टात पाठविलेला होता. यात सरकारतर्फे जखमी फिर्यादी रमेश व जखमी बालाजी कांबळे यांच्यासह डॉ. प्रिती भंडारी व डीवायएसपी मोरे यांच्यासह ६ साक्षीदार तपासले. आरोपीतर्फे ॲड. भारत कट्टे यांनी युक्तीवादात सांगितले की, गुन्हा घडले ठिकाण हे व हत्यार काठी जप्ती संशयास्पद आहे, स्टेशन मास्तर याची साक्ष नोंदविली नाही तसेच घटनेवेळी अनेक लोक होते परंतु इतर कोणाची साक्ष नोंदविली नाही, वैद्यकीय पुरावा व जखमी साक्षीदारांचे जबाबामध्ये विसंगती आहे सदरचा युक्तीवाद ग्राह्य धरुन मे. कोर्टानी दोन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली.

यात आरोपीतर्फे ॲड. भारत कट्टे, ॲड. गणेश जगताप (बार्शी) यांनी काम पाहिले

## न्यायव्यवस्था गतिमान करण्यासाठी संबंधीत घटकाचे योगदान महत्वाचे

**न्यायमूर्ती निजामोद्दीन जमादार; सांगोला न्यायालयामध्ये विधीज्ञ कक्ष इमारतीचे भूमिपूजन**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ मार्च-**

नव्याने उभारण्यात येणारी विधीज्ञ कक्ष ही नूतन इमारत न्यायालय, विधीज्ञ व पक्षकार यांचेमधील दुवा म्हणून भविष्यकाळामध्ये काम करणार आहे. न्यायव्यवस्था अधिक जलद व गतिमान करणेसाठी न्यायालयाशी संबंधीत घटकाने आपले योगदान देणे महत्वाचे आहे असे प्रतिपादन उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती निजामोद्दीन जमादार यांनी केले.



ते दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला येथे उभारण्यात येणा-या विधीज्ञ कक्षाच्या इमारतीच्या भूमिपूजन समारंभ प्रसंगी बोलत होते. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला, जिल्हा सत्र न्यायाधीश मनोज एस.शर्मा, महाराष्ट्र आणि गोवा वकिल संघटनेचे सदस्य अड.मिलिंद थोबडे, सांगोला विधीज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड. एम.एन.ढाळे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवातीला मान्यवरांचे स्वागत औक्षण करून हलगी व तुतारीच्या निनादामध्ये करण्यात आले. यावेळी सांगोला विद्यामंदीरच्या इ.८ वी.मधील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गायले. प्रास्ताविकात ॲड. एम.एन.ढाळे यांनी केले. दिवाणी न्यायालय, सांगोलाचे सह.दिवाणी न्यायाधीश ए.ए.पाटील व ॲड.गजानन भाकरे यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. उदय घोंगडे यांनी आभार मानले.

## सिंहगड महाविद्यालयामध्ये सीपीआर प्रशिक्षण

**पंढरपूर, दि. ५ मार्च-**

येथील सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग महाविद्यालया मध्ये विद्यार्थ्यांसाठी सीपीआर प्रशिक्षण कार्यक्रम नुकताच उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन रोटरी क्लब ऑफ पंढरपूर व रोटरॅक्ट क्लब ऑफ सिंहगड कॉलेज पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन रोटेरियन डॉ. नीरज दोडके यांनी केले. त्यांनी हृदयविकाराचा झटका आल्यास तात्काळ सीपीआर कसे द्यावे, त्याची योग्य पद्धत, वेळेचे महत्त्व तसेच प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली. हृदयाची धडकन व श्वसन थांबल्यास दिली जाणारी तातडीची जीवनरक्षक प्रक्रिया. हृदयविकाराचा झटका, बुडणे, विजेचा धक्का, अपघात किंवा श्वास गुदमरल्यास सीपीआर देणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. हृदय थांबल्यानंतर ४-६ मिनिटांत मेंदूला इजा होऊ शकते. त्वरित सीपीआर दिल्यास मेंदू व महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा चालू राहतो. योग्य वेळी दिलेला सीपीआर हा रुग्णाचे प्राण वाचवू शकतो, असे त्यांनी सांगितले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अशा कौशल्याधारित प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. एस. बी. पवार, प्रा. ए. एन. गोडसे, रोटरॅक्ट क्लबचे उपाध्यक्ष रोटरॅक्टर राहुल चव्हाण, सचिव रोटरॅक्टर पृथ्वीराज सावंत, विश्वतेज पासले, ओम जाधव, शुभम साळुंखे, शेखर रणखांबे आणि मयुर पुरीगोसावी यांनी परिश्रम घेतले.

# राज्यसभेवर शिवसेनेकडून सोलापूरच्या प्रा. ज्योती वाघमारे

## ● एकनाथ शिंदेकडून लाडक्या बहिणीला महिला दिनाची भेट; सामान्य कुटुंबातील महिलेला दिली खासदारकीची संधी

**मुंबई, दि.५ मार्च-**

राज्यसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांचे अंदाज चुकवत मोठे 'धक्कातंत्र' वापरले आहे. शिवसेना शिंदे गटाच्या वाट्याला तांत्रिकदृष्ट्या राज्यसभेची एकच जागा येत असताना, उपमुख्यमंत्र्यांनी सोलापूरच्या आक्रमक प्रवक्त्या प्रा.डॉ. ज्योती वाघमारे यांना मैदानात उतरवले असून त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सात जागांसाठी सातच अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोधचा मार्ग मोकळा झाला आहे.

महाराष्ट्रातील आगामी राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला असून महायुतीकडून उमेदवारीबाबत चर्चा सुरु आहेत. भाजपकडून चार उमेदवार देण्यात आल्यानंतर शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडूनही उमेदवारांची नावे पुढे येऊ लागली आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून राज्यसभेसाठी प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांचे नाव जाहीर झाले आहे. सुरुवातीला माजी खासदार राहुल शेवाळे यांचे नाव आघाडीवर असल्याचे बोलले जात होते. मात्र ऐनवेळी त्यांचे नाव मागे पडल्याची माहिती समोर येत असून प्रा.डॉ. ज्योती वाघमारे यांना राज्यसभेची संधी मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी शिवसेना शिंदे गट स्थापन झाल्यापासून पक्षाची वैचारिक भूमिका प्रभावीपणे मांडण्याचे काम केले आहे. विविध राजकीय मुद्द्यांवर त्यांनी सातत्याने माध्यमांमध्ये पक्षाची बाजू ठामपणे मांडली आहे. विशेष म्हणजे, शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत आणि सुषमा अंधारे यांच्याकडून करण्यात येणाऱ्या आरोपांना प्रत्युत्तर देण्याची जबाबदारीही प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी सातत्याने पार पाडली आहे. आक्रमक आणि अभ्यासू वक्तृत्वामुळे शिंदे गटाच्या प्रमुख प्रवक्त्यांपैकी एक म्हणून प्रा.डॉ.ज्योती वाघमारे ह्या ओळखल्या जातात. फुले-शाहू-आंबेडकर विचारसरणीतून पुढे आलेल्या प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय काम केले-करीत आहेत. यापूर्वी त्या काँग्रेस पक्षातही कार्यरत होत्या. त्यांच्याकडे काँग्रेसच्या महिला शहर अध्यक्षाची जबाबदारी होती. तत्कालिन आमदार व विद्यमान खासदार प्रणिती शिंदे यांच्या प्रचार सभांचे सुत्रसंचलन, संयोजन देखील त्या करीत होत्या.

सोलापूर लोकसभा मतदारसंघात काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्याविरोधात मजबूत वैचारिक आणि राजकीय आव्हान उभे करण्याच्या दृष्टीनेही प्रा.डॉ. ज्योती वाघमारे यांना संधी देण्यात येत असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहे. राज्यसभेच्या निवडणुकीसाठी अधिकृत उमेदवारी जाहीर झाल्यानंतरच या चर्चांना अंतिम स्वरुप मिळणार असले तरी शिवसेना शिंदे गटाकडून प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांच्या नावावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात व्यक्त केली जात आहे.



### प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांचा परिचय आणि कौटुंबिक पार्श्वभूमी

आंबेडकरी चळवळीत सक्रिय काम करणारा चेहरा म्हणून प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांची ओळख आहे. त्यांचे वडील नागनाथ वाघमारे हे दलित पँथरचे कार्यकर्ते होते. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी नागनाथ वाघमारे यांनी हॉटेलमध्ये वेटरचे तसेच बांधकाम मजूर म्हणून काम केले. चळवळीतील कामाची पोचपावती म्हणून सोलापूरमधील नागरिकांनी महापालिकेच्या निवडणुकीत नागनाथ वाघमारे यांना नगरसेवक म्हणून निवडून दिले होते. प्रा डॉ.ज्योती वाघमारे यांनी मानवी हक्क अभियान, विद्रोही संस्कृतिक चळवळ, आंबेडकरी चळवळीतून आपल्या कामाला सुरुवात केली. काहीकाळ वृत्तनिवेदिका म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते.

आपल्या उच्चशिक्षणाचा उपयोग सामाजिक जनजागृतीसाठी व्हावा, या उद्देशाने प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा या राज्यांत डॉ.बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनावर आधारित व्याख्यानं दिली. वालचंद महाविद्यालयात त्यांनी प्राध्यापिका म्हणून काही काळ काम केले होते.

### दहावीला मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये प्रथम

प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी इंग्रजी साहित्यात पीएचडी केलेली आहे. दहावीच्या परिक्षेत ८४ टक्के गुण मिळवून उत्तीर्ण झाल्या. बारावीच्या परिक्षेत पुणे विभागातून मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये प्रथम आलेल्या आहेत. अर्धमागधी विषयात राज्यात प्रथम, महिलांच्या प्रश्नांवरील संशोधनाला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार मिळालेला आहे.

### पाच भाषांवर प्रभुत्व अन् उत्तम वक्तृत्व

प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांचे मराठी, हिंदी, इंग्रजी, तेलगू आणि कन्नड या पाच भाषांवर प्रभुत्व आहे. शिवसेनेचा आक्रमक आणि अभ्यासू चेहरा मूळच्या सोलापूर जिल्ह्यातील धडाकेबाज महिला कार्यकर्त्या म्हणून त्यांची ओळख आहे. मागील १५ वर्षांपासून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात प्रा.डॉ.ज्योती वाघमारे सक्रियपणे काम करत आहेत. शिवसेना पक्षात उठाव झाल्यानंतर प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाचा स्वीकार करत एप्रिल २०२३ मध्ये शिवसेनेत प्रवेश केला. प्रा.डॉ. ज्योती वाघमारे यांची शिवसेना पक्षाच्या राज्य प्रवक्त्या आणि धाराशिव जिल्हा संपर्कप्रमुख म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली.

मागील अडीच वर्षात विविध मंचांवर आणि चर्चासत्रात शिवसेना आणि एकनाथजी शिंदे साहेबांनी केलेल्या ऐतिहासिक उठावाबाबत सडेतोड आणि मुद्देसूद बाजू मांडत शिवसेना प्रवक्त्या म्हणून प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी उपयुक्तता सिध्द केलेली आहे. प्रा.डॉ. ज्योती वाघमारे यांनी शिवसेनेच्या ऐतिहासिक दसरा मेळाव्यांमध्ये केलेली भाषणं त्यांच्या वक्तृत्व आणि अभ्यासू व्यक्तिमत्वाची साक्ष देतात. शिवसेना नेतृत्वावर टीका करणाऱ्या विरोधकांना त्यांच्याच भाषेत किंवा त्याहून विखारी भाषेत सडेतोड उत्तरं देणाऱ्या प्रवक्त्या म्हणून प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी राजकारणात आपलं वेगळं स्थान निर्माण केलं आहे.

महाराष्ट्राचा इतिहास, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, संविधान आणि राज्याच्या राजकारणावरील सखोल अभ्यासपूर्ण भाषणं ही प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांची वैशिष्ट्ये आहेत. सलग तीन दसरा मेळाव्यात घणाघाती भाषणातून प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांनी ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे, संजय राऊत, सुषमा अंधारे यांच्यावर खरपूस टीका केली. जनतेतला धडाकेबाज चेहरा खासदार झाल्यास सोलापूर जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्रात शिवसेना विस्तारासाठी फायदा होण्यास मदत होणार आहे.

### भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात करण्यात आला जल्लोष

जांबमुनी मोची समाजाची कन्या प्रा.डॉ.ज्योती वाघमारे यांना शिवसेनेकडून राज्यसभेची उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल जल्लोष करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात हा जल्लोष साजरा करण्यात आला. जांबमुनी मोची समाजाची कन्या प्रा.ज्योती वाघमारे यांना शिवसेनेकडून राज्यसभेची उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल जल्लोष करण्यात आला. यावेळी माजी अध्यक्ष अंबादास करगुळे, यलप्पा तुपदोळकर, सन्नी म्हेत्रे, रवि म्हेत्रे, अविनाश महाराज, नरसिंग वल्लापोलु, भीमा आसादे, ईश्वर म्हैत्रे, अंबादास माढेकर, अजय दिड्डी, भगवान करगुळे, जितेश मासे यांच्यासह मोची समाजातील युवक उपस्थित होते.

---

# युद्धनौकेवरील हल्ल्याची किंमत चुकवावी लागेल

## इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांचा अमेरिकेला थेट इशारा

◆ **तेहरान, ५ मार्च**

श्रीलंकेच्या सागरी सीमेत आणि आंतरराष्ट्रीय जलक्षेत्रात इराणच्या युद्धनौकेवर हल्ला करण्याचा गुन्हा अमेरिकेने केला आहे. याची जबर किंमत त्यांना मोजावी लागेल, असा इशारा इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अराघची यांनी दिला.



युद्धनौकेत १३० नाविक होते आणि ते नुकतेच भारतीय नौदलासोबत सराव करून परतत होते. या कारवाईचे अमेरिकेला चोख प्रत्युत्तर दिले जाईल. अमेरिकेच्या पाणबुडीने श्रीलंकेच्या दक्षिण किनारपट्टीजवळ हिंद महासागराच्या आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आयआरआयएस देना युद्धनौकेला लक्ष्य केले. यात आमच्या ९० पेक्षा अधिक सैनिकांचा मृत्यू झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने पहिल्यांदाच टॉरपीडोचा वापर करून युद्धनौका बुडवली. याला लवकरच प्रत्युत्तर दिले जाईल असा इशारा अराघची यांनी समाज माध्यमावरील पोस्टमधून दिला.

### अमेरिकेच्या रणनीतीला धक्का

इराणमध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी आणि जमिनीवरील युद्धात मदत करण्यासाठी अमेरिका कुर्दिश सैनिकांचा वापर करू इच्छित होती. या तळांवर क्षेपणास्त्रांचा वर्षाव करून इराणने या योजनेला मोठा धक्का दिला आहे. आयआरजीसीने या हल्ल्याची पुष्टी करणारे अधिकृत निवेदन जारी केले आहे आणि हा हल्ला आपल्या सुरक्षेसाठी आवश्यक पाऊल असल्याचे म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)

### कुर्दिश लढवय्यांवर आयआरजीसीचा हल्ला

इराण आणि अमेरिकेत सुरू असलेल्या युद्धादरम्यान, कुर्दिश लढवय्ये आता लक्ष्य बनले आहेत. इराणच्या क्रांतिकारी गार्ड्सने (आयआरजीसी) इराकी कुर्दिस्तान प्रदेशातील कुर्दिश तळांवर तीन क्षेपणास्त्रे डागले. यात ५० पेक्षा अधिक कुर्दिश लढवय्ये मारल्याची पुष्टी अराघची यांनी केली. अमेरिकेला मदत करण्याची किंमत त्यांना मोजावी लागली असेही त्यांनी म्हटले आहे. कुर्दिश लढवय्ये सक्रिय असलेले तळ नष्ट करण्यासाठी हा हल्ला करण्यात आला. अमेरिका त्यांना प्रशिक्षण देण्याचा आणि इराणविरुद्धच्या युद्धात त्यांचा वापर करण्याचा कट रचत होती, असेही त्यांनी म्हटले आहे. ■

---

# इराणवर हल्ले करण्यासाठी भारतीय भूमीचा वापर नाही

## अमेरिकेच्या माजी कर्नलचा दावा भारताने फेटाळला

◆ **नवी दिल्ली, ५ मार्च**

अमेरिकेचे माजी कर्नल डगलस मॅकग्रेगर यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत अमेरिका इराणवर हल्ले करण्यासाठी भारतीय भूमीचा वापर करत असल्याचा दावा केला होता.

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने त्यांचा दावा पूर्णपणे फेटाळून लावला आहे. भारताला विनाकारण वादात ओढण्याचा प्रयत्न करू नका अशा शब्दात मॅकग्रेगर यांच्या टिप्पणीला प्रत्युत्तर दिले.

मॅकग्रेगर यांनी म्हटले होते की, इराणच्या हल्ल्यात मध्य पूर्वेतील अमेरिकेचे सर्व लष्करी तळ उद्ध्वस्त झाले आहेत. त्यामुळे आता इराणला प्रत्युत्तर देण्यासाठी अमेरिकन नौदलाला भारतीय बंदरांच्या मदतीवर अवलंबून राहावे लागत आहे. या विधानामुळे जागतिक स्तरावर भारताच्या तटस्थ भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते. मॅकग्रेगर यांच्या दाव्याला प्रत्युत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाने त्यांच्या अधिकृत एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, अमेरिकन वृत्तवाहिनीवरून करण्यात येणारे दावे पूर्णपणे खोटे, निराधार आहेत. भारताने कधीही आपल्या भूमीवर परदेशी सैन्याला तळ उपलब्ध करण्याची परवानगी दिलेली नाही आणि आमचे धोरण आजही कायम आहे. ◂(वृत्तसंस्था)

---

# वसूल केलेले व्यापार शुल्क परत करा

## न्यायालयाचा ट्रम्प प्रशासनाला आदेश ● व्यावसायिकांच्या याचिकेवर सुनावणी ● व्याजासकट द्यावा लागणार परतावा

◆ **न्यू यॉर्क, ५ मार्च**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शंभरपेक्षा अधिक देशांवर आकारलेले व्यापार शुल्कबेकायदेशीर ठरवत शुल्काचा निर्णय न्यायालयाने रद्द केला होता. प्रशासनाने आकारलेले शुल्क परत मिळावे यासाठी कंपन्या आणि व्यावसायिकांनी न्यू यॉर्कच्या एका संघीय न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायाधीश रिचर्ड ईटन यांनी ट्रम्प प्रशासनाला वसूल केलेले शुल्क खात्यात जमा करण्याचा आदेश दिला आहे.




व्यावसायिक आणि विविध कंपन्यांच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या याचिकेत ट्रम्प प्रशासनाला व्यापार शुल्क परत करण्याचा आदेश द्यावा, अशी विनंती करण्यात आली. याचिकेसोबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची प्रत जोडण्यात आली. युक्तिवादात वकिलाने सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सरकारने वसूल केलेले शुल्क बेकायदेशीर आहे. राष्ट्राध्यक्षांनी अधिकार नसताना संविधानाच्या तरतुदींचे उल्लंघन करीत जागतिक व्यापाराला संकटात आणण्यासाठी शुल्क आकारणीचा निर्णय घेतला. आतापर्यंत आकारण्यात आलेले शुल्क व्याजासह परत करण्याचा आदेश द्यावा.

सरकारी वकिलाने सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आधी आकारलेले शुल्क रद्द करण्यात आले. न्यायालयाने आदेशात शुल्क परत करण्याचा आदेश दिलेला नव्हता. दोन्ही पक्षांच्या युक्तिवादानंतर न्यायाधीश रिचर्ड ईटन यांनी सरकारी वकिलाचे दावे फेटाळत कंपनी आणि व्यावसायिकांकडून आकारण्यात आलेले शुल्क परत करण्याचा आदेश दिला. याचिकाकर्त्यांची शुल्कावरील व्याजाची मागणीदेखील त्यांनी मान्य केली.

### महिनाभरात प्रक्रिया सुरू करा

यूएस कोर्ट ऑफ इंटरनॅशनल ट्रेडचे न्यायाधीश रिचर्ड ईटन यांनी आदेशात म्हटले की, सर्व आयातदार सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा लाभ घेण्यास पात्र आहेत. आंतरराष्ट्रीय आपत्कालीन आर्थिक अधिकार कायद्याअंतर्गत आकारण्यात आलेल्या शुल्काची रक्कम परत करण्यात यावी आणि ही प्रक्रिया महिनाभरात सुरू करून अहवाल सादर करावा. ■

### १७५ अब्ज डॉलर्सच्या परतफेडीचे आव्हान

अमेरिकन सरकारने आतापर्यंत व्यापार शुल्कातून १३० अब्ज डॉलर्स जमा केले आहेत. न्यायालयाच्या आदेशानुसार अमेरिकन प्रशासनाला व्याजासकट १७५ अब्ज डॉलर्सपर्यंत परतफेड करावी लागू शकते. आयातदारांना शुल्क परतफेडीवर आक्षेप नोंदवण्यासाठी १८० दिवसांचा कालावधी देण्यात आला आहे. ■

### डेमॉक्रॅटिक खासदारांकडून निर्णयाचे स्वागत

अमेरिकन सिनेटमधील तीन डेमॉक्रॅटिक पक्षाच्या खासदारांनी (सिनेटर) राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना पत्र लिहून शुल्काची परतफेड करण्याची मागणी केली होती. यात ओरेगॉनचे सिनेटर रॉन वायडेन, मॅसॅच्युसेट्सचे एड मार्की आणि न्यू हॅम्पशायरचे जीन शाहीन यांचा समावेश होता. न्यायालयाच्या आदेशाचे त्यांनी स्वागत केले आहे. ◂(वृत्तसंस्था)

---

# सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचे मुख्यमंत्री फडणवीसांचे आदेश

● आमदार देवेंद्र कोठे यांचा पाठपुरावा
● विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करावे, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाला दिले आहेत, अशी माहिती आमदार देवेंद्र कोठे यांनी दिली. सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय होण्यासाठी आ.देवेंद्र कोठे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

दरम्यान, या निर्णयामुळे शासकीय पातळीवरील हालचालींना वेग आला असून, आगामी शैक्षणिक वर्षात म्हणजेच येत्या जूनपासूनच सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सोलापुरातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रश्न गेल्या ६० वर्षांपासून प्रलंबित आहे. सोलापूरसाठी मंजूर झालेले शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय इतर शहरात वळविण्यात आले. याबाबत मागणी केल्यानंतर तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी प्रयत्न करून सोलापूरला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाला मंजुरी मिळवून दिली. तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या ३४ एकर जागेवर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करता येईल.

याकरिता २५० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. या प्रस्तावाचा सकारात्मक विचार करून याच अर्थसंकल्पात त्याकरिता तरतूद करावी आणि येत्या जून महिन्यापासून हे महाविद्यालय सोलापूरात सुरू व्हावे अशी मागणी आमदार देवेंद्र कोठे यांनी २५ फेब्रुवारी रोजी चालू अधिवेशनात केली होती. याबाबत आमदार देवेंद्र कोठे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची भेटही घेतली होती. त्यांच्या या मागणीला प्रतिसाद देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना आदेश दिले आहेत.

थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू व्हावे याकरिता पुढाकारघेतल्याने याबाबत शासकीय पातळीवरील हालचाली अधिक गतिमान झाल्या आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे सोलापूर शहर जिल्ह्यातील विद्यार्थी समाज माध्यमांवर आनंद व्यक्त करत आहेत.

### ना.चंद्रकांत पाटील जाणार दिल्लीला

राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील अधिवेशनानंतर एआयसीटीईच्या मान्यतेसाठी स्वतः दिल्ली येथे जाणार आहेत. त्यामुळे सोलापुरात शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याच्या तयारीच्या कामाला मोठी गती मिळणार आहे.

### सोलापूरच्या उच्च शिक्षणाच्या प्रवासातील मैलाचा दगड

तरुणांना सोलापुरातच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माध्यमातून अभियांत्रिकीचे शिक्षण मिळावे यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणीला यश आले याचे समाधान आहे. याकामी उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे सोलापूरला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होत आहे. शासनाच्या या निर्णयाचा सोलापूरकरांना मोठा फायदा होणार असून सोलापूरच्या उच्च शिक्षणाच्या प्रवासातील हा मैलाचा दगड ठरणार आहे.

**- देवेंद्र कोठे, आमदार, शहर मध्य**

---

# प. आशिया, युक्रेनमधील संघर्ष लवकर संपवावा

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन ● अलेक्झांडर स्टब यांच्याशी चर्चा

◆ **नवी दिल्ली, ५ मार्च**

पश्चिम आशिया एका व्यापक प्रादेशिक युद्धाच्या उंबरठ्यावर असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी या प्रदेशातील वाढता संघर्ष संपुष्टात आणावा, असे आवाहन केले. कोणताही प्रश्न लष्करी संघर्षाने सोडवता येत नाही, असे त्यांनी यावेळी म्हटले.



फिनलंडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांच्याशी हस्तांदोलन करताना पंतप्रधान मोदी

फिनलंडचे अध्यक्ष अलेक्झांडर स्टब यांच्याशी झालेल्या विस्तृत चर्चेनंतर नरेंद्र मोदी यांनी उपरोक्त वक्तव्य केले. अमेरिका आणि इस्रायलचे इराणशी युद्ध सहाव्या दिवसांत प्रवेश करीत असून, दोन्ही बाजूंनी नवीन हल्ले सुरू केले आहेत. यामुळे संपूर्ण प्रदेशात लक्षणीयरीत्या तणाव वाढला आहे.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत प्रयत्नांना स्टब यांनी जोरदार पाठिंबा दिला. सध्याच्या भू-राजकीय जागतिक बहुपक्षीय व्यवस्थेत मोठ्या सुधारणांसह भारताला कायमस्वरूपी स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे, असे स्टब म्हणाले. डिजिटायझेशन आणि शाश्वततेतील भारत-फिनलंज संबंधांना एक धोरणात्मक भागीदारीचे स्वरूप दिले जात आहे, जे एआय, ६-जी टेलिकॉम, स्वच्छ ऊर्जा आणि क्वांटम संगणन यासह अनेक उच्च-तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये सहकार्याला चालना देईल. संगणक, अंतराळ, सेमीकंडक्टर आणि महत्त्वपूर्ण खनिजे यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावरही दोन्ही बाजूंनी सहमती दर्शवली. मोदी-स्टब यांच्या चर्चेत पश्चिम आशियातील संकटाचा मुद्दा प्रमुख होता. भारत आणि फिनलंडचा कायद्याचे राज्य, संवाद आणि राजनैतिक मुत्सद्देगिरीवर विश्वास कोणताही प्रश्न सोडवता येत नाही, यावर आमचे एकमत आहे, असे नरेंद्र मोदी म्हणाले. युक्रेन असो किंवा पश्चिम आशिया, आम्ही संघर्षांचा जलद अंत आणि शांततेच्या दिशेने होणाऱ्या प्रत्येक प्रयत्नांना पाठिंबा देत राहू, असे ते म्हणाले.

### युरोपचाही उल्लेख

भारत आणि युरोपातील बळकट होत असलेल्या संबंधांचा उल्लेखही मोदी यांनी केला. जग अस्थिरता आणि अनिश्चिततेच्या काळातून जात आहे. युक्रेनपासून पश्चिम आशियापर्यंत जगाच्या अनेक भागांत संघर्ष कायम आहे. अशा जागतिक वातावरणात भारत आणि युरोप या जगातील दोन प्रमुख राजनैतिक शक्ती त्यांच्या संबंधांच्या सुवर्णकाळात प्रवेश करीत आहेत,

---

# एसटी चालक-वाहकांसाठी अल्कोटेस्ट तपासणी सक्तीची

**मुंबई** : प्रवाशांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत राज्य परिवहन महामंडळात (एसटी) सेवेत असताना मद्यपानाला शून्य सहनशीलता धोरण लागू करण्यात आले आहे. आगारात कामावर हजर होणाऱ्या चालक- वाहकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे तपासणी करूनच त्यांना ड्युटीवर पाठविणे बंधनकारक करण्यात आले असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी कडक उपाययोजना करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार सर्व आगारांमध्ये कामावर हजर होणाऱ्या चालकांची अल्कोटेस्ट मशीनद्वारे मद्यपान तपासणी दररोज करण्यात येणार असून योग्य नोंद घेतल्यानंतरच चालकांना ड्युटीवर पाठविण्यात येणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी २५ जानेवारी रोजी मुंबईतील परळ बसस्थानकाला अचानक भेट दिली होती.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# संकल्पांचे स्वप्नचित्र

देशाचा किंवा कोणत्याही राज्याचा अर्थसंकल्प सादर होणे हा केवळ एक वार्षिक उपचार नसतो. अर्थसंकल्प ही अभ्यास करण्याची आणि समजून घेण्याची बाब असते. महाराष्ट्राचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प आज विधिमंडळात सादर होईल. यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतःच अर्थसंकल्प मांडणार असल्याने राज्याचे वास्तविक अर्थचित्र, सरकारचे संकल्प व भविष्यातील महाराष्ट्र अशा तीन बाबींचा विचार करून हा अर्थसंकल्प साजरा होणार आहे. कालपरवापर्यंत अर्थसंकल्प समजून घेणे सर्वसामान्यांस सोपे वाटत नसे. माध्यमांनी रंगविलेल्या त्या चित्रातून, केवळ रुपया कसा येणार आणि कसा जाणार एवढ्या आलेखातून अर्थसंकल्पाचा अर्थ शोधण्याच्या क्षमता मर्यादित राहिल्या होत्या. काही वेळा राजकीय नेत्यांनाही हाच संभ्रम पडत होता. म्हणूनच विरोधकांनी अर्थसंकल्पावर टीका करावी आणि सत्ताधाऱ्यांनी स्तुतिसुमने उधळावीत एवढाच उपचार अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर पार पाडला जात असे. आजही विरोधकांकडून फारशा वेगळ्या प्रतिक्रिया येतील, असे संभवत नाही. महायुती सरकारचा यंदाचा अर्थसंकल्प, महाराष्ट्राच्या विकासाचा, उन्नतीचा, समाजाच्या हिताचा आणि सर्व समाजघटकांना न्याय देणारा असावा, ही ढोबळपणे सामान्य जनतेची अपेक्षा आहे. राज्याच्या तिजोरीत किती निधी जमा होणार, राज्याच्या डोक्यावरील कर्जाचा किती बोजा जनतेच्या शिरावर असणार, महसुलाचा किंवा खर्चाच्या तरतुदींचा नेमका विनियोग कसा होणार, त्यातून जनतेला काय मिळणार या नेहमीच्या प्रश्नांची उत्तरे अर्थसंकल्पातून मिळावीत, ही जनतेची अपेक्षा आहेच; पण ज्या घटकांच्या उन्नतीकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, त्यांना झुकते माप देणे आणि त्यासाठी जेथून महसूल उभा करता येईल तेथे नेमका हात घालतानाही त्यांचे चटके बसणार नाहीत, याची काळजी घेण्याची खुबीदार कसरत सरकार कसे करणार, याकडेही जनतेचे लक्ष असणार आहे.

आजवरच्या प्रत्येक अर्थसंकल्पाने पुढील वर्षाच्या संकल्पांचे एक स्वप्नचित्र रंगविले. दरवर्षी या निमित्ताने आव्हाने आणि समस्यांवर मात करण्याचा संकल्प सोडला जातो आणि अपेक्षेप्रमाणेच साचेबद्ध प्रतिक्रिया व्यक्त होतात. सामान्यांच्या तोंडाला पाने पुसणारा, गरिबाला अधिक गरीब करणारा आणि श्रीमंतांची तिजोरी भरणारा अर्थसंकल्प, नव्या बाटलीत जुनी दारू, अशा ठरावीक प्रतिक्रिया विरोधकांनी व्यक्त करायच्या. तर, विकासाला चालना देणारा, सामान्यांना दिलासा देणारा, समाजाच्या प्रत्येक घटकाची काळजी वाहणारा अशा शब्दांत सत्ताधाऱ्यांनी अर्थसंकल्पावर स्तुतिसुमने उधळायची. 'रुपया असा आला आणि असा गेला' छाप विश्लेषणाशी सामान्य माणसाच्या खिशात येणाऱ्या आणि जाणाऱ्या रुपयाचा काडीचाही संबंध राहात नाही, हे वास्तव आहे. दैनंदिन जगणे सुकर करणाऱ्या पायाभूत सुविधा, नव्या करांचा बोजा, महागाई अशा जेमतेम ढोबळ चिंतेपुरतेच सामान्य माणसाचे अर्थसंकल्पावर लक्ष असते. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी लोकांच्या हाती पैसा खेळता राहिला पाहिजे, हा अर्थशास्त्राचा एक सामान्य सिद्धान्त असतो. लोकांच्या हाती पैसा असेल तर त्यांची क्रयशक्ती वाढते, खर्च करण्याची सवय वाढते आणि बाजारपेठांतील मागणी वाढून उत्पादनास चालना मिळते. उत्पादन वाढले की रोजगाराच्या संधी वाढतात आणि रोजगारांमुळे पुन्हा लोकांच्या हाती पैसा खेळू लागतो, हे सामान्य सूत्र नेमके जाणून महाराष्ट्राच्या विकासाच्या आणि नव्या संधींच्या काही प्रस्तावित योजना अर्थव्यवस्थेस चालना देणाऱ्या ठरतील, असे अपेक्षाचित्र अलिकडच्या फडणवीस सरकारच्या धोरणांतून दिसू लागले आहे. दावोस परिषदेत झालेले गुंतवणुकीचे करार पाहता, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील पायाभूत सुविधांचा विकास हा आगामी वर्षातील प्राधान्याचा मुद्दा राहणार आहे. यासाठी राज्याच्या तिजोरीवरील अर्थहीन अर्थभाराचा बोजा हलका करण्याकरिता काही योजना खुबीने आखाव्या लागतील. लाडकी बहीण योजना हा महिलांच्या सक्षमीकरणाचा चांगला प्रयत्न असला, तरी त्यामध्ये झालेल्या घुसखोरीचा मोठा फटका राज्याच्या तिजोरीवर बसला आहे. म्हणूनच या योजनेची संपूर्ण फेररचना करावी लागेल. शेतकऱ्यांच्या समस्या, कुपोषण, आरोग्य सुविधांचा अभाव आदी काही बाबी महाराष्ट्राच्या मानगुटीवर दीर्घकाळापासून ठाण मांडून राहिलेल्या आहेत. प्रत्येक अर्थसंकल्पात त्यावर काही उपाययोजनांच्या घोषणा होतात. पण भळभळत्या जखमा केवळ फुंकर मारून बऱ्या होत नाहीत. त्यासाठी जालीम उपचारांचीच गरज असते. निवडणुका वगैरेंच्या हंगामात असे कठोर निर्णय लादल्यास ते पचविणे राजकीयदृष्ट्या अवघड असते. आता फडणवीस सरकारचा पुढचा कार्यकाळ राजकीयदृष्ट्या बराचसा निर्धोक झालेला असल्याने, विकासाच्या योजनांना प्राधान्य देण्यासाठी काही लोकानुनयी योजनांची कठोर छाननी आणि फेरआखणी करण्याची संधी यातून साधली जाईल. केवळ भाषणे, घोषणा, प्रतिज्ञा आणि कागदी योजना सक्षमीकरणासाठी सक्षम नाहीत. त्यासाठी जनतेची क्रयशक्ती वाढली पाहिजे, हे ओळखून विकास योजनांना प्राधान्य दिले, तर रोजगाराच्या संधी वाढून जीवनमान उंचावण्यास हातभार लागतो. यंदा फडणवीस सरकार त्यावर लक्ष केंद्रित करेल, अशी अपेक्षा आहे.

आणखी दोन दिवसांनी राज्यात जागतिक महिला दिन राज्यात साजरा होईल. केवळ भाषणे, महिला सक्षमीकरणाच्या घोषणा, प्रतिज्ञा आणि कागदी योजना महिलांच्या सक्षमीकरणासाठी सक्षम नाहीत. त्यासाठी महिलांची क्रयशक्ती वाढली पाहिजे. लाडकी बहीण योजनेसोबत महिलांच्या रोजगाराच्या संधींची क्षितिजे विस्तारली, तर ते महाराष्ट्राचे वेगळेपण ठरेल. दिव्यांगांना व्यवसाय करात सूट, करांची थकबाकी असलेल्या व्यापाऱ्यांसाठी अभय योजना आदी योजनांतून सरकारने अर्थव्यवस्थेला गती देण्याचा धाडसी प्रयत्न याआधी फडणवीस सरकारने केला आहे. त्याचा आढावा घेऊन अधिक काही योजना यंदा अपेक्षित आहेत. राज्याचा किंवा केंद्राचा अर्थसंकल्प सादर झाला, म्हणजे सरकारांच्या तिजोरीत प्रत्येक रुपया कसा येतो आणि त्याच्या खर्चाच्या वाटा कशा असतात, याचा मागोवा घेणे क्रमप्राप्तच असते. तिजोरीत येणाऱ्या प्रत्येक रुपयाच्या वाटा अगोदरच नेमकेपणाने ठरवून दिलेल्या असतील आणि तिजोरीतील प्रत्येक रुपयाने कोणत्या वाटेने कोठे जायचे हे अगोदरच विचारपूर्वक ठरलेले असेल, तरच अर्थकारणाला शिस्त लागते. या शिस्तीचे भान ठेवून शेतकरी, महिला, आदिवासी, मागासवर्गीय, ओबीसी यांसह सर्व समाजघटकांच्या सर्वसमावेशक विकासाचे संकल्पचित्र या नव्या अर्थसंकल्पात दिसेल, अशीही अपेक्षा आहे. भरीव भांडवली गुंतवणुकीतून पायाभूत सुविधांचा विकास, सक्षम, कुशल आणि रोजगारक्षम युवा पिढी घडविणारी कौशल्याधारित शिक्षण पद्धती आणि पर्यावरणाचे भान हे राज्याच्या अर्थसंकल्पाचे पंचामृत आहे, असा दावा काही वर्षांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी केला होता. चांद्यापासून बांद्यापर्यंत आणि काजूपासून कापसापर्यंत प्रत्येक पिकाचे उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्याच्या समस्या सोडविण्यासाठी काही निश्चित योजना सरकारकडे आहेत, असेही सांगितले जात होते. भावनिक मुद्यांच्या जंजाळात गुरफटल्यावर रोजच्या जगण्यातील समस्यांची जाणीव काहीशी बोथट होत जाते. पण आता महाराष्ट्र थांबणार नाही ही मुख्यमंत्र्यांचीच प्रतिज्ञा असल्याने आभासी सुखाच्या कल्पना न कुरवाळता किंवा वास्तविकतेचा विसर पाडणाऱ्या कल्पनांचे अवडंबर माजविणाऱ्या भावनिकतेला थारा न देता, खऱ्या समस्यांचा मागोवा घेत, त्यावर फुंकर मारून राज्याबरोबर राज्यातील प्रत्येक समाजघटकाला, प्रत्येक कुटुंबास काही देऊ करण्याचा प्रयत्न स्वप्नचित्रात दिसला, तर त्याचे स्वागतच होईल. राज्यातील सर्व समुदायांतील सर्व घटकांच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही सरकारने सातत्याने दिली आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या योजना परिणामकारकपणे, पारदर्शीपणाने व प्रामाणिकपणे राबविणे, नवीन विशेष योजना आखणे व त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करणे हे महायुती सरकारचे धोरण आहे. सर्व स्वरूपातील सार्वत्रिक दारिद्र्य दूर करून शाश्वत सामाजिक विकास साधणे हे सरकारचे ध्येय आहे, अशी ग्वाही सरकारने विधिमंडळातही अनेकदा दिली आहे. या ग्वाहीची जाणीव कृतिशील योजनांच्या आखणीतून प्रामाणिकपणे प्रतिबिंबित होईल, अशा अपेक्षा करावयास हरकत नाही.

## तंत्रवेध

# राष्ट्रीय सुरक्षेसाठी 'गांडीव एआय'

**डॉ. दीपक शिकारपूर**

भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षेला अधिक सक्षम, वेगवान आणि तंत्रज्ञानाधारित बनवण्यासाठी 'नॅटग्रीड' या राष्ट्रीय गुप्तचर जाळ्याला अधिक बळकट केले असून त्यामध्ये 'गांडीव' या उच्च अचूकतेच्या कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचा समावेश केला आहे. नॅटग्रीड म्हणजे देशातील विविध महत्त्वाच्या माहिती संचांना जोडणारी व्यापक विश्लेषण प्रणाली होय. आधार, पॅन, बँक खाती, मालमत्ता नोंदी, प्रवास इतिहास, दूरसंचार ग्राहक पडताळणी यासह २० पेक्षा अधिक माहिती भांडार एकत्र आणून संशयास्पद हालचालींचे विश्लेषण करण्याचे कार्य या जाळ्यामार्फत केले जाते. आजच्या युगात युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही, तर माहिती तंत्रज्ञान आणि सायबर अवकाशातही तितक्याच प्रबळपणे खेळले जाते. अशा बदलत्या परिस्थितीत भारताने स्वतःची संरक्षण यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी 'गांडीव एआय'सारख्या प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांचा विकास आणि वापर करण्यास सुरुवात केली आहे. महाभारतातील अर्जुनाचे गांडीव हे धनुष्य अचूकता आणि शक्तीचे प्रतीक होते; तसेच हे एआय साधन भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी एक अभेद्य ढाल म्हणून काम करीत आहे. 'गांडीव एआय' हे प्रामुख्याने लष्करी आणि गुप्तचर संस्थांसाठी विकसित केलेले एक अत्यंत प्रगत माहिती विश्लेषण साधन आहे. हे साधन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या विदा (डेटा) संग्रहातून अत्यंत कमी वेळेत शत्रूच्या हालचालींचा वेध घेते. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित शिक्षण आणि विदा विश्लेषणाचे प्रगत तंत्र वापरले गेले आहे. हे केवळ एक सॉफ्टवेअर नसून भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षक आहे.

'आत्मनिर्भर भारत' मोहिमेंतर्गत अशा स्वदेशी साधनांची निर्मिती होणे ही अभिमानाची बाब आहे. यामुळे आपण परकीय तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी करू शकलो आहोत. भविष्यात हे साधन अधिक प्रगत होऊन अंतराळ सुरक्षा आणि आधुनिक युद्धाच्या सर्व आघाड्यांवर भारताचे नेतृत्व करेल. राष्ट्रीय सुरक्षा ही आता केवळ बंदुकांच्या जोरावर नाही, तर बुद्धिमत्तेच्या आणि अचूक माहितीच्या जोरावर जपली जाणार आहे. नव्या युगातील अस्त्र म्हणून भारताला जागतिक महासत्ता बनविण्यासाठी नक्कीच बळ देईल. गांडीव ही या जाळ्याची विचारशक्ती मानली जाते. पारंपरिक पद्धतीने वेगवेगळ्या विभागांकडील माहिती स्वतंत्र स्वरूपात साठवली जात होती. त्या माहितीमध्ये परस्परसंबंध शोधणे हे वेळखाऊ आणि कष्टसाध्य काम होते. गांडीव प्रणाली मात्र विविध स्रोतांमधील माहिती एकत्र करून त्यातील नमुने, संबंध आणि विसंगती ओळखते. त्याद्वारे एखाद्या व्यक्तीचे आर्थिक व्यवहार, प्रवासाची वारंवारता, संपर्क जाळे किंवा मालमत्तेतील बदल यांचा परस्परसंबंध तपासून संभाव्य धोक्यांचा अंदाज आधीच बांधता येतो.




आर्थिक गुन्हेगार सहसा अत्यंत क्लिष्ट मार्गांनी पैसे लंपास करतात. 'गांडीव एआय' अशा गुंतागुंतीच्या व्यवहारांचा मागोवा घेण्यासाठी हुशारीने कार्य करते. सर्वप्रथम ते संशयास्पद व्यवहारांचा शोध घेते. हे साधन बँकिंग प्रणालीतील लाखो व्यवहारांचे रिअल-टाइम (तत्काळ) विश्लेषण करते. एखाद्या खात्यातून अचानक होणारे मोठे व्यवहार किंवा अनोळखी ठिकाणांहून होणारे लॉगिन यावर हे साधन लक्ष ठेवते. एखादा व्यवहार सामान्य वर्तणुकीपेक्षा वेगळा वाटल्यास हे साधन त्वरित इशारा देते. त्यानंतर ते मनी लॉण्ड्रिंग प्रतिबंध करते. अवैध मार्गाने कमावलेला पैसा कायदेशीर दाखविण्यासाठी गुन्हेगार पैशांचे अनेक स्तर तयार करतात. 'गांडीव एआय' या पैशांच्या प्रवासाचा माग काढते. त्याचबरोबर क्रेडिट कार्ड आणि विमा फसवणुकीवर नियंत्रण ठेवण्याचे काम करते. अनेकदा बनावट कागदपत्रांच्या आधारे विमा हप्ते लाटणे किंवा क्रेडिट कार्डचा चुकीचा वापर करणे असे प्रकार घडतात. 'गांडीव एआय' अर्जदाराची पृष्ठभूमी आणि जुन्या नोंदी तपासून फसवणुकीची शक्यता वर्तवते. ते केवळ माहिती साठवत नाही तर माहिती समजूनही घेते. कार्यपद्धती विदा संकलन, जोखीम मूल्यांकन आणि अचूक अंदाज या तीन मुख्य स्तरांवर चालते. विदा संकलनामध्ये बँका, शेअर बाजार आणि डिजिटल वॉलेटमधून मिळणारी माहिती संकलित केली जाते.

पुढील प्रक्रियेमध्ये जोखीम मूल्यांकनमध्ये प्रत्येक व्यवहाराला एक धोका गुणांक दिला जातो. हा गुणांक ठरावीक मर्यादेच्या पलीकडे गेल्यास संबंधित व्यवहार रोखला जातो. अचूक अंदाजात ऐतिहासिक विदा वापरून भविष्यात कोणत्या प्रकारचे सायबर हल्ले किंवा फसवणूक होऊ शकते, याचा अंदाज आधीच वर्तविला जातो. 'गांडीव एआय'मुळे बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राला बरेच फायदे होतात. सविस्तर माहिती आणि त्वरित प्रतिसाद हे या प्रणालीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. त्यामुळे यात फसवणूक झाल्यानंतर तपास करण्यापेक्षा ती घडत असतानाच रोखणे शक्य होते. ही प्रणाली वापरल्यामुळे अत्यंत कमी मनुष्यबळ लागते आणि वेळेतही मोठी बचत होते. एखादे काम करण्यासाठी हजारो कर्मचाऱ्यांनाही काही दिवस लागू शकतात, ते काम ही एआय प्रणाली काही सेकंदात करते. या प्रणालीमुळे मोठी अचूकता साधता येते. मानवी चुकांमुळे एखादा संशयास्पद व्यवहार नजरेतून सुटू शकतो, पण एआय सूक्ष्म विसंगतीही शोधते. शिवाय आर्थिक व्यवहार सुरक्षित झाल्यामुळे सामान्य नागरिकांचा डिजिटल प्रणालीवर विश्वास वाढतो. या प्रणालीचा उपयोग देशातील ११ केंद्रीय संस्थांकडून केला जातो.

गांडीव प्रणाली हीच प्रक्रिया सुलभ करते. देशात डिजिटल व्यवहार आणि ऑनलाईन सेवा वाढत असताना आर्थिक व सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. लाखो कोटी रुपयांची फसवणूक, बनावट खात्यांद्वारे निधी वळवणे, आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या आडून बेकायदेशीर हालचाली करणे अशा अनेक घटना घडत आहेत. या पृष्ठभूमीवर नॅटग्रीडसारखी एकात्मिक माहिती प्रणाली अत्यावश्यक ठरते. एखादी संशयित व्यक्ती वेगवेगळ्या नावांनी किंवा ओळखपत्रांनी व्यवहार करत असेल तर विविध माहिती भांडारांमधील तपशील जुळवून तिची खरी ओळख निश्चित करता येते. गांडीव प्रणालीचे आणखी महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माहितीतील सूक्ष्म नमुने शोधण्याची क्षमता. अनेकदा गुन्हेगार लहान-लहान व्यवहारांद्वारे मोठा गैरव्यवहार लपवतात. परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित विश्लेषण पद्धती अशा व्यवहारांची वारंवारता, वेळ, रक्कम आणि संबंधित व्यक्तींचे जाळे तपासून संशयास्पद व्यवहार ओळखू शकते. यामुळे तपास यंत्रणांना अधिक नेमकेपणाने कारवाई करता येते. तथापि, अशा व्यापक माहिती संकलन प्रणालीचा विचार करताना गोपनीयता आणि नागरी स्वातंत्र्य याविषयी चर्चा होणे स्वाभाविक आहे. नागरिकांची वैयक्तिक माहिती सुरक्षित राखणे, तिचा गैरवापर टाळणे आणि कायदेशीर चौकटीतच उपयोग करणे ही शासनाची जबाबदारी आहे. कठोर नियंत्रण व्यवस्था, अधिकृत प्रवेशाची मर्यादा आणि नोंदींची तपासणी या माध्यमातून पारदर्शकता राखणे आवश्यक ठरते. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांचा समतोल साधणे हे लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# मोसाद... इस्रायलचे धुरंधर

देश-विदेशातील गुप्तहेर यंत्रणांचे स्वतःचे असे जग आहे. त्या जगात विविध पातळ्यांवर सतत संघर्ष सुरू असतो. 'धुरंधर' चित्रपटामुळे हा संघर्ष काही अंशी जनतेसमोर आला आणि त्या संघर्षातून मिळणारे यश 'ऑपरेशन सिंदूर'ने दाखविले. अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण विरुद्ध आखाती देश असे गुंतागुंतीच्या समीकरणांचे महायुद्ध सुरू आहे. लष्करी तळांवर हवाई हल्ले करता करता, आर्थिक आणि मनोवैज्ञानिक स्तरावर सर्जिकल स्ट्राईक करण्यात सर्वच सहभागी देश अग्रेसर आहेत. मध्य-पूर्वेतील शांतता, आर्थिक स्थैर्य, व्यापार आणि दैनंदिन जीवनमान ढवळून काढणाऱ्या एकमेव घटनेमागे इस्रायलच्या अज्ञात धुरंधरांची किमान ३ ते ४ वर्षांची मेहनत आहे. त्यांचे राष्ट्रप्रेम आणि परिणामकारक रहस्यमयी कारवायांचा वेध घेणे आवश्यक आहे.

इराणच्या सर्वोच्च नेत्यासह त्याचे कुटुंब, प्रमुख सहकारी वगैरे मंडळींना जन्नतमध्ये धाडणाऱ्या हल्ल्याचे नियोजन आता उघड होत आहे. आपल्या रॉ सारखी इराणची मोसाद ही संस्था आहे. गुप्त माहिती व विशेष कार्य संस्था असा अर्थ असलेला 'मोसाद' हा शब्द मूळतः हिब्रू भाषेतील आहे. आक्रमक इस्लामिक राष्ट्रांनी वेढलेल्या इस्रायलच्या राष्ट्रीय सुरक्षेत मोसादची भूमिका नेहमीच राहिली. या संस्थेच्या कारवायांभोवती गूढता, धाडस, वाद आणि राजकारणाचे वलय राहिले आहे. मोसादची स्थापना १९४९ मध्ये इस्रायलचे पहिले पंतप्रधान डेव्हिड बेन गुरीओन् यांच्या पुढाकाराने झाली. हेरगिरीसोबतच जगभरातील ज्यू समुदायाच्या सुरक्षेसाठी मदत करणे, ही मोसादची प्राथमिकता राहिलेली आहे. वर्ष १९६० च्या नाझी अधिकारी ॲडॉल्फ आयखमन पकड मोहिमेनंतर मोसाद चर्चेत आली. १९७२ मध्ये म्युनिच ऑलिम्पिक्स हत्याकांडानंतर ईश्वराचा वाईटाविषयीचा संताप ऑपरेशन अर्थात रॅथ ऑफ गॉड हे १-२ नाही तर जगाच्या कानाकोपऱ्यातील दहशतवाद्यांविरोधात सर्जिकल स्ट्राईक ठरले. त्यानंतर वर्ष १९७६ मध्ये ऑपरेशन एंटेबे करून युगांडातील एंटेबे विमानतळावर ओलिस ठेवलेल्या प्रवाशांची सुटका करण्यात आली. या कारवाईत भावाला गमविणारे बेंजामिन नेतान्याहू यांचा इस्रायलच्या राजकारणात उदय झाला.

इराणमधील अनेक अणुशास्त्रज्ञांवर गेल्या दशकात हल्ले झाले. विशेषतः २०२० मध्ये मोहसिन फख्रीजदेह यांच्या हत्येने जगाचे लक्ष वेधले. तत्पूर्वी २०१८ मध्ये इस्रायलचे पंतप्रधान यांनी जाहीर केले की, मोसादने तेहरानमधून इराणच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित गुप्त कागदपत्रे हस्तगत केली. या दाव्यामुळे इराणची सुरक्षा यंत्रणा आणि नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभे राहिले. या सर्व कारवाया थेट कोण्या एका व्यक्तीवर नसल्या, तरी त्यांच्या धोरणात्मक आधारस्तंभांवर प्रहार करणाऱ्या नक्कीच होत्या. मोसादची कार्यपद्धती अत्यंत गोपनीय असून तांत्रिक गुप्तहेरगिरी, सायबर हेरगिरी आणि मानवी स्रोतांचा गरजेनुसार वापर केला जातो. या संस्थेचा प्रमुख थेट इस्रायलच्या पंतप्रधानांना अहवाल देतो. मोसादच्या अनेक कारवाया आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने वादग्रस्त ठरल्या आहेत.

लक्ष्यित हत्याकांड, परदेशी सार्वभौमत्वाचे उल्लंघन आणि गुप्त कारवाया यांवरून अनेक देशांनी टीका केली तरीही इस्रायलच्या दृष्टीने त्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी आवश्यक मानल्या जातात. इस्रायल-इराण संघर्षाच्या पटावरील अदृश्य मोहरा म्हणजे मोसाद! अमेरिका आणि इस्रायलने नुकत्याच केलेल्या कारवाईमागे मोसाद सक्रिय होते आणि आहे, हे उघड सत्य आहे. या कारवाईची सुरुवात एका रात्रीतून झालेली नाही तर किमान तीन वर्षांपासून मोसादची यंत्रणा कार्यरत असावी, हे तज्ज्ञांचे मत आहे. इराणच्या शहरांमध्ये ट्राफीक कॅमेऱ्यांची यंत्रणा साधारण वर्षभरापासून हॅक झाली होती. इराणवरील हल्ल्यांच्या तासभर आधी मोबाईल टॉवर्सची यंत्रणा हॅक होऊन कोलमडली. महत्त्वाच्या व्यक्तींचे मोबाईल बिझी येऊ लागले. जगभरातील इराणी मुसलमानांना धार्मिक उपक्रमांची, नमाजच्या वेळांची माहिती देणारे 'बद-ए-सबा' नावाचे ॲप अमेरिकन हल्ल्यांनंतर हॅक झाले आणि त्यावरून 'हेल्प इज हिअर' अर्थात मदत तुमच्यापर्यंत पोहोचली आहे, हा संदेश व्हायरल झाला. या सगळ्यांमागे कोणती अदृश्य शक्ती आहे, हे सुज्ञांस सांगणे न लगे! मोसाद ही केवळ गुप्तहेर संस्था नाही, तर इस्रायलच्या अस्तित्वाशी निगडित सुरक्षाकवच आहे. मोसाद म्हणजे राष्ट्र सुरक्षेच्या उद्देशाने चालणाऱ्या अदृश्य युद्धाची कथा जी जगाच्या पडद्यामागे सतत सुरू असते. मध्यपूर्वेतील राजकारण हे उघड युद्धांपेक्षा अधिक धोकादायक अशा छुप्या संघर्षांवर उभे आहे. मोसादचा हा संघर्ष बंदुकीच्या आवाजाशिवाय चालणारे युद्ध आहे, ज्यात गोळ्या दिसत नाहीत; पण परिणाम दूरगामी असतात. मध्यपूर्वेतील स्थैर्य या अदृश्य रणांगणावरच ठरणार आहे, हे नक्की!

९८५०३३९२४०

## दखल

# शरद पवार संपले नाहीत

**मोरेश्वर बडगे**



तुम्ही त्यांच्यावर प्रेम करा किंवा त्यांचा द्वेष करा, त्यांच्या नेटवर्किंगच्या कौशल्याबद्दल अचंबित व्हा किंवा ते कोणतीही गोष्ट मॅनेज करू शकतात म्हणून त्यांना मोडीत काढायचा प्रयत्न करा, पण देशाच्या राजकारणातून तुम्ही त्यांना बाजूला ठेवू शकत नाही. ही व्यक्ती म्हणजे शरद पवार. घटक पक्षांचा कडाडून विरोध असतानाही राज्यसभेची उमेदवारी खेचून शरद पवारांनी आपला दम दाखवून दिला. पवारांना उमेदवारी दिली नाही तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेम करतील आणि त्यात महाविकास आघाडीची मतं फुटतील या भयापोटी उद्धव ठाकरे आणि काँग्रेस शरण गेली. महाराष्ट्राच्या राजकारणाचा पट तर शरद पवार यांच्या भोवतीच गेली सहा दशके फिरत आहे. वयाच्या ८५ व्या वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाचा हा वयोवृद्ध नेता तिसऱ्यांदा बिनविरोध राज्यसभेवर जायला सज्ज झाला आहे. १९६७ मध्ये शरद पवार पहिल्यांदा आमदार झाले. तेव्हापासून सुरू त्यांची संसदीय कारकीर्द अखंड सुरू आहे. महाराष्ट्रात असताना शरद पवारांना स्वबळावर कधीही सरकार बनवता आले नाही. आताही ज्या महाविकास आघाडीने त्यांना राज्यसभेची उमेदवारी दिली आहे, त्या आघाडीमध्ये त्यांचे फक्त १० आमदार आहेत. हा माणूस काहीही करू शकतो या गोष्टीला राज्यसभेच्या त्यांच्या उमेदवारीने बळ मिळाले आहे. जेव्हा जेव्हा पवार संपले अशी परिस्थिती निर्माण होते तेव्हा तेव्हा पवार नव्या जोमाने उभारी घेताना दिसतात. आज तेच घडतंय का?

राज्यसभेच्या सात जागांसाठी महाराष्ट्रात १६ मार्च रोजी निवडणूक आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची ५ मार्च अखेरची मुदत होती. सात जागांपैकी सहा जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून जाणार आहेत. महाविकास आघाडीच्या वाट्याला केवळ एक जागा येणार आहे. तीही महाविकास आघाडी एकसंध राहिली तर! दोन दिवस आधीपर्यंत रणकंदन माजले होते. आदित्य ठाकरे यांनी या जागेवर दावा सांगितला होता. राज्यसभेतले विरोधी पक्षनेतेपद टिकविण्यासाठी काँग्रेसला ही जागा पाहिजे होती. आमचा पक्ष राष्ट्रीय आहे, असे विजय वडेट्टीवार सांगायचे. राज्यसभेत विरोधी पक्षनेत्याच्या पदावर दावा करायचा तर किमान २५ खासदार हवेत. सध्या राज्यसभेत काँग्रेसचे २७ खासदार आहेत. यात काही निवृत्त होत आहेत. सध्याचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांची मुदत जूनमध्ये संपते. काँग्रेसला ते टेन्शन होते. राज्यसभेच्या बदल्यात विधान परिषद घ्या, अशी ऑफर काँग्रेसने उद्धव ठाकरेंना दिली होती. महाविकास आघाडीकडे एकूण ४६ मतं होती आणि जिंकण्यासाठी ३७ मतांचा कोटा होता. एकच उमेदवार निवडून येऊ शकत होता. त्यासाठी तिन्ही पक्षांचे एकमत हवे होते. उबाठा आणि काँग्रेस, दोघेही दोन दिवस आधीपर्यंत जागा सोडायला तयार नव्हते. दोन राष्ट्रवादीचे विलीनीकरण झाले तर शरद पवार एनडीएसोबत जातील, याची त्यांना भीती होती. अशा परिस्थितीत शरद पवारांच्या कन्या खासदार सुप्रिया सुळे 'ॲक्शन मोड'वर आल्या आणि पाहता पाहता चित्र बदलले. त्यांनी आधी दिल्लीत राहुल गांधी यांच्याकडे फिल्डिंग लावली. नंतर उद्धव ठाकरे यांना त्यांच्या 'मातोश्री'वर भेटल्या. पवार एनडीएमध्ये जाणार नाहीत, याची हमी दिली. 'विलीनीकरणाचा प्रश्नच आता उद्भवत नाही' असे राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी जाहीर केले तेव्हा उद्धव ठाकरे आणि दिल्लीतले काँग्रेस हायकमांड राजी झाले. शरद पवार उमेदवार नसतील तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गेम करू शकतात ही भीतीही होतीच. त्यामुळे २४ तासात उद्धव ठाकरे आणि काँग्रेसने निर्णय फिरवला. तलवारी म्यान झाल्या. पण काय वेळ आली पहा शरद पवारांवर. नियतीचा खेळ पहा. या पवारांनी अनेकांना आमदार केले. अनेकांना खासदार केले. आज त्यांनाच एका खासदारकीसाठी एवढे अगतिक होण्याची वेळ आली. 'कुणी राज्यसभा देता का राज्यसभा?' असे ओरडून मागण्याची वेळ त्यांच्यावर का आली? शरद पवारांना या वयात राज्यसभेवर कशाकरिता जायचे आहे? शरीर थकले असले तरी म्हाताऱ्या पवारांचा मेंदू ठणठणीत आहे. खासदारकी खिशात नसेल तर कोणी विचारणार नाही, हे त्यांना चांगले ठाऊक आहे. आता राज्यसभेवर आले तर पक्षाच्या संसदीय पक्षाचे ते नेते असतील. त्यांच्या राष्ट्रवादीचे आठ खासदार आहेत. हे खासदार कधीही भाजपमध्ये पळतील याचे टेन्शन असणारच. अजितदादांच्या मृत्यूनंतर राजकारण खूप बदलले आहे. शरद पवारांना दोन राष्ट्रवादीचे विलीनीकरण हवे होते. त्या आडून त्यांना दोन्ही राष्ट्रवादीचा ताबा हवा होता. दादा अचानक गेल्याने सारे फिस्कटले. अजितदादांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी चौथ्याच दिवशी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेऊन आपल्याला सासऱ्याच्या सापळ्यात अडकायचे नाही, हे दाखवून दिले. सुनेत्रा यांचा मुलगा पार्थ याला शरद पवारांनी कधीही ताकद दिली नव्हती. त्यामुळे आता पार्थ शरद पवारांच्या नादी लागायचा प्रश्न नाही. पवारांपुढे अनेक प्रश्न आहेत. धड उठता येत नाही, ते काय बोलले ते समोरच्याला कळत नाही. या महिन्यात शरद पवार दोनदा रुग्णालयात भरती झाले होते. नातवंडांना खेळवण्याचेही त्यांचे वय संपले आहे. 'आता निवडणूक लढवणार नाही' असे त्यांनी नातू युगेन्द्रच्या प्रचारात जाहीर सभेत सांगितले होते. तरीही सत्तेचा मोह संपत नाही.

काही का असेना, पवारांच्या उमेदवारीमुळे राज्यसभा निवडणूक बिनविरोध होते आहे. भाजपाने चार जागांसाठी केंद्रीय सामाजिक न्याय खात्याचे राज्यमंत्री रामदास आठवले, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, नागपूरच्या माजी महापौर माया इवनाते आणि मराठवाड्यातले माजी आमदार रामराव वडकुते यांना संधी दिली. देताना पुन्हा एकदा धक्कातंत्राचा वापर केला. दलित-आदिवासी, मराठा-ओबीसी हा जातीच्या समीकरणांचा तसेच प्रादेशिकतेचाही समतोल साधला आहे. वडकुते आणि इवनाते ही दोन्ही नावे अनपेक्षित होती. इवनाते या आदिवासी नेत्या आहेत. नागपूरच्या महापौर राहिल्या आहेत. वडकुते हे हिंगोलीचे धनगर समाजातले आहेत. पक्षाने तब्बल २८ नावं हायकमांडकडे पाठविली होती. त्यातून हे माणिकमोती हाती लागले आहेत. नगरसेवक ते खासदार हा प्रवास भाजपामध्येच होऊ शकतो याची पुन्हा एकदा प्रचीती आली. आपण राष्ट्रपती होऊ हे द्रौपदी मुर्मू यांनी स्वप्नातही पाहिले नव्हते. भाजपा तळागाळातल्या कार्यकर्त्यांना उचलतो हा संदेश पुन्हा एकदा देशभर गेला आहे. २०१९ मध्ये तिकीट नाकारल्यानंतर तावडे हे राज्यातून फेकले गेल्यासारखे होते. तरीही हिंमत न हारता या मराठा नेत्याने दिल्लीची वाट धरली. पक्ष संघटनेत काम सुरू ठेवले. फिनिक्स पक्ष्यासारखी त्यांची भरारी आहे. ज्याचे तिकीट कापले तो आता तिकिटं वाटू लागला. ५-६ वर्षे तोंडावर बोट ठेवून पक्षासाठी मेहनत घेतल्याचे फळ त्यांना उमेदवारीच्या रूपात मिळाले. दलित चळवळीतला यशस्वी नेता म्हणून रामदास आठवले यांच्याकडे पाहिले पाहिजे. एकूणच या यादीने बिनविरोध निवडणुकीचा मार्ग प्रशस्त केला, असेच म्हणावे लागेल.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### संस्कृती आणि परंपरा

भारतीय सण, परंपरा आणि इतिहास यांवर तरुण भारतात प्रकाशित होणारे लेख अत्यंत माहितीपूर्ण असतात. आम्ही तरुण भारतमधील लेख सातत्याने वाचतो. अशा लेखांमुळे आपल्या संस्कृतीचा अभिमान वाटतो. त्यातून तरुणांना बरेच काही शिकायलाही मिळते. भविष्यात स्थानिक लोकपरंपरा आणि विस्मृतीत गेलेल्या व्यक्तींवर लेखमाला सुरू करावी. वैविध्य वैचारिक उपक्रम वृत्तपत्राच्या माध्यमातून राबवावेत, असे वाटते.

**संदीप रुपनवार**/पुणे

● ● ● ●

### संपादकीय स्तंभाचे कौतुक

तरुण भारतचा संपादकीय स्तंभ अभ्यासपूर्ण आणि मुद्देसूद असतो. तसाच तो थेट प्रहार करणारा असतो. कोणतीही मिळमिळीत भूमिका नसल्याने आम्हाला तो आवडतो. राष्ट्रीय घडामोडींवर स्पष्ट भूमिका मांडल्यामुळे वाचकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. निष्पक्षता आणि राष्ट्रहित या दोन मूल्यांची जपणूक तरुण भारतने केली आहे. या पुढेही व्हावी, ही अपेक्षा!

**मुरली देशपांडे**/पुणे

● ● ● ●

### महाराष्ट्राचे वृत्तपत्र व्हावे

आश्वासित केल्याप्रमाणे, नरकेसरी प्रकाशनाचा आपल्या तरुण भारताचा पहिला अंक आज सकाळी दारात पाहून अतिशय आनंद झाला आणि भरघोस २० पानी अंक आधाशासारखा वाचला. वाचनीय अग्रलेख व इतर लेख ही विशेषता या पहिल्या अंकातही तभाने जपली आहे, हे प्रथमदर्शनी जाणवले. पुण्यात आलेल्या नागपूरच्या तभा प्रतिनिधींनी वार्षिक वर्गणीदार बनवायला पुण्यातील वैदर्भीयांशी संपर्क केला होता. पण, पहिल्या अंकात विदर्भातील बातम्या नसल्याचे जाणवले. ही सुरुवात आहे, यथावकाश बुलढाणा ते गोंदिया जिल्ह्यातील बातम्या पुणे तभात येतील, अशी खात्री वाटते. विदर्भातीलच कशाला? पुण्या-मुंबईसह, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, कोकण अशा सर्व भागातील बातम्या राष्ट्रीय बातम्यांसह तभात येऊन तभा महाराष्ट्राचे वृत्तपत्र व्हावे, या सदिच्छेसह!

**दीपक एदलाबादकर**/९९२१५२७९१६

● ● ● ●

### ब्रिटनमधील लोकशाही...

ब्रिटनचे किंग चार्ल्स यांचे भाऊ माजी राजपुत्र अँड्र्यू माऊंटबॅटन विंडसर यांना तेथील पोलिसांनी अटक केली. लैंगिक गुन्हेगार एपस्टिन यांचेशी संबंध असल्याच्या संशयावरून झालेल्या या अटकेबाबत किंग चार्ल्स यांनी 'कायद्याला आपले काम करू द्या' अशी प्रतिक्रिया देऊन ब्रिटनमधील लोकशाहीला बळकटी दिली आहे. जगातील इतर लोकशाही देशापुढे एक आदर्श घालून दिला आहे. खरी लोकशाही ब्रिटनमध्ये राबविली जात आहे, असे वाटते.

**ॲड. बळवंत रानडे** /पुणे-९८८१४७३५८०

### हिंसाचार घातकच

महिलांनी कौटुंबिक अत्याचाराला बळी पडू नये, समाजामध्ये कौटुंबिक हिंसाचार घडू नये म्हणून केंद्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा संपूर्ण भारतात लागू केला आहे. आज २० वर्षे झाली तरी महिलेच्या कौटुंबिक व सामाजिक हिंसाचाराच्या घटना कमी झालेल्या नाहीत; उलट वाढतच आहेत. कारण हे कायदे अजूनही समाजातील तळागाळातील महिलांपर्यंत पोहोचलेले नाहीत. काही महिला बदनामीच्या भीतीने पुढे येत नाहीत. ज्या पुढे येतात त्यातील तपासात अधिकारी बऱ्याच त्रुटी ठेवतात कायद्याची माहिती सर्व थरातील महिलांपर्यंत पोहोचावी म्हणून जनजागृती मेळावे, चर्चा, परिषदा होणे गरजेचे आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/ ९४२१३१२२४४

● ● ● ●

### भारताने धडा घ्यावा

अमेरिका आणि इस्रायलच्या फौजांनी केलेल्या भ्याड हल्ल्यामध्ये इराणचे सर्वोच्च धार्मिक नेता अयातुल्ला खामेनेई, त्यांच्या कुटुंबातील लोक व सैन्यातील विविध अधिकारी मारले गेले. जगातील जो देश किंवा नेता अमेरिकेच्या हितसंबंधांमध्ये अडथळा निर्माण करतो त्याचा परिणाम काय होतो, हे अनेकदा दिसून आले आहे. इराण हे त्याचे ताजे उदाहरण आहे. हे हल्ले करताना इराणमधील 'जुलमी' सरकार उलथवून तेथे 'लोकशाही'चे सरकार स्थापन करण्याची केलेली घोषणा म्हणजे नैतिकतेचे ओढलेले पांघरूण आहे. मोदी सरकार भारतहिताला प्राधान्य देत आहे. ते अमेरिकेला पसंत पडत नाही. उद्या अमेरिकेसारखे स्वयंघोषित जागतिक फौजदार भारतालाही आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची शक्यता आहे. इराणमधील फुटीर गटांनी अमेरिकेला या हल्ल्यात मदत केली, तशीच मदत भारतातील भारतविरोधी शक्ती अमेरिकेला करू शकतात. भारताने सावध राहण्याची गरज आहे.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

### भारत-नेपाळ खो-खो कसोटी मालिकेसाठी निवड समितीवर ॲड. गोविंद शर्मा

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

भारत-नेपाळ खो-खो पुरुष व महिला कसोटी मालिका येत्या मार्च महिन्यात खेळविण्यात येणार असून त्यासाठी भारतीय संघाची निवड करण्यासाठी भारतीय खो-खो महासंघाचे सरचिटणीस उपकार सिंग विर्क यांनी निवड समिती जाहीर केली असून त्यात महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे खजिनदार ॲड. गोविंद शर्मा (छत्रपती संभाजीनगर) यांचा समावेश आहे. या समितीचे नेतृत्व अध्यक्ष सुधांशू मित्तल हे चेअरमन म्हणून करणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सरचिटणीस उपकार सिंग विर्क, खजिनदार ॲड. शर्मा, संजीव शर्मा (चंदीगड), विकास हुडा (प्रशिक्षक), संजीव कुमार (दिल्ली), सुनिता राणी (गुजरात), नीतू राणी (पंजाब), सुषमा सारोलकर (मध्य भारत), एम. नटराजन (कर्नाटक) आणि नेताई कर (पश्चिम बंगाल) हे सदस्य म्हणून काम पाहणार आहेत. स्पोर्ट्स अथॉरिटी ऑफ इंडिया प्रादेशिक केंद्र, गान्धीनगर (गुजरात) येथे ६ आणि ७ मार्च रोजी खेळाडूंच्या कौशल्याची सखोल चाचणी घेतली जाईल.





### सह्याद्री फार्मसीच्या क्रीडा स्पर्धा जल्लोषात

**सांगोला, दि.५ मार्च -**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी मेथवडे येथे क्रिकेट, हॉलीबॉल, बॅडमिंटन, थ्रो-बॉल, रस्सीखेच, कब्बडी या क्रीडा स्पर्धा जल्लोषात झाल्या. याचे उदघाटन संस्थेच्या अध्यक्षा अनिता इंगवले, विश्वस्त विश्वजित इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भरघोस प्रतिसादामुळे सर्व स्पर्धेत रंगत येऊन त्या अतिशय रोमांचकारक, थरारक, अटीतटीच्या झाल्या. विजेत्या संघास व विद्यार्थ्यास ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धांसाठी सुनील भोरे, डी.के.पाटील, राहुल इंगवले, संतोष निंबाळकर, संतोष सावळगी, कुलभूषण देशमुख, अमोल पवार, प्रशांत बुरांडे हे परीक्षक म्हणून लाभले. क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी कॉलेज क्रीडा विभागप्रमुख प्रा.पी.पी.कोडग, प्रा.ए.व्ही.सपाटे आदींचे योगदान लाभले.

### ॲथलीजर आणि स्पोर्ट्सवियर झोन सादर

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

फिनिक्स मार्केटसिटी पुणे आता शहरातील स्पोर्ट्स आणि ॲथलीजर खरेदी अनुभव आणखी सोपा आणि आनंददायी बनवत आहे. कारण अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे स्टोअर्स आता एका ठिकाणी उपलब्ध आहेत. यामध्ये नाइकी, ॲडिडास, असिक्स, स्केचर्स यांचे प्रमुख फ्लॅगशिप स्टोअर्स आहेत, तसेच न्यू बॅलन्स, रिबॉक, प्यूमा, एक्सस्टेपसारखे ब्रँड्स देखील येथे आहेत. या नवीन झोनमुळे पुण्यातील खरेदीदारांना स्पोर्ट्स आणि ॲथलीजर उत्पादनांचे अनेक पर्याय एकाच ठिकाणी मिळतात याबद्दल बोलताना, अंशुमन भारद्वाज, सिनिअर सेंटर डायरेक्टर, फिनिक्स मॉल्स पुणे म्हणाले, फिनिक्स मार्केटसिटी पुणे नेहमीच असे अनुभव देण्यावर लक्ष केंद्रित करत असते जे शहरासाठी उपयुक्त आणि महत्त्वाचे आहेत.

# खुल्या गटात सौरव शाहू विजेता; शिवछत्रपती चषक' बुद्धिबळ स्पर्धा

### महिला गटात प्रेरणा पवारची बाजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त छत्रपती शंभूराजे बहुउद्देशीय संस्था, श्री. रामराव शिंदे मित्र परिवार, सोलापुर चेस अकॅडमी व सोलापूर चॅम्प स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित केलेल्या 'शिवछत्रपती चषक' बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात आंतरराष्ट्रीय गुणांकनप्राप्त सौरव साहू याने सात पैकी साडेसहा गुण प्राप्त करत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

येथील अग्रमानांकित श्रेयांस शहा, बारामतीचा शौर्य बोंडवे व बार्शीचा शंकर साळुंके यांचे प्रत्येकी सहा गुण झाल्यामुळे सरस बुचोल्स गुणपद्धतीवर श्रेयांस, शौर्य व शंकर यांनी अनुक्रमे द्वितीय, तिसरा व चौथा क्रमांक पटकाविला. तसेच १५ वर्षे वयोगटात लातूरच्या राघव भंडारगे यानेउत्कृष्ट खेळ करत जेतेपद मिळविले. महिला गटात प्रेरणा पवार व सान्वी गोरे यांचे प्रत्येकी पाच गुण झाल्यामुळे सरस टाय-ब्रेकमध्ये प्रेरणाने अव्वल व सान्वीने द्वितीय स्थान प्राप्त केले.

११ वर्षाखालील निवड स्पर्धेत सोलापूरचा आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त श्रेयस कुदळे याने आकर्षक खेळ करत सहा पैकी साडेपाच गुणांसह व बार्शीची पृथा ठोंबरे हिने पाच पैकी पाच गुण मिळवीत उल्लेखनीय कामगीरी करत जेतेपद पटकाविले तर सिद्धांत कोठारी व ओजस्वी बोराळे यांनी चांगला खेळ करत दुसरे स्थान मिळवीत जिल्हा संघातील आपले स्थान पक्के केले. तसेच विविध वयोगटात नियान कंदीकटला, लखित काबरा, मंगळवेढ्याची संस्कृती जाधव, ज्ञानदा सांगुळे यांनीदेखील सुरेख खेळ करत ९ व ७ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात प्रथम क्रमांक प्राप्त केला.




टाकळीकर मंगल कार्यालय येथे संपन्न झालेल्या या स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोलापूर महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेचे जिल्हाध्यक्ष रामराव शिंदे, मातोश्री लक्ष्मीबाई पाटील पतसंस्थेचे माजी चेअरमन राजन ढवण, बार्शीचे दत्तात्रय गोरे, टाकळीकर मंगल कार्यालय समूहाच्या व्यवस्थापिका नीलम उपाध्ये, आंतरराष्ट्रीय पंच व संस्थेचे सचिव सुमुख गायकवाड, आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त अतुल कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच संतोष पाटील यांनी केले.

विजेत्या खेळाडूंना 'शिवछत्रपती चषक', मेडल्स व रोख पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. विजेत्या ७५ खेळाडूंना एकूण रु. ३० हजाराची पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे यांनी तर सहाय्यक म्हणून वरिष्ठ राष्ट्रीय पंच रोहिणी तुम्मा-राठी, विजय पंगुडवाले, जयश्री कोंडा, प्रज्वल कोरे, यश इंगळे व पद्मजा घोडके यांनी काम पाहिले. विजेत्या खेळाडूंचे सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांनी अभिनंदन केले.

**अंतिम निकाल**
**(अनुक्रमे गुण व बोकोल्स गुणांसह)**

**खुला गट :** सौरव साहू - ६.५, श्रेयांश शहा- ६(३०.५), शौर्य बोंडवे- ६(२६), शंकर साळुंके- ६(२५), सानिध्य जमादार- ५(२९.५), विशाल पटवर्धन- ५(२९), चंद्रशेखर बसरगीकर- ५(२८), देवदत्त पटवर्धन-५(२६.५), ओंकार कार्वेकर- ५(२५), नितीन अग्रवाल- ५(२४).

**महिला गट :** प्रेरणा पवार -५(३०), सान्वी गोरे- ५(२९.५), समृद्धी मक्तेदार- ४.५, सृष्टी गायकवाड-४(२७.५), पलक टकले - ४(२४.५), श्रीनिधी शाबादे - ४(२३), विद्या वास्कर - ४(२२.५), स्वरा कस्तुरे - ३(२५), श्रावणी मुत्येलू - ३(१९), आरोही दलाल - ३(१८.५).

**१५ वर्षे वयोगट :** राघव भंडारगे ६, वेदांत मुसळे- ५.५, अदिराज म्हेत्रे- ५(२९), आयुष जानगवळी- ५(२७.५), विहान कोंगारी- ५(२५), प्रवीर देशमुख- ४.५, सार्थक राऊत- ४(२९), होरम थेंमझन- ४(२६.५), आदित्य डोके- ४(२५), शार्विल डांगे- ४(२४.५).

**११ वर्षे मुले :** श्रेयस कुदळे - ५.५, सिद्धांत कोठारी- ५(२१), हिमांशू व्हनगावडे- ५(२०), वेदांत पांडेकर- ५(१९), प्रतीक हलमल्ली- ५(१७.५), नचिकेत तोंडले- ५(१७), हर्ष जाधव- ४.५(२२.५), प्रथम मुदगी- ४.५(१९), श्रेयश इंगळे- ४.५(१६.५), नैतिक होटकर- ४(२२). **मुली :** पृथा ठोंबरे ५, ओजस्वी बोराळे- ४(१७), सृष्टी मुसळे - ४(१४), आर्वी सदाफुले - ४(११), अनुश्री कुमठेकर - ३(१६), आहाना शेख - ३(१५), तेजस्विनी कांबळे - ३(१४), समृद्धी कसबे - ३(१३), श्रुती बनसोडे - ३(१२), स्वराली बिराजदार - ३(११)

**९ वर्षे मुले:** नियान कंदीकटला - ४(२०.५), नमन रंगरेज - ४(१९), कृष्णराज पटाले - ४(१६), रिषभ पामनानी - ४(१५.५), विवेक स्वामी - ३(२०). **मुली :** संस्कृती जाधव ४, हर्षा क्षीरसागर - ३(१३), इशा पटवर्धन - ३(१२), समिधा चंदनशिवे - २(११), श्रीशा हरसुर - २(१०).

**७ वर्षे मुले:** लखित काबरा - ३(१७), आरुष माने - ३(१६.५), विराज शेंडगे - २(१६), अजान शेख- २(१४), मिथिलेश होर्टिकर- २(१३). **मुली :** ज्ञानदा सांगुळे - ३(११), अनन्या गाडे १.

**उत्तेजनार्थ:** ऋग्वेद करजगीकर, वेदिका घरबुडवे, स्वरा दंतकाळे, संदेश गायकवाड, शिवरत्न गोरे

# खेळाडू विद्यार्थ्यांचे ग्रेस गुण प्रस्तावाचे शुल्क रद्द करा

### क्रीडा शिक्षक महासंघाचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

दहावी व बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्यांची ग्रेस गुणाचे प्रस्ताव सादर करण्यासाठी जे शुल्क आकारले जात आहे ते रद्द करावे. यासह १२ मागण्यांचे निवेदन क्रीडाशिक्षक महासंघाच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना देण्यात आले. याप्रसंगी महासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.संतोष खेंडे, शहर अध्यक्ष सुहास छंचुरे, उपाध्यक्ष वसीम शेख, सहसचिव रवींद्र चव्हाण, श्रीधर गायकवाड, प्रबुद्ध चिंचोलीकर, संतोष पाटील, जोएल जाधव आदी उपस्थित होते



### पूर्णवेळ जिल्हा क्रीडाधिकारी द्या

ग्रेस गुणाची फी रद्द करावी, स्क्वॅश खेळाचे नवीन अद्यावत चार कोर्ट तयार करा, खेळाडूंसाठी अद्यावत स्पोर्ट्स हॉस्टेल १०० रूमचे करावे, सिंथेटिक ट्रॅकच्या चारी बाजूने प्रेक्षक गॅलरी करावी, जिम्नॅस्टिक हॉलमध्ये अद्यावत साहित्य घ्यावे, पूर्णवेळ जिल्हा क्रीडाधिकारी भरावा, क्रीडाधिकारी व क्रीडा मार्गदर्शकांची पदे भरावी, शालेय स्पर्धेतील पंचांची मानधन एक हजार रुपये करावे, सोलापुरात विभागीय क्रीडा संकुल असावे, विजापूर रोड वरील जलतरण तलाव सुरू करावे, हॉकीचे ॲस्ट्रोटर्फ मैदान करावे, तसेच जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून स्पर्धेतील खेळाडूंना प्रमाणपत्र, ट्रॉफी व मेडल देण्यात यावे या मागण्यांचा यात समावेश करावा.

### नावात बदल

माझे जुने नाव **शैलजा अजितनाथ खोबरे** असे होते. आता नवीन नाव **शैलजा अजित खोबरे** असे आहे. आता यापुढे नवीन नावाने ओळखण्यात यावे.
पत्ता : १०५/७२, उमा नगरी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर-४१३००१

# कुस्तीगीर संघाच्या निवड चाचणीवर सोलापुरातील पैलवानांचा बहिष्कार

### केवळ शहर स्तरावर चाचणी घेण्याची मागणी

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्यावतीने वाघोली पुणे येथे वरिष्ठ राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा येत्या १८ ते २२ मार्च दरम्यान होत असून या स्पर्धेसाठी उद्या (शुक्रवारी )सहा व सात मार्च रोजी सोलापुरातील घोंगडे वस्ती येथील अथर्व गार्डनमध्ये निवड चाचणी कुस्ती स्पर्धा घेण्यात येणार आहे. परंतु, या स्पर्धेमध्ये शहर व जिल्ह्यातील पैलवानांची निवड चाचणी एकत्र घेण्यात येणार आहे. ती केवळ शहर अंतर्गत व्हावी. त्यासाठी सोलापुरातील तालीम संघाच्यावतीने यावर बहिष्कार टाकण्यात येणार असल्याची माहिती पैलवान युवराज सरवदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यापूर्वी झालेल्या निवड चाचण्या या केवळ शहर अथवा जिल्हा स्तरावर घेण्यात आल्या होत्या. परंतु, आता महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्यावतीने शहर व जिल्हा असे दोन्ही मिळून या चाचण्या एकत्र घेण्यात येत असल्याने शहरातील पैलवान यांच्यावर अन्याय होणार आहे. तो दूर करण्यासाठी ही चाचणी शहर स्तरावर घेण्यात यावी अशी आपली मागणी आहे. अन्यथा ही निवड चाचणी एकत्रित घेण्यात आली तर याला आमचा विरोध असून त्यावर आमचा पूर्णपणे बहिष्कार असेल असे पैलवान सरवदे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस महेश सरवदे, दीपक चौगुले, लक्ष्मण सरवदे, दत्ता शिंदे,कुमार महाडिक, नारायण ईगवे, सचिन दोरकर आदी उपस्थित होते.

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे वैराग परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापुर सब डि. वैराग व तालुका बार्शी पैकी मौजे वैराग येथील बिनशेती गट नं. ४०९/१/अ/५ क्षेत्रफळ १९९.८१ चौ.मी. आकार २० रू. ०० पैसे याचाच नगरपंचायत मिळकत नं. २२०६/११२ याचे मोजमाप उ.द. ४३ फुट, पु.प. ५० फुट याचे एकूण क्षेत्रफळ २१५० चौ.फुट. यांसी चतुःसिमा पुर्वेस- प्लॉट नं. १२, दक्षिणेस -प्लॉट नं. ५१, पश्चिमेस -रस्ता, उत्तरेस-प्लॉट नं. ६. येणेप्रमाणे खुली प्लॉट जागा आतील सर्व तदंगभुत वस्तु व वहिवाटीच्या हक्कासह.

वर नमुद मिळकत हि श्री. रामेश्वर विष्णु जोडवे यांचे खरेदी मालकी व प्रत्यक्ष कब्जेवहिवाटीची आहे. सदर मिळकत त्यांनी त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्री करणेचे ठरविलेले आहे, त्याची माहिती आमचे अशिलास दिली. त्याप्रमाणे सदरहु मिळकतीबाबत खरेदी विक्री संदर्भात बोलणी झालेली असुन सदर मिळकत आमचे अशिलास मालकी हक्काने कायम खुषखरेदी देण्याचे ठरलेले आहे. त्याप्रमाणे आमचे अशिलाकडुन त्यांनी इसारा दाखल रक्कमही स्विकारलेली आहे.

तरीही वर नमुद मिळकतीबाबत कोणाचाही कसलाही गहाण, दान, बक्षीस, साठेखत, मृत्युपत्र, खरेदीखत, वारसा, फेडपत्र, पोटगी, टाच, कर्ज-बोजा, जप्ती, करार, नोटरी, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क हितसंबंध तसेच वादविवाद असल्यास त्यांनी खालील नमुद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ०७ (सात) दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत, तक्रार न आलेस वर नमुद मिळकत हि निजोखमी व बिनबोजाची, त्यावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क अथवा हितसंबंध नसल्याचे समजुन अथवा त्यांनी तो जाणीवपुर्वक स्वईच्छेने सोडुन दिला असे समजुन आमचे अशिल ठरल्याप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर मागाहून कोणतीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही खरेदीपुर्वी जाहीर नोटीस दिली असे.ता. ०५/०३/२०२६

सही/-
**ॲड रणजित नेताजी गुंड**
**बी.एस.एल.एलएल.एम.**
**मो. ९८६०००७१२३**
**ऑफिस छत्रपती नगर, हॉटेलसागर समोर, बार्शी रोड, मानेगांव (वैराग) ता. बार्शी**
**खरेदीदार अशिलातर्फे ॲडव्होकेट**

# शिवाजी प्रशालेचे १८ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

मराठा समाज सेवा मंडळ, सोलापूर संचलित छत्रपती शिवाजी प्रशाला येथील माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.



या परीक्षेस प्रशालेतील ३२ पैकी १८ विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये संजीवनी पाटील, सतेज जाधव, आकांक्षा घोडके, सरस्वती वंजारी, अनुराधा घोडके, संस्कार खांडेकर, अक्षरा गरडे, सृष्टी कारंडे, भक्ती कदम, गौरी शहापूरकर, तेजस्विनी पाटील, श्रेयस बचुटे, किर्ती कोले, जेनीफर बद्दीपुडी, अभिलाषा ग्यानबोडे, भक्ती डोंगरे, नंदिनी बंडगर आणि जय खळसोडे यांचा समावेश आहे. या यशासाठी विद्यार्थ्यांना परीक्षेच्या प्रमुख नेहा स्वामी, साधना यादव, अश्विनी भोसले, सुल्ताना मुलाणी आणि साहेल शेख यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे, शालेय समितीचे चेअरमन शिवदास चटके, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, उपमुख्याध्यापक श्रीपादराव जगदाळे, पर्यवेक्षक सुरेश जगताप व किरण देशमुख यांनी अभिनंदन केले.

**महावितरण** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई-निविदा सूचना**

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय सोलापूर यांचेद्वारे बाहयस्त्रोत कंत्राटी कुशल / अर्धकुशल / अकुशल कामगार नेमण्याकरिता नोंदणीकृत व अनुभवी ठेकेरादारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा म. रा. वि. वि. कं. मर्या., च्या http:/works.mahadiscom.in/e-tender/etender या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. सदरच्या निविदा पंढरपूर विभागीय कार्यालय यांचेकरीता निविदा क्र. टी- १४/२०२५-२६ अन्वये १ वर्षाच्या कालावधीकरिता मागविण्यात येत आहेत. सदर निविदा उपरोक्त संकेतस्थळावर विक्री करिता दि. ०६.०३.२०२६ ते १७.०३.२०२६ या कालावधीत उपलब्ध राहतील. तसेच सदरच्या निविदा भरण्याची अंतिम तारीख दि.१७.०३.२०२६ रोजी १४.०० पर्यत राहील.

टीप : कोणतीही निविदा कारण न दाखवता नाकारण्याचा हक्क खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. निविदा फी ऑन लाईन भरावयाची आहे.

**HO PR No. 69/26 Dt.05.03.2026**
**अधीक्षक अभियंता (सोमंका) मंडल कार्यालय सोलापूर**

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दि. कि. अर्ज ०६/२०२६
नि.नं. ०६

**बार्शी येथील मे. सिव्हिल जज्ञ सिनिअर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**श्रीमती सुनंदा नागनाथ गायकवाड, वगैरे -- अर्जदार**
**विरुध्द**
**कोणी नाही -- सा.वाला**

**अर्ज - भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे**

ज्या अर्थी, यातील अर्जदार नं. १ ते ३ हे अर्जात दिलेल्या पत्यावरील कायमचे रहिवाशी होते व आहेत. अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २, ३ चे वडिल नागनाथ भाऊराव गायकवाड हे दि. ०३/१२/२०२५ रोजी बार्शी या ठिकाणी मयत झालेले आहेत. मयत नागनाथ भाऊराव गायकवाड यांचे नावे **युनियन बँक ऑफ इंडिया शाखा बार्शी, कालभैरव नागरी सहकारी पतसंस्था मर्या. बार्शी व सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. सोलापूर शाखा रिधोरे** या बँकामध्ये, त्यांचे नांवे असलेल्या खात्यांमध्ये एकूण **रक्कम रु. ५,९६,५२३.५५ पै. (अक्षरी र.रु. पाच लाख शहान्नव पाचशे तेवीस रु. पंचावन्न पैसे)** जमा असून मयत नागनाथ भाऊराव गायकवाड यांना व त्यांचे नावावरील रक्कमेस अर्जदार नं. १ ते ३ यांचे शिवाय दुसरे कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे सदरची रक्कम घेणेस अर्जदार नं. १ ते ३ यांना भारतीय वारसा कायद्यानुसार हक्क अधिकार आहे. त्याप्रमाणे यातील अर्जदार नं. १ ते ३ हे मयत नागनाथ भाऊराव गायकवाड यांचे कायदेशीर वारस (Legal Heirs ) आहेत, असे जाहीर होवून त्याप्रमाणे वर नमूद रक्कम मिळणेकामी अर्जदार नं. २ व ३ यांच्या वतीने अर्जदार नं. १ यांना वारस प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेसाठी सदरचा अर्ज आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार नं. १ ते ३ यांचे व्यतिरीक्त मयत नागनाथ भाऊराव गायकवाड यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमली ता. २९/०४/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी मे. कोर्टात दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदार नं. १ ते ३ यांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सहीशिक्क्यानिशी दिले असे. ता.०४/०३/२०२६

कोर्टाचा शिक्का

सही/-
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बार्शी**

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः सोलापूर जिल्हयातील, पंढरपूर तालुक्यातील मौजे टाकळी येथील लोकांना व आसपासचे परिसरातील लोकांना सदर जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,:-

डि सोलापूर सब डि व ता पंढरपूर पैकी मौजे टाकळी येथील बिनशेती मिळकत यांसी १) लतीका राजू देडे यांची ग.नं.७१/१ प्लॉट नं. १३ यांसी क्षेत्र १.८५.२३ आर चौ.मी (१८५.२३चौ.मी) यांसी चतुः सिमा पुर्वेस-प्लॉट नं. १४, दक्षिणेस - ग.नं.७१ पश्चिमेस - प्लॉट नं.१२ आणि उत्तरेस - रस्ता २) सोनाली राजू देडे यांची ग.नं.७१/१ प्लॉट नं. १४ यांसी क्षेत्र १.८५.२३ आर चौ.मी (१८५.२३चौ. मी) यांसी चतुः सिमा पुर्वेस-प्लॉट नं. १५ दक्षिणेस - ग.नं. ७१, पश्चिमेस - प्लॉट नं. १३ व उत्तरेस- रस्ता येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ती मधील झाड झुडूप, वृक्ष पाषाण, दगड, माती वगैरे सर्व तदृंगभूत वस्तु व हक्कासह असणारी खुली व बांधीव मिळकत म्हणजे या नोटीसीचा विषय होय.

वर नमुद मिळकत ही १) लतीका राजू देडे २) सोनाली राजू देडे यांचे मालकी हक्काची व प्रत्यक्ष कबजे वहिवाटीची आहे. सदरची मिळकत ही वर नमुद मालकांना स्वतःचे कौटूंबिक अडी-अडचणीसाठी पैशाची गरज असल्यामुळे सदर मिळकत वर नमुद मालकांनी आमचे अशिल यांना कायमखुष कायमस्वरूपी खरेदीखत करून देण्याचे ठरवून आमचे आशिल यांचेकडून ठरलेल्या मोबदल्यापैकी काही रक्कम इसार म्हणून घेतलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा वर नमुद विद्यमान मालक यांनी आमचे आशिलास दिलेली आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध असल्यास किंवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, लिज, दान, लिन, डिड, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, विसारपावती, हक्कसोडपत्र, इ. प्रकारचा नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत दस्त असल्यास अगर दिवाणी कोर्टात दावा, तसेच महसूल दप्तरी कोणताही वाद प्रलंबीत असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत कागदपत्रानिशी वरील पत्यावर आपली हरकत वा तक्रार नोंदवावी. जर वर नमुद मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार न आल्यास आमचे आशिल सदर खरेदी व्यवहाराचा उर्वरीत भाग पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ही जाहीर नोटीस दिली ता. ५/३/२०२६

सही/-
**श्री. सोमेश उमाकांत चांडोले**
**बी.ए.एल.एल.बी. ॲडव्होकेट**
**रा. ३०८२, काळा मारुती, पंढरपूर जि सोलापूर**
**मो.नं. ९८६००८००६० मो.नं-८३२९६२६००३**
**नोटरी पब्लीक (भारत सरकार)**

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः सोलापूर जिल्ह्यातील, पंढरपूर तालुक्यातील मौजे टाकळी येथील लोकांना व आसपासचे परिसरातील लोकांना सदर जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,:-

डि सोलापूर सब डि व ता पंढरपूर पैकी मौजे टाकळी येथील बिनशेती मिळकत यांसी १) विठ्ठल तुकाराम पात्रे यांची ग.नं.७१/१ प्लॉट नं. १५ यांसी क्षेत्र २.२०.०५ आर चौ.मी (२२०.०५चौ.मी) यांसी चतुः सिमा पुर्वेस - प्लॉटनं. १६, दक्षिणेस-रस्ता पश्चिमेस -प्लॉट नं. १४ आणि उत्तरेस- रस्ता २) मुक्ताबाई वसंत वाघमारे यांची ग.नं.७१/१ प्लॉट नं. १६ यांसी क्षेत्र २.९४.०० आर चौ.मी (२९४.०० चौ. मी) यांसी चतुः सिमा पुर्वेस-पारधी वस्ती, दक्षिणेस - रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. १५ व उत्तरेस अंर्तगत रस्ता येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ती मधील झाड झुडूप, वृक्ष पाषाण, दगड, माती वगैरे सर्व तदृंगभूत वस्तु व हक्कासह असणारी खुली व बांधीव मिळकत म्हणजे या नोटीसीचा विषय होय.

वर नमुद मिळकत ही १) विठ्ठल तुकाराम पात्रे २) मुक्ताबाई वसंत वाघमारे यांचे मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे. सदरची मिळकत ही वर नमुद मालकांना स्वतःचे कौटूंबिक अडी-अडचणीसाठी पैशाची गरज असल्यामुळे सदर मिळकत वर नमुद मालकांनी आमचे आशिल यांना कायमखुष कायमस्वरूपी खरेदीखत करून देण्याचे ठरवून आमचे आशिल यांचेकडून ठरलेल्या मोबदल्यापैकी काही रक्कम इसार म्हणून घेतलेली आहे.

सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा वर नमुद विद्यमान मालक यांनी आमचे आशिलास दिलेली आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध असल्यास किंवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, लिज, दान, लिन, डिड, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, विसारपावती, हक्कसोडपत्र, इ. प्रकारचा नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत दस्त असल्यास अगर दिवाणी कोर्टात दावा, तसेच महसूल दप्तरी कोणताही वाद प्रलंबीत असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत कागदपत्रानिशी वरील पत्यावर आपली हरकत वा तक्रार नोंदवावी. जर वर नमुद मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार न आल्यास आमचे आशिल सदर खरेदी व्यवहाराचा उर्वरीत भाग पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत चालणार नाही.

कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे.
ही जाहीर नोटीस दिली ता. ५/३/२०२६

सही/-
**श्री. सोमेश उमाकांत चांडोले**
**बी.ए.एल.एल.बी. ॲडव्होकेट**
**रा. ३०८२, काळा मारुती, पंढरपूर जि सोलापूर**
**मो.नं. ९८६००८००६० मो.नं-८३२९६२६००३**
**नोटरी पब्लीक (भारत सरकार)**

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः सोलापूर जिल्ह्यातील, पंढरपूर तालुक्यातील मौजे टाकळी येथील लोकांना व आसपासचे परिसरातील लोकांना सदर जाहीर नोटीसीने कळविणेत येते की,:-

डि सोलापूर सब डि व ता पंढरपूर पैकी मौजे टाकळी येथील बिनशेती मिळकत यांसी १) शांताबाई नारायण देडे यांची ग.नं. ७१/१ प्लॉट नं. ११ यांसी क्षेत्र २.६३.३५ आर चौ.मी (२६३.३५ चौ.मी) यांसी चतुः सिमा पुर्वेस-प्लॉट नं. १२, दक्षिणेस - ग.नं.७१ पश्चिमेस - रस्ता व उत्तरेस - रस्ता २) विशाल विलांस खंडागळे वगैरे यांची ग.नं.७१/१ प्लॉट नं. १२ यांसी क्षेत्र १.८५.२३ आर चौ.मी (१८५.२३चौ.मी) यांसी चतुः सिमा पुर्वेस-प्लॉट नं. १३ दक्षिणेस ग.नं. ७१, पश्चिमेस प्लॉट नं. ११ व उत्तरेस रस्ता येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ती मधील झाड झुडूप, वृक्ष पाषाण, दगड, माती वगैरे सर्व तदृंगभूत वस्तु व हक्कासह असणारी खुली व बांधीव मिळकत म्हणजे या नोटीसीचा विषय होय.

वर नमुद मिळकत ही १) शांताबाई नारायण देडे यांची २) विशाल विलास खंडागळे, निलम गोरख साठे, अश्लेशा विलास खंडागळे, प्रणोती रणजित मोढे, विलास तुकाराम खंडागळे यांचे मालकी हक्काची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची आहे. सदरची मिळकत ही वर नमुद मालकांना स्वतःचे कौटूंबिक अडी-अडचणीसाठी पैशाची गरज असल्यामुळे सदर मिळकत वर नमुद मालकांनी आमचे आशिल यांना कायमखुष कायमस्वरूपी खरेदीखत करून देण्याचे ठरवून आमचे आशिल यांचेकडून ठरलेल्या मोबदल्यापैकी काही रक्कम इसार म्हणून घेतलेली आहे.

सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व भरवसा वर नमुद विद्यमान मालक यांनी आमचे आशिलास दिलेली आहे. तरी सदर मिळकतीमध्ये कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क अधिकार अथवा हितसंबंध असल्यास किंवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, लिज, दान, लिन, डिड, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, विसारपावती, हक्कसोडपत्र, इ. प्रकारचा नोंदणीकृत अथवा अनोंदणीकृत दस्त असल्यास अगर दिवाणी कोर्टात दावा, तसेच महसूल दप्तरी कोणताही वाद प्रलंबीत असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून सात (७) दिवसांचे आत कागदपत्रानिशी वरील पत्यावर आपली हरकत वा तक्रार नोंदवावी. जर वर नमुद मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार न आल्यास आमचे आशिल सदर खरेदी व्यवहाराचा उर्वरीत भाग पुर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत चालणार नाही.

कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ही जाहीर नोटीस दिली ता. ५/३/२०२६

सही/-
**श्री. सोमेश उमाकांत चांडोले**
**बी.ए.एल.एल.बी. ॲडव्होकेट**
**रा. ३०८२, काळा मारुती, पंढरपूर जि सोलापूर**
**मो.नं. ९८६००८००६० मो.नं-८३२९६२६००३**
**नोटरी पब्लीक (भारत सरकार)**

# टी-२० विश्वचषकाचा थरार





## महत्त्वाचे

### ऑल इंग्लंड ओपन लक्ष्य सेन उपांत्यपूर्व फेरीत



**बर्मिंगम** : भारताच्या लक्ष्य सेनने दुसऱ्या गेममध्ये चार मॅच पॉइंट्स गमावल्याच्या निराशेवर मात करत गुरुवारी येथे ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत चुरशीच्या सामन्यात हाँगकाँगच्या एनजी का लाँग अँगसविरुद्ध वर्चस्व गाजवले व उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविले. पहिल्या फेरीत अव्वल मानांकित आणि गतविजेत्या शी यू क्यूईला पराभूत करणाऱ्या २४ वर्षीय लक्ष्यने एनजीवर २१-१९, २१-२३, २१-१० असा एक तास २१ मिनिटांत विजय मिळवला. एनजीवर सेनचा हा त्यांच्या चार सामन्यांमध्ये पहिलाच विजय होता, जरी शेवटचा सामना २०२३ च्या मलेशिया मास्टर्समध्ये झाला होता. २०२२ च्या ऑल इंग्लंडच्या अंतिम फेरीत पोहोचलेल्या सेनने त्याच्या हाँगकाँगच्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध आक्रमक सुरुवात केली. सेन आता सहाव्या मानांकित चीनच्या ली शि फेंग आणि आयर्लंडच्या न्हाट न्गुयेन यांच्यातील सामन्यातील विजेत्याशी सामना करेल.

### भारतीय मुष्टियुद्ध संघ बँकॉककडे रवाना होणार

**नवी दिल्ली** : आगामी ८ मार्च ते १५ मार्च दरम्यान बँकॉक, थायलंड येथे होणाऱ्या जागतिक बॉक्सिंग फ्युचर्स चषक स्पर्धेसाठी भारतीय मुष्टियुद्ध संघ सज्ज झाला असून संघ शुक्रवारी बँकॉक, थायलंडकडे रवाना होणार आहे. या स्पर्धेत जगभरातील काही सर्वोत्तम युवा मुष्टियोद्धे सहभागी होतील, ज्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय अनुभव मिळविण्याची व त्यांच्या वयोगटातील सर्वोत्तम प्रतिस्पर्ध्यांशी स्पर्धा करण्याची एक महत्त्वाची संधी मिळेल. भारत पुरुष व महिला दोन्ही विभागांमध्ये स्पर्धा करण्यासाठी १० सदस्यांचा संघ पाठवेल. महिला संघात गुंजन (४८ किलो), चंद्रिका भोरेशी पुजारी (५१ किलो), जयश्री देवी चिरोम (५४ किलो), राधामणी लोंगजाम (५७ किलो) आणि प्राची (६० किलो) यांचा समावेश आहे. पुरुष संघात अंबेकर मीतेई लैरेनलकपम (५० किलो), उधम सिंग राघव (५५ किलो), साहिल दुहान (६० किलो), अमन सिवाच (६५ किलो) आणि प्रियांश सेहरावत (७० किलो) यांचा समावेश आहे.

### अफगाणिस्तानच्या टी-२० कर्णधारपदी इब्राहिम झद्रान

**काबूल** : श्रीलंकेविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेसाठी सलामीवीर इब्राहिम झद्रानला अफगाणिस्तानचा टी-२० संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.



तो लेग-स्पिनर रशीद खानची जागा घेणार आहे, असे अफगाणिस्तान क्रिकेट मंडळाने गुरुवारी सांगितले. झद्रान पूर्वी टी-२० संघाचा उपकर्णधार होता आणि आता २०२६ च्या पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेनंतर निवडकर्त्यांनी संघात मोठे बदल केल्याने रशीदकडून तो पदभार स्वीकारत आहे. अफगाणिस्तान स्पर्धेच्या साखळी फेरीतच बाहेर पडला होता. अफगाणिस्तान आणि श्रीलंका यांच्यातील तीन टी-२० सामने १३, १५ आणि १७ मार्च रोजी शारजाह क्रिकेट स्टेडियमवर खेळवले जातील. अफगाणिस्तानचा टी- २० संघ : इब्राहिम झद्रान (कर्णधार), रहमानउल्लाह गुरबाज, नूर रहमान, सेदीकुल्लाह अटल, दरविश रसूली, शाहीदुल्ला कमाल, अजमतुल्ला ओमरझाई, मोहम्मद नबी, शराफुद्दीन अश्रफ, रशीद खान, नूर अहमद, मुजीब उर रहमान, झिया उरेद अहमद मलिक, फारे अहमद मलिक आणि अब्दुल्लाह शरीफ.

## जपान आशियाड क्रीडा स्पर्धा

# खेळाडूंचा मुक्काम तरंगत्या क्रीडाग्राममध्ये

### सरावासाठी पतियाळा, बंगळुरू येथील साई केंद्रांमध्ये तात्पुरते कंटेनर

**◆ नवी दिल्ली, ५ मार्च**

या वर्षीच्या जपान आशियाड क्रीडा स्पर्धेत खेळाडूंना निवासस्थान म्हणून गृहनिर्माण युनिट्समध्ये शिपिंग कंटेनर पुन्हा वापरण्यात येणार आहे. अर्थात खेळाडूंचे निवासस्थान असलेले क्रीडा ग्राम हे जहाजावर असेल. खेळाडूंना या संकल्पनेचा परिचय व्हावा, व जपानमध्ये उतरताना 'धक्का बसू नये' यासाठी पतियाळा व बंगळुरू येथील भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या (साई) केंद्रांमध्ये तात्पुरते कंटेनर बसवले जात आहेत.

१९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत जपानमधील आयची-नागोया येथे होणाऱ्या २० व्या आशियाड क्रीडा स्पर्धेदरम्यान खेळाडूंना एका तरंगत्या गावात राहावे लागेल. या स्पर्धेत खेळाडू, प्रशिक्षक कर्मचारी व आतिथ्य व्यावसायिकांसह ४,६०० हून अधिक लोक क्रूझ जहाजावर राहतील. किफायतशीर व पर्यावरणपूरक क्रीडा ग्राम बनवण्याच्या प्रयत्नात आयोजकांनी खेळाडूंच्या क्रीडा ग्रामची पारंपारिक संकल्पना रद्द केली आहे. त्याऐवजी, एक डॉक केलेला



क्रूझ लाइनर तरंगत्या निवासस्थान म्हणून काम करेल तर इतर अनेकांना निवासस्थानांमध्ये रूपांतरित केलेल्या शिपिंग कंटेनरमध्ये ठेवण्यात येईल.

नेमबाजी व भारोत्तोलनसारख्या क्रीडा प्रकारांमध्ये स्पर्धा करणाऱ्यांना स्पर्धेपूर्वी कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून आमच्या खेळाडूंना जमिनीवर निवासस्थानात ठेवण्यात यावे, अशी विनंती भारताने आधीच केली आहे.

**तात्पुरते कंटेनर उभारणे सुरू**

पतियाळा व बंगळुरू येथे तात्पुरते कंटेनर युनिट्स बसवण्याचे काम सुरू आहे आणि जपानमधील प्रत्यक्ष निवास व्यवस्था कशी असेल याची कल्पना येण्यासाठी खेळांसाठी येणाऱ्या खेळाडूंनी किमान एक रात्र त्यात घालवावी अशी योजना आहे, असे क्रीडा मंत्रालयाच्या सूत्रांनी सांगितले.

आम्ही जे बसवत आहोत ते प्रत्यक्षात शिपिंग कंटेनर नाहीत तर काहीसे कंटेनर युनिटसारखे आहेत. जेव्हा ते तिथे पोहोचतील तेव्हा त्यांना या नवीन शैलीच्या निवासस्थानाचा धक्का बसणार नाही याची खात्री करण्यासाठी हे केले आहे, असे ते म्हणाले.

हे खेळ पाच-क्लस्टर स्पर्धा मॉडेलचे अनुसरण करतील, यात ऐची, गिफू, शिझुओका आणि विमानतळ-एक्स्पो झोनमध्ये पसरलेल्या ठिकाणांचा समावेश असेल. क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी भारताच्या खेळांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी साई मुख्यालयात झालेल्या बैठकीत एसएआय केंद्रांवर कंटेनर युनिट्सच्या चालू स्थापनेवर चर्चा करण्यात आली.

या स्पर्धेत ४० हून अधिक खेळांमधील ७०० हून अधिक भारतीय खेळाडू भाग घेण्याची अपेक्षा आहे. २० मार्च रोजी खेळांच्या तयारीच्या पुनरावलोकनासाठी स्थापन केलेल्या १५ सदस्यीय समितीची बैठक झाल्यावर अंतिम संघ आकार निश्चित होण्याची शक्यता आहे. या पॅनेलमध्ये क्रीडा सचिव हरि रंजन राव, भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्ष पीटी उषा, आशियाई खेळांचे प्रमुख सहदेव यादव आणि उपप्रमुख शरथ कमल यांचा समावेश आहे. भारत या खंडीय क्रीडा स्पर्धेच्या तयारीच्या निर्णायक टप्प्यात प्रवेश करत असताना, संघाच्या आकाराव्यतिरिक्त, प्रवास व्यवस्था आणि ऑपरेशनल तयारी यावरही चर्चा केली जाईल. (वृत्तसंस्था)

### १०६ पदकांपेक्षा अधिक पदके जिंकण्याचे लक्ष्य

भारत मागील हॅण्गझोऊ आशियाड क्रीडा स्पर्धेत मिळवलेल्या ऐतिहासिक १०६ पदकांच्या कामगिरीला मागे टाकण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे. आमचे उद्दिष्ट खेळाडूंना कोणत्याही किंमतीत त्रास होऊ नये आणि स्पर्धेत आमची पदकांची संख्या वाढवण्यावर लक्ष केंद्रित करावे हे सुनिश्चित करणे आहे, असे क्रीडामंत्री मनसुख मांडवीय म्हणाले.

तयारीचा एक भाग म्हणून प्रत्येक राष्ट्रीय क्रीडा महासंघाने आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तांत्रिक हँडबुकसाठी खेळाडू, प्रशिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांना 'समजून घेण्यासाठी आणि शिक्षित करण्यासाठी' एक नोडल अधिकारी नियुक्त केला आहे. खेळाडूंना लक्ष केंद्रित तयारीसाठी पुरेसा वेळ मिळावा यासाठी संघांची निवड आधीच केली जाईल आणि वैद्यकीय पथकांसह सहाय्यक कर्मचाऱ्यांची क्षमता बळकट करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे मंत्रालयाने म्हटले आहे.सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये आशियाड क्रीडा स्पर्धा होणार असल्यामुळे वादळांचा सर्वाधिक धोका असलेल्या हंगामात, त्सुनामी, वादळ किंवा नैसर्गिक आपत्ती आल्यास खेळाडूंना बाहेर काढण्यासाठी आकस्मिक योजना आखण्यात आली आहे, असे ऑलिम्पिक कौन्सिल ऑफ आशियाच्या (ओसीए) दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले.

# अर्जुन-सानियाचा विवाहसोहळा थाटात



अर्जुन-सानियाच्या विवाह सोहळ्यात (उजवीकडून) क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, पत्नी अंजली तेंडुलकर, मुलगी सारा तेंडुलकर

**◆ मुंबई, ५ मार्च**

महान क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर यांचा मुलगा अर्जुन तेंडुलकर आणि उद्योजक सानिया चांडोक यांचा विवाह सोहळा गुरुवारी सेंट रेजिस मुंबई येथे एका भव्य समारंभात आनंद, उत्साहाच्या वातावरणात पार पडला.

या विवाह सोहळ्यात क्रीडा, मनोरंजन आणि राजकारण तसेच विविध क्षेत्रातील दिग्गजांनी हजेरी लावली होती. अर्जुन भारताकडून १९ वर्षांखालील संघाकडून व इंडियन प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सकडून खेळला आहे. तो स्थानिक पातळीवर गोव्याचे प्रतिनिधित्व करतो.

सानिया ही उद्योगपती रवी घई यांची नात आहे व ती स्वतः पशुवैद्यकीय क्षेत्रात उद्योजक आहे.

उपस्थितांमध्ये बीसीसीआयचे माजी सचिव आणि विद्यमान आयसीसी अध्यक्ष जय शाह, भारताचे माजी कर्णधार आणि प्रशिक्षक राहुल द्रविड, माजी भारतीय क्रिकेटपटू हरभजन सिंग, वेंकटेश प्रसाद आणि तसेच समालोचक हर्षा भोगले यांचा समावेश होता. तसेच माजी भारतीय खेळाडू आणि वरिष्ठ पुरुष निवड समितीचे प्रमुख अजित आगरकर, निवडकर्ता प्रज्ञान ओझा, मोहम्मद कैफ, पीयुष चावला, माजी क्रिकेटपटू आणि तृणमूल काँग्रेसचे खासदार युसूफ पठाण आणि बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला उपस्थित होते. (वृत्तसंस्था)

# वेस्ट इंडीज संघ भारतात अडकला

### आम्हाला केवळ घरी जायचेय् : डॅरेन सॅमीची विनंती

**◆ कोलकाता, ५ मार्च**

अमेरिका व इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांमुळे आंतरराष्ट्रीय हवाई निर्बंधांमुळे वेस्ट इंडीज क्रिकेट संघ चार दिवसांपेक्षा जास्त काळ शहरात अडकला आहे, अशा शब्दांत वेस्ट इंडीज संघाचे मुख्य प्रशिक्षक डॅरेन सॅमी यांनी गुरुवारी समाज माध्यमावर आपली निराशा व्यक्त केली.



डॅरेन सॅमी व वेस्ट इंडीजचा संघ

रविवारी सुपर एट टप्प्यात भारताकडून पराभव पत्करल्यानंतर टी-२० विश्वचषकातून बाहेर पडलेल्या वेस्ट इंडीजला आखाती प्रदेशातील काही भागांमधून विमान वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे मायदेशी परतता आले नाही. आम्हाला केवळ घरी जायचे आहे, अशी विनंती त्यान` समाज माध्यमावर केली आहे.

चार तासांनंतर, वेस्ट इंडीजच्या माजी कर्णधाराने त्यांच्या प्रवास योजनांबाबत स्पष्टता मागण्यासाठी आणखी एक पोस्ट लिहिली. आज, ५ दिवस झाले आहेत. किमान एक अपडेट, आम्हाला काहीतरी सांगा, असे सॅमी लिहिले.

**आयपीएलची तयारी शिबिरे आगामी आठवड्यात**

परिस्थिती अजूनही अनिश्चित असल्यामुळे वेस्ट इंडीजचे अनेक खेळाडू भारतातच राहण्याची शक्यता आहे. वेस्ट इंडीजच्या खेळाडूंशी संबंधित आयपीएल फ्रॅन्चायझी येत्या आठवड्यात तयारी शिबिरे सुरू करणार आहेत.

रोवमन पॉवेल हा कोलकाता नाईट रायडर्सचा भाग आहे. केकेआरचे शिबिर १८ मार्चपासून सुरू होत आहे, तर शेरफेन रदरफोर्ड मुंबई इंडियन्सचे प्रतिनिधित्व करतो. शिमरॉन हेटमायर राजस्थान रॉयल्सकडून खेळतो आणि रोमारियो शेफर्ड रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून आहे.

**प्रवासव्यवस्था आयसीसीद्वारे हाताळले जात आहे : बंगाल**

विश्वचषकातील खेळाडूंची प्रवासव्यवस्था पूर्णपणे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून हाताळले जात आहे, असे बंगाल क्रिकेट संघटनेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

वेस्ट इंडिज संघाच्या हालचालींबद्दल आमच्याकडे कोणतेही अपडेट नाही, परंतु नवीनतम अपडेटनुसार ते अजूनही येथे आहेत आणि चार्टर्ड फ्लाइट शोधत आहेत, असे अधिकाऱ्याने सांगितले. खेळाडूंच्या सुरक्षित परतीची खात्री करण्यासाठी ते आयसीसी आणि संबंधित अधिकाऱ्यांसोबत काम करत आहेत, असे क्रिकेट वेस्ट इंडीजने यापूर्वी सांगितले आहे.

इथिओपियातील अदिस अबाबा मार्गे आयसीसीने पर्यायी प्रवास मार्गांची व्यवस्था केल्यानंतर झिम्बाब्वेच्या खेळाडूंनी तुकड्यांमध्ये घरी परतण्यास सुरुवात केली आहे. (वृत्तसंस्था)

# भारतीय महिला संघाचा ऑस्ट्रेलियाविरुद्ध एकमेव कसोटी सामना आजपासून

**◆ पर्थ, ५ मार्च**

एकदिवसीय क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी करणारा भारतीय महिला क्रिकेट संघ शुक्रवारपासून येथे सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध गुलाबी चेंडूनिशी पाच दिवसीय कसोटी क्रिकेट सामना खेळणार आहे. सुमारे पाच वर्षांत पहिल्यांदाच भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दिवस-रात्र काळात कसोटी सामना खेळणार आहे. भारताचे वरिष्ठ खेळाडू प्रेरणादायी कामगिरीसह आपले पाऊल पुढे टाकतील अशी अपेक्षा बाळगली जात आहे.



गत पाच कसोटी सामन्यांमध्ये अपराजित राहिल्यामुळे भारतीय महिला संघाचा आत्मविश्वास बळावलेला असेल. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील संघाने डिसेंबर २०२३ आणि जुलै २०२४ दरम्यान अनुक्रमे इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेचा पराभव करून सलग तीन कसोटी जिंकल्या, परंतु ते सर्व विजय मायदेशी मिळाले.

भारताचे शेवटचे दोन परदेशातील कसोटी २०२१ मध्ये इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध अनिर्णीत राहिले. त्या वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धचा सामना पाहुण्या संघाने दिवसरात्र खेळला. त्या सामन्याचे एक प्रमुख आकर्षण म्हणजे स्मृती मंधाना आहे. तिने त्यावेळी आपल्या दोन कसोटी शतकांपैकी दुसरे शतक झळकावले.

गुलाबी चेंडूच्या कसोटीमुळे दोन्ही प्रतिस्पर्ध्यांमधील बहु-स्वरूपातील मालिका संपेल. भारताने वन-डे सामन्यांमध्ये पराभव पत्करण्यापूर्वी टी-२० सामने जिंकले, त्यामुळे ऑस्ट्रेलियाला गुणतालिकेत ८-४ अशी आघाडी मिळाली.

टी-२० व वन-डे सामन्यांमध्ये विजयासाठी प्रत्येकी दोन गुण देण्यात आले होते, परंतु कसोटी जिंकणाऱ्या संघाला थेट विजयासाठी चार गुण मिळतील. जर ऑस्ट्रेलिया सामना बरोबरीत आणू शकला तर ऑस्ट्रेलिया एकूण मान मिळवेल, परंतु अंतिम क्रमवारीत बरोबरी साधण्यासाठी भारताला विजय आवश्यक असेल.

भारतीय संघाने डिसेंबर २०२३ मध्ये मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्ध ८ गड्यांनी पहिला कसोटी सामना जिंकून इतिहास घडविला, यावरून संघाला प्रेरणा मिळेल व संघाचा आत्मविश्वास वाढेल. फलंदाजी विभागात जबाबदारी वाटून घेण्यासाठी वरिष्ठ खेळाडू हरमनप्रीत, तिची उपकर्णधार स्मृती मंधाना, शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्ज व दीप्ती शर्मा यांच्यावर असेल, तर शैलीदार उजव्या हाताची खेळाडू प्रतीका रावलवरही लक्ष केंद्रित केले जाईल. प्रतीका शुक्रवारी कसोटी पदार्पण करण्याची अपेक्षा आहे. वाका मैदानावर होणाऱ्या दिवस-रात्र कसोटी सामन्यासाठी रावल ही भारताच्या सात नवोदित खेळाडूंपैकी एक आहे.

भारतीय संघात युवा व अनुभवी खेळाडूंचा समावेश आहे. कसोटी संघात सात नवीन खेळाडूंचा समावेश आहे, यात २० वर्षीय डावखुरी फिरकी गोलंदाज वैष्णवी शर्मा, क्रांती गौड, सायली सातघरे व काश्वी गौतमचा समावेश आहे.

क्रांती गौड व अमनजोत कौर या दोघीही भारताच्या विश्वचषक विजेत्या एकदिवसीय संघाचा भाग होत्या व शुक्रवारी त्यांचे कसोटी पदार्पण होऊ शकते, पण संघाला अनुभवी मध्यमगती गोलंदाज रेणुका सिंगची उणीव भासेल. तिच्या जागी युवा जलदगती गोलंदाज काश्वी गौतमचा समावेश करण्यात आला आहे.

दुसरीकडे, ऑस्ट्रेलिया संघाची कर्णधार एलिसा हिलीला भव्य निरोप देण्याचा प्रयत्न करेल. जी तिचा २९९ वा आणि शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळणार आहे.

दुसरीकडे, ऑस्ट्रेलिया संघाची कर्णधार एलिसा हिलीला भव्य निरोप देण्याचा प्रयत्न करेल. , जी तिचा २९९ वा आणि शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळणार आहे.

किम गार्थ आणि एलिस पेरीला झालेल्या चार दुखापती आणि सोफी मोलिनेक्सच्या पाठीच्या दुखापतीनंतर ऑस्ट्रेलियानेही राहेल ट्रेनामन आणि मैटलान ब्राउन या काही नवीन खेळाडूंना त्यांच्या संघात समाविष्ट केले आहे.

गार्थ आणि मोलिनॉक्स दोघेही सामन्यातून बाहेर पडले असले तरी, ऑस्ट्रेलियाला आशा आहे की पेरी वेळेत बरा होईल. (वृत्तसंस्था)

# प्राग बुद्धिबळ महोत्सव : मग्सूडलूने गुकेशला रोखले

**◆ प्राग, ५ मार्च**

प्राग आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महोत्सवाच्या मास्टर्स विभागाच्या सातव्या फेरीत गुरुवारी इराणच्या परहम मग्सूडलूने विश्वविजेता डी. गुकेशला बरोबरीत रोखले. त्यामुळे गुकेश अजूनही विजयाच्या प्रयत्नांत आहे.

केवळ दोन फेऱ्या शिल्लक असताना गुकेश दोन गुणांसह शेवटच्या स्थानावर आहे. चार बरोबरी व तीन पराभवांनंतर गुकेशला आपल्या खेळात काही सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्याची वेळ असू शकते.



दुसरा भारतीय व गतविजेता अरविंद चिदम्बरम्ने उझबेकिस्तानच्या नोदिरबेक याकुबबोएव्हशी बरोबरी साधली. एकमेव विजेता जर्मनीचा विन्सेंट कीमर याने स्पेनच्या डेव्हिड अँटोन गुइजारोला हरवले आणि नेदरलॅण्डचा जॉर्डन व्हॅन फॉरेस्टने त्याचे जवळचे प्रतिस्पर्धी चेक प्रजासत्ताकचा डेव्हिड नवारा आणि उझबेकिस्तानचा नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्ह यांच्यापेक्षा अर्धा गुण पुढे राहिला.गुकेशने मगसूडलूविरुद्ध काळ्या सोंगट्यानिशी बर्लिनच्या बचावफळीचा वापर केला व मजबूत स्थान मिळवले. इराणी खेळाडू बराच काळ आपली स्थिती अबाधित ठेवण्यात आनंदी होता, मात्र सरतेशेवटी ४९ चालींनंतर सामना अनिर्णीत राहिला.दिव्याचे ३.५ गुण असून सूर्यशेखचे २.५ गुण आहे. (वृत्तसंस्था)

### दिव्या देशमुखचा आणखी एक चांगला निकाल

चॅलेंजर्स विभागात, ग्रॅण्डमास्टर दिव्या देशमुखने आणखी एक चांगला निकाल दिला. तिने डेन्मार्कच्या जोनास बुहल बजेरेला बरोबरीत रोखले, तर ग्रॅण्डमास्टर सूर्य शेखर गांगुलीने शेवटी चीनच्या जिनर झूच्या खर्चावर पहिला विजय मिळवला.

# श्रीलंका क्रिकेट मंडळात फेरबदल होण्याची शक्यता

**◆ कोलंबो, ५ मार्च**

टी-२० विश्वचषकातील निराशाजनक कामगिरीनंतर श्रीलंका आपल्या क्रिकेट मंडळात लक्षणीय फेरबदल करण्याचा विचार करीत आहे. देशात क्रिकेटला पुनरुज्जीवित करण्यासाठी व मंडळात फेरबदल करण्यासाठी आयसीसीशी सल्लामसलत करून एक अंतरिम समिती स्थापन करण्याची शक्यता आहे.

क्रीडा मंत्री सुनील कुमारा गमागे हे संक्रमण सुलभ करण्यासाठी व संभाव्य निर्बंध टाळण्यासाठी आयसीसीशी चर्चा करत आहेत.

श्रीलंकेचा १९७३ चा क्रीडा कायदा क्रीडा मंत्र्यांना क्रीडा संघटनांवर अधिकार देतो, त्यामुळे संभाव्य हस्तक्षेप शक्य होतो.

टी-२० विश्वचषकातील श्रीलंकेच्या निराशाजनक कामगिरीमुळे देशाच्या क्रिकेट मंडळात फेरबदल होऊ शकतो.

खेळाची 'पुनर्बांधणी' करण्यासाठी अंतरिम समिती विचाराधीन आहे, असे क्रीडा मंत्री सुनील कुमारा गमागे यांनी गुरुवारी सांगितले.

इंग्लंड, न्यूझीलंड आणि पाकिस्तानविरुद्धच्या सुपर ८ सामन्यांमध्ये पराभव झाल्यानंतर श्रीलंकेला टी-२० विश्वचषकातून बाहेर काढण्यात आले. श्रीलंका क्रिकेट मंडळाचे विद्यमान अध्यक्ष शम्मी सिल्वा यांचा कार्यकाळ मे २०२७ पर्यंत आहे. आम्ही आयसीसीकडून पुन्हा बंदी घालण्याचा धोका पत्करू शकत नाही म्हणून आयसीसीच्या अनुषंगाने सर्वकाही केले पाहिजे, असे गामागे यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# बाळाचा आनंद अन् न्यूझीलंड अंतिम फेरीत

### मॅट हेनरीसाठी आठवडा ठरला विशेष


**◆ कोलकाता, ५ मार्च**

न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज मॅट हेनरीसाठी हा आठवडा विशेष ठरला. त्याने या आठवड्यात घरी मुलाच्या जन्माचा आनंद साजरा करण्यापासून ते त्याच्या न्यूझीलंड संघाचा टी-२० विश्वचषकाच्या उपांत्य फेरीतील प्रवेशापर्यंतचा प्रत्येक भावनिक क्षण अनुभवला. न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा ९ गड्यांनी पराभव करून जेतेपदाच्या लढतीत स्थान मिळविणे, हा त्याच्यासाठी महत्त्वपूर्ण क्षण ठरला.

गत २७ फेब्रुवारी रोजी इंग्लंडविरुद्धच्या सामन्यानंतर न्यूझीलंडचा मॅट हेनरी आपल्या मुलाच्या जन्मासाठ, त्याच्या स्वागतासाठी मायदेशी परतला होता. त्यानंतर तो बुधवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या उपांत्य फेरीच्या काही तास आधी कोलकाता येथे संघात परतला.

थकवणारा प्रवास असूनही वेगवान गोलंदाजाने सर्वात महत्त्वाचे असताना ३४ धावांत २ बळी टिपण्याची कामगिरी केली. शेवटच्या षटकात दोन्ही बळी घेतल्या व दक्षिण आफ्रिकेला ८ बाद १६९ धावांवर रोखले, न्यूझीलंडने सहज पाठलाग केला.

आपल्या बाळाच्या स्वागतासाठी घरी पोहोचणे खूप खास आहे, असे मॅट हेनरी म्हणाला. अर्थातच हॉलीची तब्येत खूप चांगली आहे आणि जॅकचीही तब्येत खूप चांगली आहे आणि ॲनाबेलला मोठी बहीण असण्याचा आनंद आहे, त्यामुळे सर्व काही चांगले आहे. त्यासाठी घरी असणे खूप खास होते, असे हेनरी म्हणाला.



उपांत्य फेरीसाठी वेळेवर भारतात परतण्यासाठी एक कठीण प्रवास होता. पश्चिम आशियातील युद्धादरम्यान जागतिक प्रवास करणे फार गुंतागुंतीचे होते.

बालाच्या स्वागतासाठी घरी असणे आणि उपांत्य फेरीसाठी संघासोबत असणे हे दोन्ही माझ्यासाठी महत्त्वाचे होते, असे तो म्हणाला.

ट्रेंट बोल्ट व टिम साउदी यांच्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर खेळणारा मॅट हेनरी आता गत तीन वर्षांत न्यूझीलंडच्या सर्वोत्तम ऑल-फॉर्मेट गोलंदाजांपैकी एक बनला आहे. त्याने जानेवारी २०२३ पासून १७९ आंतरराष्ट्रीय बळी टिपले आहेत. या काळात कोणत्याही गोलंदाजाने घेतलेले सर्वाधिक व भारताच्या जसप्रीत बुमराहपेक्षा आठ बळी पुढे आहे.

हेनरीला उपांत्य सासमन्यापूर्वी तयारी करायला वेळच मिळाला नाही, पण मी अनुभवावर व आपल्या कौशल्यांवर, विश्वासावर अवलंबून आहे, असे तो म्हणाला.

आम्ही खूप क्रिकेट खेळलो आहोत म्हणून मला वाटते की सध्या ते विश्वासाचे आहे. जर पाऊस पडला तर तुम्ही प्रशिक्षण घेऊ शकत नाही, म्हणून केवळ त्या दृष्टिकोनाचा अवलंब करावा लागेल. ते मानसिकदृष्ट्या ताजेतवाने असतील व तुमच्याकडे असलेल्या कौशल्यांवर विश्वास असेल. सुदैवाने मी ते केले, असे मॅट हेनरी म्हणाला. (वृत्तसंस्था)

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### पांढरीत शिवजन्मोत्सवात जोशाबातर्फे व्याख्यान

**पांगरी, दि.५ मार्च-**

पांढरी (ता.बार्शी) येथे जो. शा. बा. बहुउद्देशीय सेवाभावी संस्था चिंचोलीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने डॉ.संदीप तांबारे यांचे व्याख्यान झाले. डी. वाय. एस.पी. अशोक सायकर प्रमुख पाहुणे होते. कार्यक्रमाची सुरूवात डी वा एस पी.सायकर यांच्या हस्ते छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी सरपंच लताताई घावटे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्ष अनिल खुणे, उपाध्यक्ष अचूत घावटे, संचालक सुभाष भोसले यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. डीवायएसपी सायकर व व्याख्याते तांबरे यांनी छत्रपतीच्या अष्ट पैलूंना स्पर्श करून मनोगत व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष अनिल खुणे यांनी प्रास्ताविक केले. सोमनाथ घावटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा गणेश घावटे यांनी आभार मानले. नितीन घावटे ,शामराव शिकेतोड,राजाभाऊ घावटे,बालाजी घावटे यांनी मोलाचे सहकार्य केले.

### करमाळ्यातील श्री कमलादेवी कन्या विद्यालयास प्रिंटर भेट व मुख्याध्यापिका निरोप समारंभ

**करमाळा, दि. ५ मार्च -**

शहरातील श्री कमलादेवी कन्या विद्यालयास कॉम्प्युटर प्रिंटर भेट देणे व विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मुक्ता शेलार यांचा सेवानिवृत्ती समारंभ, हे दोन्ही कार्यक्रम नुकतेच संपन्न झाले. गजानन महाराज सेवाधारी न्यास पुणे व सर्व सहकारी मित्र परिवार सन १९८८ सालच्या माजी विद्यार्थी मित्र-मैत्रिणी यांच्या संयुक्त विद्यमाने हा भेटवस्तू विद्यालयास प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून एम.आय.टी. विश्व विद्यालयाचे सदस्य अनिल वळसंगकर, तहसीलदार शिल्पा ठोकडे हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गणेश चिवटे होते. यावेळी व्यासपीठावर संजय घोरपडे, नगरसेवक दीपक चव्हाण, सचिन गायकवाड, उद्योजक प्रतीक दोशी, सामाजिक कार्यकर्ते संजय घोरपडे, संस्थेचे संचालक सुनील सूर्यवंशी,राधेश्याम देवी, प्रवीण गायकवाड, सदानंद कुलकर्णी हे उपस्थित होते. यावेळी करमाळा पोस्ट कार्यालयातील पोस्ट मास्टर उदय बंडगर यांचा विद्यालयास आधार कार्ड संदर्भात केलेल्या सहकार्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. थिगळे व सौ. बापट या शिक्षिकांनी केले.

## निधन वृत्त...



### चंद्रकांत रंपुरे

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

सोलापूर शहरातील जुन्या काळातील नवी पेठेतील सुप्रसिद्ध असलेले शिवम वस्त्र महाल चे मालक कै.चंद्रकांत व्यंकोबाराव रंपुरे यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.त्यांची अंत्ययात्रा उद्या सकाळी १० वाजता झुंजे बोळ लक्ष्मी मार्केट येथील राहत्या घरातून निघून जुना पुना नाका हिंदू स्मशानभूमी येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले सुना नातवंडे असा परिवार आहे.



### महादेव भोसले

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

कामती बुद्रक येथील महादेव मारुती भोसले (वय ८७) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सून व चार मुली व नातवंडे असा परिवार आहे.



### भास्कर उबाळे

**नरखेड, दि. ५ मार्च-**

मोहोळ तालुक्यातील नरखेड येथील भास्कर मुरलीधर उबाळे वय (६१) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली,एक मुलगा, आई, एक भाऊ, नातवंडे असा परिवार आहे. जि.प.च्या सेवानिवृत्त शिक्षिका जयश्री बंड (उबाळे) यांचे ते पती होत.



### अंजुबाई मोटे

**नरखेड, दि. ५ मार्च-**

नरखेड(ता.मोहोळ)येथील अंजुबाई धोंडीबा मोटे (वय ७०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब धोंडीबा मोटे यांच्या त्या मातोश्री होत.



### कलावती मामड्याल

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

येथील श्रीमती कलावती हरिपांडुरंग मामड्याल (वय-८५) यांचे गुरुवारी दि.५ मार्च रोजी निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा शुक्रवार दि. ६ मार्च रोजी सकाळी ९.३० च्या दरम्यान त्यांच्या राहत्या घरातून निघणार आहे. अक्कलकोट रोड, शांती चौक जवळील पद्मशाली समाजाच्या शांतीधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात मुले, मुली, जावई, सूना, नात आणि नातवंडे असा परिवार आहे. सोलापूरातील माजी नगरसेवक उमेश मामड्याल यांच्या त्या मातोश्री होत.



### पद्मावती शास्त्री

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

वाळूज येथील रहिवासी श्रीमती पद्मावती शशीकांत शास्त्री (वय-८०) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# मेडिक्लेमबाबत कंपनीला दहा हजार रुपये दंड

## ग्राहक मंचाचा निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.५ मार्च -**

डेंगू आजारात पेशंटला ऍडमिट करण्याची आवश्यकता नव्हती. केवळ बाह्य उपचाराद्वारे डेंगू पेशंट बरा होऊ शकला असे फालतू कारण देवून ग्राहकाला मेडिक्लेमची रक्कम देण्याचे नाकारणाऱ्या मेडिक्लेम कंपनीला ग्राहक मंच सोलापूरने दणका दिला आहे. ग्राहक मंच सोलापूरने संबंधित ग्राहकाला दाव्याच्या रक्कमेबरोबरच मेडिक्लेम कंपनीला दहा हजार रुपये दंड देण्याचा देखील आदेश केल्याची माहिती येथील ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी दीपक इरकल आणि विनोद भरते यांनी दिली.

या संपूर्ण प्रकारणाची माहिती देताना ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी श्री.इलकल आणि श्री. भरते यांनी सांगितले की, येथील रहिवासी व द.ह.कवठेकर प्रशालेतील सहशिक्षक राजेश धोकटे यांनी सेकंडरी स्कूल्स एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह सोसायटी मुंबई



शाखा पंढरपूर यांच्यामार्फत पॅरामाउंट हेल्थ सर्विसेस आणि इन्शुरन्स टीपीए प्रायव्हेट लिमिटेड ठाणे व इफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी दिल्ली यांच्याकडे स्वतःची व कुटुंबाची मेडिक्लेम पॉलिसी उतरवलेली होती. सदर पॉलिसी घेतेवेळी कंपनीने वैद्यकीय सेवेची पूर्णता हमी दिलेली होती. या पॉलिसीमध्ये ग्राहक राजेश धोकटे यांचेसह त्यांची पत्नी व दोन अपत्य यांचा समावेश होता.

पॉलिसी घेतल्यानंतर दरम्यानच्या काळात ग्राहक राजेश धोकटे यांचा मुलगा चिरंजीव पवन हा डेंगू या आजाराने ग्रस्त होऊन सोलापूर येथील डॉ. नितीन तोष्णीवाल यांच्या हॉस्पिटलमध्ये अंतररुग्ण म्हणून ऍडमिट झालेला होता. औषध उपचारानंतर ग्राहकांनी अर्जद्वारे कंपनीकडे झालेल्या औषध उपचाराच्या खर्चाची मागणी रीतसर केली. मात्र कंपनीने या आजार आजारामुळे पेशंटला ऍडमिट करण्याची आवश्यकता नव्हती व केवळ बाह्य उपचाराद्वारे पेन्शन बरा होऊ शकला असे कारण दाखवून मेडिकल मेडिक्लेमची रक्कम देण्याचे नाकारले.

दरम्यान या संदर्भाने श्री.धोकटे यांनी कंपनीत अनेक वेळा लेखी विनंती अर्ज व स्मरणपत्रे दिली परंतु कंपनीने यास कोणतेही दाद न दिल्यामुळे कंटाळून पंढरपुरातील विधीज्ञ ए.ए.कुलकर्णी यांच्या मार्फत नोटीस दिली तरी देखील कंपनीने ग्राहकास योग्य न्याय न दिल्यामुळे अखेर २१ मे २०२४ मध्ये जिल्हा ग्राहक तक्रार निवारण यांच्यासमोर तक्रार दाखल केली. तक्रारदाराची सर्व बाजू ऐकून घेतल्यानंतर विमा कंपनीने तक्रारदार यांना देण्याच्या सेवेत त्रुटी केलेली आहे. त्यामुळे ग्राहक तक्रारदार यांना विमा द्यावयाची रक्कम विमा दावा नाकारलेले तारखेपासून विमा रक्कम ८२ हजार ४५३ रुपये दसादशे सहा टक्के दराने अदा करावी व तक्रारदार ग्राहक यांना झालेल्या शारीरिक व मानसिक तर असा पोटी रक्कम दहा हजार रुपये व तक्रारीच्या खर्चापोटी रक्कम रुपये दहा हजार अशी सर्व रक्कम देण्याचे दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशाने आदेशित केले आहे.

दरम्यान या तक्रार प्रकरणात तक्रारदार ग्राहकांच्या वतीने पंढरपुरातून अभ्यासू विधीज्ञ श्री.कुलकर्णी यांनी बाजू मांडली व कंपनीच्या वतीने विधीज्ञ एस.डी.खाडे यांनी म्हणणे मांडले. या आदेशामुळे तक्रारदार ग्राहकाला न्याय मिळाला त्यामुळे मेडिक्लेम पॉलिसी उतरवलेल्या ग्राहकांम धुन समाधान व्यक्त होत आहे. या प्रकरणात तक्रारदार ग्राहक धोकटे कुटुंबियांना येथील ग्राहक पंचायतीचे पदाधिकारी दीपक इरकल व विनोद भरते यांनी मार्गदर्शन केले.

# कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधनासाठी अत्यंत फायदेशीर : डॉ. पाटील



**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ मार्च**

मानवी बुद्धिमत्तेला कृत्रिम बुद्धिमत्तेची जोड देऊन शैक्षणिक-औद्योगिक क्षेत्रात कमालीची प्रगती साध्य करता येऊ शकते. संशोधकांनी त्यासाठी सतत आग्रही राहायला हवे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ भौतिकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. विकास पाटील यांनी केले.

येथील श्री शिवाजी महाविद्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम उषा योजनेअंतर्गत कपॅसिटी बिल्डिंग प्रोग्राम, सूक्ष्मजीवशास्त्र विषयाचे राष्ट्रीय चर्चासत्र आणि भौतिकशास्त्र विषयाच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार बदललेल्या अभ्यासक्रमाची कार्यशाळा या कार्यक्रमांच्या संयुक्त उद्घाटन समरंभात संचालक डॉ. पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे हे होते. यावेळी बीजभाषक डॉ. एस. बी. देसाई (गोवा), डॉ. जी.एम. विद्यासागर (गुलबर्गा), डॉ. ए.एम. देशमुख, सोलापूर विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. अनिल घनवट, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, ग्रंथपाल माधव टिपरसे आदी उपस्थित होते.

पुढे डॉ. पाटील म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या जोरावर अनेक क्षेत्रांमध्ये कायापालट होत आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीने आपण आपल्या क्षेत्रात अधिक पारंगत व्हायला हवे असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे उपाध्यक्ष नंदन जगदाळे यांनी आजच्या नव्या पिढीने कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व ओळखले आहे. युवकांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन नवीन ज्ञान आत्मसात करायला. नव्या तंत्रज्ञानासोबत मैत्री केली तर नवे शास्त्रज्ञ तयार होतील, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अब्दुल शेख यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. रामेश्वर कोठावळे यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रविकांत शिंदे यांनी तर आभार प्रा. धनाजीराव माने यांनी मानले.



# राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत कोकरे प्रथम

## अरण येथील १७ व्या मिनी सब ज्युनियर स्पर्धा १५ वर्षाखालील

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.५ मार्च-**

महाराष्ट्र राज्य धनुर्विद्या संघटना व सोलापूर जिल्हा धनुर्विद्या संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने अरणच्या यशोदा गुरुकुल येथे १७ व्या मिनी सब ज्युनियर गटाच्या धनुर्विद्या स्पर्धा सुरु आहेत. या स्पर्धेचे उद्घाटन खासदार व सोलापूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या हस्ते झाले. राष्ट्रवादी (शप)चे जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख, धनुर्विद्या संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष भारत शिंदे, जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे सचिव व राज्य संघटनेचे उपाध्यक्ष हरिदास रणदिवे, राज्य संघटनेच्या सहसचिव सोनल बंदिले, तुळजापूरचे मुख्य अधिकारी अजिंक्य रणदिवे, चित्रपट निर्माते तेजपाल वाघ, क्रीडा अधिकारी सचिन रणदिवे, विठ्ठल भालेराव, उपस्थित होते.तीन दिवस चालणाऱ्या स्पर्धेत इंडियन, रिकर्व्ह व कंपाउंड प्रकरच्या मुला मुलींच्या स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी राज्यभरातून ४०० खेळाडू सहभागी झाले आहेत. रिकर्व्ह गटाच्या स्पर्धेमध्ये सोलापूरचे एंजल कोकरे, मुलाच्या गटातून क्रीडा प्रबोधनी अमरावतीचा खेळाडू सार्थक तिहिले यांनी प्रथम क्रमांक पटकाविले. सांघिक प्रकारामध्ये प्रथम क्रमांक बुलढाणा, द्वितीय क्रमांक पुणे व तृतीय क्रमांक सातारा संघाने व मुलींच्या गटांमध्ये प्रथम क्रमांक पिंपरी चिंचवड, द्वितीय क्रमांक नाशिक तृतीय क्रमांक बुलढाणा संघाने पटकाविला. मिक्स प्रकारामध्ये प्रथम क्रमांक नाशिक, द्वितीय क्रमांक बुलढाणा, तृतीय क्रमांक सोलापूरच्या संघाने मिळविला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी संघटनेचे पदाधिकारी, यशोदा गुरुकुल चे शिक्षक व कर्मचारी यांच्यासोबत सावता घाडगे, विठ्ठल माळी, सागर ताकतोडे, सागर सावंत, दीपक चिकणे, सागर सुर्वे हे परिश्रम घेत आहेत.

# युद्धामुळे भारतात शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान

**पिलीव, दि.५ मार्च-**

अमेरीका इराण युद्धामुळे भारतातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा झाला आहे. सध्या त्याठिकाणी इराण अमेरीका युद्धामुळे हवाई वाहतुक पुर्णपणे ठप्प झाली आहे. यामुळे भारतातुन जाणाऱ्या भाजीपाला तसेच केळी व आताच बाजारात आलेल्या आंब्याची त्या देशात होणारी निर्यात पूर्णपणे थांबली आहे. यामुळे सध्या भारतातील केळी उत्पादक शेतकऱ्यांचा माल तसाच पडून असुन मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. भारतातुन आखाती देशात भाजीपाला, फळे, केळी, आंबा मोठ्या प्रमाणात निर्यात केली जातात. भारतात नुकताच आंबा बाजारात आला आहे. केशर व इतर जातीचा आंबा भारतातून आखाती देशात मोठ्या प्रमाणात निर्यात केला जातो. पण सध्या युद्धामुळे या देशांच्या दरम्यानची वाहतुक ठप्प झाली आहे. तसेच आखाती देशातून खजूर व इतर अनेक पदार्थ व वस्तू आयात केल्या जातात. याची आयात सुद्धा पुर्णपणे थांबली आहे. सध्या रमजान महीना सुरू आहे. यामुळे भारतात खजुराची मागणी मोठ्या प्रमाणात असते. पण युद्धामुळे दोन देशा दरम्यानची आयात-निर्यात पुर्णपणे थांबली आहे. यामुळे खरेतर हवाई मार्ग बंद असल्यामुळे कृषी क्षेत्राला २००० कोटीचा फटका बसल्याचे बोलले जात आहे. युद्ध कधी थांबते याकडे भारतातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. यामुळे अजुन किती दिवस आर्थिक नुकसान सहन करावे लागेल अशी चर्चा शेतकऱ्यांमधून ऐकावयास मिळत आहे. भारतातून आखाती देशात भाजीपाला व फळे फार मोठ्या प्रमाणात निर्यात केली जातात. यामुळे खरेतर भारतातील अर्थ व्यवस्थेला चांगली चालना मिळते .अमेरीका इराण युद्धाचा परीणाम भारतातील अनेक गोष्टींवर होऊ शकतो असे बोलले जात आहे.

# उद्या आगळगाव, पांगरीत होणार छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ५ मार्च -**

छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबीर अभियान टप्पा क्र. १ अंतर्गत दि. ७ मार्च रोजी आगळगाव व पांगरी मंडळामध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत शिबीर आयोजित केले आहे. तरी आगळगाव व पांगरी मंडळातील सर्व नागरीकांनी सदर शिबिरामध्ये उपस्थित राहून विविध विभागाच्या शासकीय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार एफ. आर. शेख यांनी केले आहे.

महसुल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसुल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसुल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान' आयोजित करण्यात आले आहे.

**या ठिकाणी खालीलप्रमाणे सेवा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.**

१) प्रलंबित फेरफार निकाली काढणे.२) अभिलेख दुरुसती डेस्क. ३) लोकसेवा हक्क कायदा तात्काळ सेवा (उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवाशी / अदिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिम लेअर प्रमाणपत्र वितरीत करणे.) ४) भूसंपादन केलेल्या व अकृषक परवानगी दिलेल्या प्रकरणी कमी जास्त पत्रके तयार करुन गाव दप्तर अदयावत करणे. ५) नागरी सुविधा पुरविणेबाबत (एक खिडकी प्रणाली). ६) ई मोजणी. ७) ग्रीस्टॅक. ८) पी.एम.किसान. ९) तक्रार निवारण. १०) इतर विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवाचा लाभ वाटप. तरी संबंधित गावातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे तहसीलदार बार्शी यांनी आवाहन केले आहे.



# सी.ए.फायनल परिक्षेत पहिल्याच प्रयत्नात ओम तेंडुलकर उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. ५ मार्च -**

इन्स्टीटयुट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडीया यांच्या वतीने जानेवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेकया सी.ए.फायनल परिक्षेत येथील ओम पुरुषोत्तम तेंडुलकर हा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाला.

ओमच्या या यशा बद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. दरम्यान ओम तेंडुलकरच्या यशात त्याचे आई, वडील तसेच येथील कवठेकर अकौंटसी क्लासेसचे हंसकुमार कवठेकर सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

# छत्रपती ग्रुपने सामाजिक उपक्रमातून समाजापुढे ठेवला चांगला विचार व आदर्श : तहसीलदार शेख

## नगर पालिका शाळेला आरओ प्लांट व वॉटर कुलरचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ५ मार्च -**

येथील छत्रपती ग्रुपने आजवरच्या आपल्या सामाजिक उपक्रमातून समाजापुढे चांगला विचार व आदर्श समाजापुढे ठेवला आहे. इतर संस्था व मंडळांसाठी हे कार्य प्रेरणादायी आहे असे गौरवोद्गार तहसीलदार एफ.आर. शेख यांनी काढले.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त येथील छत्रपती ग्रुपच्यावतीने यशवंतराव चव्हाण नगरपरिषद शाळा क्र. १५ येथे विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याचा आर ओ प्लांट तसेच थंड पाण्यासाठी वॉटर कूलर बसविण्यात आला. या प्लांटच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते.

अध्यक्षीय मनोगतात तहसीलदार शेख म्हणाले, समाजातील काही संस्था समाजातून देणगी गोळा करतात. परंतु, प्रत्यक्षात काम कमी व देखावा जास्त असे स्वरुप असते. छत्रपती ग्रुप मात्र याला अपवाद असून समाजातील गरजू घटकांसाठी काम करत आहे.

माजी सभापती रणवीर राऊत म्हणाले, पालिकेची सीबीएसई माध्यमाची शाळा आगामी काळात सुरु होत आहे. शिक्षक बांधवांनी गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावेत. न पा शाळांच्या काही अडचणी असतील तर त्यांनी निःसंकोचपणे पुढे यावे. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली त्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहोत असे आवाहन केले. छत्रपती ग्रुपच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले.

प्रास्ताविकात छत्रपती ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष अजय उर्फ टिंकू पाटील म्हणाले, सन २०१० पासून छत्रपती ग्रुपच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम घेत आहोत. समाजातील गरीब, गरजू मुलींच्या नावे ५ हजार रुपयांची मुदत ठेव, गरजू महिलांना पिठाची चक्की, विविध शाळांना आर ओ प्लांट, सायकल वाटप, पूर प्रसंगी मदत कार्य असे अनेक समाजोपयोगी उपक्रम आजवर राबविले आहेत. न. पा .शाळातील विद्यार्थ्यांना थंड व निर्जंतुक शुद्ध पाणी मिळावे या हेतूने या शाळेत हा प्लांट बसविल्याचे सांगितले.

यावेळी सचिन वायकुळे यांनी प्रेरणादायी विचार व्यक्त केले. न.प. शाळेच्या मुख्याध्यापिका घाडगे यांनी छत्रपती ग्रुपचे आभार मानले.

याप्रसंगी नगराध्यक्ष तेजस्विनी कथले, मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, जेष्ठ नगरसेवक विजय राऊत, माजी सभापती रणवीर राऊत, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, सपोनि दिलीप ढेरे, गटनेते विजय चव्हाण, न.पा. शिक्षण मंडळाचे प्रशासनाधिकारी बावकर, शिक्षण सभापती भारत पवार, बांधकाम सभापती दिपक राऊत, पाणीपुरवठा सभापती संतोष बारंगुळे, वैद्यकीय अधीक्षक शितल बोपलकर, राकेश तातेड, गणेश गोडसे, माणिक हजारे, सुरेश शिंदे यांच्यासह छत्रपती ग्रुपचे अध्यक्ष बापूसाहेब पवार, उपाध्यक्ष हरीश डाके आणि कार्याध्यक्ष सचिन शिंदे व मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. नियोजन आणि परिश्रम हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी छत्रपती ग्रुपचे २०२६ चे कार्यक्रमाचे

अध्यक्ष- बापूसाहेब पवार, उपाध्यक्ष- हरिश डाके, कार्याध्यक्ष- सचिन शिंदे, जय शिवराय प्रतिष्ठान अध्यक्ष विजय राऊत गणेश हांडे, अमोल डिसले, कुमार माळी, सचिन राऊत, अमोल पाटील, युवराज ढगे, राहुल बारंगुळे, दत्ता मुकटे, मयूर पवार, अखिल पठाण, विनोद काकडे, सागर थोरात, श्रावण भालेराव, संदीप पवार, केतन उपळकर, वैभव योगे, समाधान राऊत, पवन गाजरे, रोहन भगत अभिजीत चव्हाण, पृथ्वीराज पाटील सचिन सुपेकर, दत्ता गात, नागेश मोहिते, आलिम मणियार, अक्षय गुळवे, प्रसाद परीट यांच्यासह ग्रुपच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## राजकीय अन्यायाच्या विरोधात

# मराठा समाजाचे अर्धनग्न आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मार्च-**

पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार देवेंद्र कोठे, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर आणि भाजपामधील काही प्रमुख लोकांनी मराठा समाजावर जो राजकीय अन्याय केला आहे. त्या विरोधात मराठा समाजबांधवांनी गुरुवार, दि.५ मार्च २०२६ रोजी चार हुतात्मा पुतळा येथे अर्धनग्न आंदोलन केले.

तब्बल ३२ वर्षानंतर सन १९९३ नंतर मराठा समाजाचा महापौर करण्याची संधी असताना भाजपामधील काही नेत्यांनी मराठा समाजाचा महापौर होऊ दिला नाही. मराठा समाजावर झालेल्या या अन्यायाच्या विरोधात यापुर्वी रक्ताने पत्र लिहिणे, मुंडण करुन घेणे, मूक आंदोलन यांसारखी आंदोलने करण्यात आली.

लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाने तुम्हाला मतपेटीतून उत्तर दिले आहे, विधानसभेला मराठा समाज तुमच्या सोबत होता. म्हणून तुम्ही सत्तेत आलात. जिल्हा परिषद निवडणुकीत मराठा समाजबांधव मतपेटीतून तुम्हाला उत्तर दिलं आहे, असे मराठा आंदोलन तथा मराठा क्रांती मोर्चाचे राम जाधव यांनी सांगितले. यावेळी संभाजी ब्रिगेड जिल्हा संपर्कप्रमुख छत्रगुण माने, किरण वाघमारे, किरण क्षीरसागर, राहुल जाधव, मारुती सुरवसे, ओंकार धावणे, सागर गायकवाड, संभा व्हळके, अक्षय माळवदकर, बापु शेळके, अमित जाधव, सुदीप पिंपरे यांच्यासह मराठा समाजबांधव उपस्थित होते.



## स्वर्णस्मृतिदले ग्रंथाचे उद्या प्रकाशन

**सोलापूर, दि.५ मार्च-**

ज्ञानप्रबोधिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या डॉ. स्वर्णलता भिशीकर यांच्या आठवणींचे संकलन असलेल्या 'स्वर्णस्मृतिदले' या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन शनिवार दि. ७ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजता हुतात्मा स्मृती मंदिरात होणार आहे.



या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज उपस्थित राहणार आहेत. याच कार्यक्रमात स्वर्णलता भिशीकर यांच्या जीवनावरील नाटिका सादर करण्यात येणार आहे. यानंतर स्मृतिग्रंथाचे प्रकाशन होणार आहे. या कार्यक्रमास सोलापूरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन ज्ञान प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष गिरीश बापट यांनी केले आहे.

## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी बाळासाहेब गोतसुर्वे

**सोलापूर, दि. ५ मार्च-**

महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व सर्वंट सोशल फाउंडेशन यांच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ जयंतीनिमित्त झालेल्या सभेत उत्सव समिती अध्यक्षपदी बाळासाहेब गोतसुर्वे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्ष : दयानंद बनसोडे, नेहा चाबुकस्वार, सेक्रेटरी : कुमार मोरे, सहसेक्रेटरी : रोहन वाघमारे, खजिनदारः राहुल बाबरे ,कार्याध्यक्ष : आकाश मोरे, ऑडिटर : मनोज सोनवणे, कार्यक्रम प्रमुखः सुनील भालेराव, शेषराव शिरसठ, शुभम रणखांबे, अजय मोरे, प्रमुख सल्लागारः अशोक जानराव, लिंबाजी जेटीथोर, नितीन नरळे, अलीम पठाण, गणेश गायकवाड, किशोर कांबळे, सागर शिरसे आदी.

# सोलापूर @ ३८.८

### मार्चच्या सुरुवातीलाच वाढल्या उन्हाच्या झळा

### थंड पेयांच्या दुकानांवर वाढली गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ मार्च-**

फेब्रुवारी महिना संपताच सोलापूरच्या तापमानाने यंदा मोठी उसळी घेतली आहे. आज, गुरुवार, दि. ५ मार्च रोजी सोलापूर शहरात हंगामातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली असून, उन्हाचा पारा आता थेट ३९ अंशांच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे. यामुळे मार्चच्या पहिल्या पाच दिवसांतच सोलापूरकरांना कडक उन्हाचा सामना करावा लागत आहे. दरम्यान, दुपारचा उष्णतेचा दाह वाढू लागल्याने थंड पेयांच्या दुकानांवर गर्दी वाढू लागली आहे.



हवामान कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, शहराचे आजचे तापमान ३८.८ अंश सेल्सियस इतके नोंदवले गेले आहे. उष्णतेचा दाह वाढू लागल्याने आता दुपारचे रस्ते पडले ओस पडू लागले आहेत. सकाळपासूनच उन्हाची तीव्रता अधिक असल्याने दुपारच्या वेळी वर्दळीचे रस्ते ओस पडल्याचे दिसून आले. हवेतील आर्द्रता २९ टक्क्यांपर्यंत खाली आल्याने कोरड्या उन्हाचा तडाखा अधिक जाणवत आहे. तसेच, किमान तापमान २०.७ अंश सेल्सियसवर गेल्याने रात्रीच्या वेळीही उकाडा वाढला असून, गारवा पूर्णपणे गायब झाला आहे.

**आरोग्य विभागाकडून सावधानतेचा सल्ला**

तापमानातील या अचानक वाढीमुळे आरोग्य विभागाने नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. तज्ज्ञांनी सुचवलेले महत्त्वाचे उपायांमध्ये भरपूर पाणी प्या, शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊ नये म्हणून दिवसभर जास्तीत जास्त पाणी पिण्याचे आवाहन केले आहे. दरम्यान, दुपारी १२ ते ४ या प्रखर उन्हाच्या वेळेत शक्यतो घराबाहेर पडणे टाळावे. उष्णतेपासून वाचण्यासाठी बाहेर पडताना फिकट रंगाचे आणि सुती कपडे वापरावेत. हवामान विभागाने दिलेल्या संकेतांनुसार, येत्या काही दिवसांत हा पारा आणखी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे उन्हाची तीव्रता कायम राहणार असल्याने सोलापूरकरांनी सज्ज राहणे गरजेचे आहे.

# अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाने पटकावला जिल्ह्यात प्रथम क्रमांक




### मुंबईत पार पडला पुरस्कार वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. ५ मार्च**

राज्यातील आरोग्य सेवेत ग्रामीण भागात अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून गुणवत्ता व विश्वासार्हता जपल्यामुळे अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाने सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत मानाचा पुरस्कार मिळवला आहे. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृह येथे झालेल्या भव्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राज्यातील विविध जिल्ह्यांतील रुग्णालया मधून निवड प्रक्रियेनंतर हा सन्मान देण्यात येतो. दरवर्षी कठोर निकषांवर आधारित मूल्यांकन करून हा पुरस्कार दिला जातो. यामध्ये मेजर सर्जरी, ओपीडी सेवा, मोठ्या व छोट्या शस्त्रक्रिया, सिझेरियन डिलिव्हरी, नॉर्मल डिलिव्हरी, रुग्णसंख्या आदी बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात येतो. एकूण २१ गुणांपैकी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाने तब्बल २० गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. पुरस्कार वितरण आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अशोक राठोड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा डोईफोडे, डॉ. निखिल क्षीरसागर, डॉ. बाबासाहेब सुलतानपुरे आदी मान्यवर उपस्थित होते. या यशामध्ये डॉ. वर्षा डोईफोडे, डॉ. श्रीकांत कुलकर्णी व डॉ. चंद्रकांत क्षीरसागर यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. ग्रामीण भागात अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देत रुग्णालयाने गुणवत्ता व विश्वासार्हता जपल्यामुळे हा सन्मान मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## युध्दजन्य भागात अडकलेल्या लोकांना मायदेशी आणण्याचा प्रयत्न सुरूच



### सोलापुरातील ४ जणांना आणले

### अजून ७१ जणांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

इराण-इराक या देशांमध्ये संभाव्य युद्धजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन सोलापूर जिल्हा प्रशासनामार्फत नागरिकांसाठी आवश्यक सूचना जारी करण्यात येत आहेत. जिल्ह्यातील नागरिकांचे नातेवाईक अथवा परिचित इराण किंवा इराक येथे वास्तव्यास असल्यास त्यांच्या सुरक्षिततेबाबत किंवा इतर कोणत्याही बाबतीत माहिती आवश्यक असल्यास संबंधितांनी जिल्हा प्रशासनाने स्थापन केलेल्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे. आजतागायत भारतीय विमानसेवेद्वारे विदेशातून सोलापूर जिल्ह्यातील ४ जणांना मायदेशी आणण्यात आले असून, अजून ७१ जण अडकले असल्याचे आपत्ती विभागाकडून सांगण्यात आले.

सोलापूर आपत्ती विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार आपल्या जिल्ह्यातील विदेशात नोकरीसाठी किंवा पर्यटनासाठी गेलेले अजून ७१ जण बाहेर आहेत. सोलापुरातील ४ जणांना दिल्लीपर्यंत आणले होते. ते बुधवारी सुखरूप सोलापुरात आले आहेत. जिथे विमानसेवा शक्य आहे अशा काही भागातून भारतीय विमानसेवेच्या कर्मचाऱ्यांनी देशातील काहीजणांना मायदेशी आणले आहे. त्यामध्ये सोलापूरच्या ४ जणांचा समावेश होता. अडकलेल्या नागरिकांना आणण्यासाठी अजूनही प्रयत्न सुरूच आहेत. तरीही कोणत्याही नागरिकाकडून इराण-इराक येथे वास्तव्यास असलेल्या व्यक्तींबाबत चौकशी प्राप्त झाल्यास मंत्रालय नियंत्रण कक्षामार्फत संबंधित भारतीय दूतावासाशी संपर्क साधून त्या व्यक्तींच्या सुरक्षिततेबाबत माहिती प्राप्त करून ती संबंधितांना कळविण्यात येईल. सदर बाबीची नोंद घेऊन नागरिकांनी आवश्यकतेनुसार खालील नियंत्रण कक्षांशी संपर्क साधा, असेही आवाहन मंत्रालय स्तरावरील अधिकाऱ्यांनी आणि सोलापूर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

# बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे ३.६२ कोटींचा घोटाळा

### सोलापुरातील तीन अधिकारी निलंबित

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ५ मार्च -**

बांधकाम कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी असलेल्या शिष्यवृत्ती योजनेत मोठा आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आला असून, बोगस प्रमाणपत्रांच्या आधारे तब्बल ३ कोटी ६२ लाख रुपयांचा अपहार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तालुका निरीक्षक अजिंक्य पवार, संतोषसिंग राजपूत आणि उज्वल सूर्यवंशी यांच्यावर बुधवारी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांच्या मुलांना उच्चशिक्षणासाठी दरवर्षी प्रत्येकी ६० हजार रुपयांची शिष्यवृत्ती दिली जाते. मात्र सोलापूर जिल्ह्यात काही अधिकाऱ्यांनी कामगारांच्या नावावर बोगस कार्ड तयार करून परराज्यातील महाविद्यालयांची बनावट प्रमाणपत्रे सादर केली. त्याआधारे शिष्यवृत्तीची रक्कम काढून शासनाची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. सोलापूर जिल्ह्यात सुमारे एक लाखांहून अधिक बांधकाम कामगारांची नोंद आहे. यापैकी २२३ लाभार्थ्यांनी सहा महिन्यांपूर्वी तक्रार करून आपल्या पाल्यांच्या नावाने शिष्यवृत्तीची रक्कम काढल्याचे सांगितले होते. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आहे. दरम्यान, आमदार विजयकुमार देशमुख यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी या प्रकरणी तारांकित प्रश्न दाखल केला होता. बांधकाम कामगारांच्या नावावर बोगस कार्ड तयार करून बनावट शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे सुमारे आठ कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे. हा प्रश्न अधिवेशनात उपस्थित होण्यापूर्वीच कामगार आयुक्तांनी प्राथमिक चौकशी करून तीन अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली.

या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी सर्व अर्ज, बँक व्यवहार, लाभार्थ्यांची यादी आणि संबंधित शैक्षणिक संस्थांची पडताळणी करण्यात येणार आहे. मिळालेल्या तक्रारीवरून केलेल्या प्राथमिक तपासात ३ कोटी ६२ लाख रुपयांचा अपहार आढळल्याने तातडीने अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.''तसेच दोषी अधिकाऱ्यांवर फौजदारी चावडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती सोलापूरचे कामगार आयुक्त मंगेश झोले यांनी दिलीय.

# हिंदुराष्ट्र जागृती सभेच्या प्रसाराला वेग



**सोलापूर, दि.५ मार्च-**

शहरातील भवानी पेठ येथील जयभवानी प्रशालेच्या मैदानावर दि.११ मार्च २०२६ रोजी 'हिंदु राष्ट्र जागृती सभा' आयोजित करण्यात आली आहे. या सभेच्या यशस्वी आयोजनासाठी हिंदु जनजागृती समिती कार्यकर्ते सध्या जिल्ह्यात वेगाने प्रसारकार्य करत आहेत.

सोलापूर येथील टिळक चौक ते बलिदान चौक येथे या प्रसार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. ही फेरी टिळक चौक-मधला मारुती-माणिक चौक-संयुक्त चौक-पेट्रोल पंप-कन्ना चौक-जोडभावी पेठ-कुंभार वेस-बलिदान चौक या मार्गाने काढण्यात आली होती.

यावेळी प्रवीण पाटील, रामेश्वरी बिर्रु, चंद्रकांत रामणशेट्टी, नागेश कन्नगी, प्रशांत ढगे, भास्कर बिंगी, लक्ष्मण साळुंखे, विक्रम घोडके, बापू ढगे आदी उपस्थित होते.

**६० गावांमध्ये सभेचा प्रसार**

आतापर्यंत सोलापूर शहरासह ६० गावांमध्ये सभेचा प्रसार करण्यात आला. १८० हुन अधिक मोठ्या बैठका आणि ४५० हुन अधिक कोपरा बैठका घेण्यात आल्या. एकूण ६००० हून अधिक नागरिकांपर्यंत थेट संपर्क साधण्यात आला आहे. घरोघरी जाऊन १५ हजार ५५७ पेक्षा अधिक नागरिकांपर्यंत सभेचा संदेश पोहोचविण्यात आला आहे. सभेसाठी २० हजाराहून अधिक निमंत्रण पत्रिकांचे वितरण करण्यात आले आहे.

**आज पूर्वभागात प्रसार फेरी**

शुक्रवार, दि.६ मार्च २०२६ रोजी पूर्वभागातील सिध्दगणेश हनुमान मंदिर, ७० फूट रस्ता, गणेश मंदिर, सेवासंग शरण शिवलिंगेश्वर मठ, शिव मंदिर बेडर गल्ली, विजय नगर, साईबाबा चौक, बोल्ली मंगल कार्यालय या मार्गावरुन प्रसार फेरी काढण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

## कै. शिवदारे जन्मशताब्दी वर्षानिमित्त समारंभ



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च -**

सोलापूरः- थोर स्वातंत्र्य सेनानी, सहकार महर्षी व माजी आमदार कै. वि.गु. शिवदारे अण्णा यांच्या जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त महिला दिनाचे औचित्य साधून श्री वि.गु. शिवदारे प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने सोलापुरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पाच महिलांचा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला आहे अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी दिली.

शिवदारे शैक्षणिक संकुल जुळे सोलापूर येथील फार्मसी कॉलेजच्या ऑडीटोरियम येथे शनिवार दिनांक ७ मार्च २०२६रोजी सकाळी १०.३० वा. प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा सौ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते या महिलांचा गौरव करण्यात येणार असून सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाच्या विश्वस्त सौ. भारती शिवदारे यांची उपस्थिती लाभणार आहे. सोलापुरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सौ. विजयालक्ष्मी कुरी या मुळच्या सोलापूरच्या असून गेली ३० वर्ष पोलीस खात्यात कार्यरत आहेत. सरळसेवेतून त्या पि.एस.आय. म्हणून रुजू झाल्या असून महिला सबलीकरण व महिला सुरक्षा याबाबत त्या सातत्यपूर्ण कार्य करीत आहेत. आज सोलापुरच्या सहाय्यक पोलीस आयुक्त या पदावर त्या उल्लेखनीय कार्य करीत आहेत.

सौ. लक्ष्मी कुर्लेकर या महिलांसाठी गेली २५ वर्षे स्वयंरोजगार प्रशिक्षक म्हणून कार्यरत असून फॅमिली प्लॅनिंग असो. च्या माध्यमातून ही महिला विषयक उपक्रम त्या राबवित आहेत. महिलांना उदरनिर्वाहासाठी गेली अनेक वर्षे त्या स्वयं रोजगार उपलब्ध करून देत आहेत.

सौ रंजीता चाकोते या सोलापूरच्या वीरशैव लिंगायत समाजातील अक्कनबळग या संस्थेच्या विद्यमान अध्यक्षा आहेत. अनेक सामाजिक संस्थेशी त्या निगडीत असून सोलापूर महानगर पालीकेत नुकत्याच त्या नगरसेवक म्हणूनही निवडून आल्या आहेत.

सोलापूरच्या सामाजिक, आर्थिक क्षेत्रात गेली ३० वर्षे कार्यरत असणाऱ्या सौ. सुधा अळ्ळीमोरे या पतंजली योग समीती मध्दे राष्ट्रीय स्तरावर गेली २१ वर्षे कार्यरत असून त्या योगगुरू म्हणून परिचित आहेत.

सोलापुरातील सामाजिक, कृषी व महिला विषयक कार्यरत असणाऱ्या श्रीमती पुष्पा गुंगे या महाराष्ट्र वीरशैव लिंगायत सभेच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षा असून महिला विषयक कार्यात त्या सातत्यपूर्ण कार्य करीत आहेत. अशा या पाच कर्तृत्ववान महिलांचा गौरव कै. वि.गु. शिवदारे जन्म शताब्दीनिमित्त आयोजित केला आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## ▶▶ महत्वाचे...

### स्वामी विवेकानंदांच्या पुतळ्याचे उद्या एमआयटीमध्ये अनावरण

**सोलापूर, दि.५ मार्च-**

स्वामी विवेकानंद यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये शनिवार, ७ मार्च रोजी सकाळी ११ वाजता श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र अयोध्या ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी प्रेम मोटे यांनी पत्रकार परिषदेत दिली. नालंदा विद्यापीठाचे माजी कुलगुरु तथा 'परम' महासंगणकाचे शिल्पकार, पद्मभूषण डॉ. विजय भटकर, श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प.गहिनीनाथ औसेकर यांच्या हस्ते, 'माईर्स एमआयटी'चे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.विश्वनाथ कराड यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होणार आहे. एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा.स्वाती कराड चाटे, विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी तसेच संस्थेचे विश्वस्त आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. माईर्स एमआयटीच्या विश्वस्त व महासचिव प्रा.स्वाती कराड-चाटे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर येथे एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. विद्यापीठामध्ये उभारण्यात आलेला स्वामी विवेकानंदांचा पुतळा हे केवळ एक स्मारक नसून विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरणार आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी शांतकुमार साबळे उपस्थित होते.



### शाम मंदिर ट्रस्टतर्फे रविवारी सप्तम श्याम वंदना महोत्सव

**सोलापूर, दि.५ मार्च-**

भवानी पेठ परिसरातील कुंभार वेस येथील शाम मंदिर चॅरिटेबल ट्रस्टतर्फे रविवार, दि. ८ मार्च रोजी सप्तम शाम वंदना महोत्सवाचे आयोजन करण्यात आली, अशी माहिती ट्रस्टचे आनंद खंडेलवाल यांनी पत्रकार परिषदेत दिली. शनिवार दि.७ मार्च रोजी दुपारी ५ वाजता बाळीवेस येथील मारुती मंदिर येथून शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या शोभायात्रेत दिल्ली येथील झांकी कलाकार पौराणिक वेशभूषेमध्ये सहभागी होतील. शेकडो महिला आणि पुरुष भाविक मंगलकलश व ध्वजा (निशाण) घेऊन राहभागी होणार आहेत. जुना कारंबा नाका येथील झंवर लॉन्स येथे शोभायात्रेचा समारापे करण्यात येणार आहे. रविवारी दिल्ली येथील सुप्रसिध्द भजन गायिका सोनी सिस्टर्स शाम भजनांची मेजवानी देतील. केरळच्या जगप्रसिध्द मार्शल आर्टिस्टचे पथक थरारक युध्दकला सादर करणार आहे, असेही त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला अमर खंडेलवाल, गोविंद खंडेलवाल, भाग्यश्री खंडेलवाल, आरती खंडेलवाल उपस्थित होते.

### रस्त्यामध्ये का उभारला अशी विचारणा केली असता मारहाण

**सोलापूर, दि.५ मार्च-**

रस्त्याच्या मध्ये का उभारला असे विचारणा केली असता दोघांनी मिळून हुज्जत घालत शिवीगाळ करून एका मारहाण केला केली असल्याची घटना भवानी पेठ येथे घडली आहे. दि. ४ मार्च रोजी आरोपी द्विवीत बाळू बनसोडे, गोंदु बाळू बनसोडे राहणार मड्डे वस्ती, भवानी पेठ सोलापूर हे राजू शामराव वाघमारे यांच्या घरा समोरील डांबरी रोडवर मधोमध उभारले असता राजू यांनी त्यांना रस्त्याच्या मध्ये का उभारला असे विचारणा केली असता द्विवीत हा राजू यांच्याशी हुज्जत घालून भाऊ गोंदू याने मिळून आमच्याशी हुज्जत घालता का असे म्हणून शिवीगाळ केली.

# आदिला नदी : ले-आउटनुसार काम करण्याविषयी सक्त आदेश

### नालेसफाई, पाणीपुरवठा, मान्सूनपूर्व कामांचा घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मार्च-**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आदिला नदी येथील वैशाली हाईट्स परिसरातील नाल्याच्या खोलीकरण व दुरुस्ती कामाची आयुक्तांनी प्रत्यक्ष पाहणी करत काम केवळ मंजूर ले-आउटनुसारच करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. कामात अडथळा आणणाऱ्यांना नोटीस देण्याचा इशारा देत रहदारी सुरळीत ठेवण्यासाठी १ मीटर व्यासाची पाईप टाकण्याचे आदेश देण्यात आले.

खोदकामातील माती व दगड तात्काळ हटवण्याच्या सूचना कंत्राटदाराला दिल्या आहेत. मान्सूनपूर्व कामाच्या निमित्ताने शहरातील नालेसफाई, ड्रेनेज लाईन आणि नागरी सुविधांच्या कामांचा आढावा घेण्यासाठी सोलापूर महानगरपालिका आयुक्तांनी आज विविध प्रभागांचा पाहणी दौरा केला. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी जाऊन तांत्रिक सूचना दिल्या. नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. इंदिरा नगर ते एस.टी. बस स्थानक क्र. २ पर्यंतच्या नाला सफाईचा आढावा घेताना आयुक्तांनी स्वच्छतेबाबत सक्त सूचना दिल्या.



मनपा मराठी शाळा क्र. ५ लाही भेट देऊन आयुक्तांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि त्यांची छोटी चाचणी घेऊन शैक्षणिक दर्जाची पडताळणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक गौतम कसबे, नगरसेविका मंदाकिनी तोडकर, राजश्री धोंडमनी, वनिता पाटील, नगर अभियंता सारिका आकुलवार, विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, सरकाजी, सहाय्यक अभियंता शाम कन्ना, मुख्याध्यापक संदीप गोळावे, विभागीय अधिकारी गायधनकर आदी उपस्थित होते.

**नाल्यातील गाळ, झाडेझुडपे**

कारंबा नाका आणि शेळगी नाल्याच्या पाहणी दरम्यान आयुक्तांनी नाल्यातील गाळ व झाडे-झुडपे तातडीने काढण्याचे आदेश दिले. पाण्याचा प्रवाह सुरळीत राहण्यासाठी नाल्याचा गोलाकार भाग कपात करून तो सरळ करण्याच्या सूचनाही आयुक्त यांनी दिल्या.

**अनधिकृत नर्सरींना नोटीस**

प्रभाग क्र. २३ मध्ये ड्रेनेज लाईन व पाणीपुरवठा सुधारणाअंतर्गत म्हाडा कॉलनी ते पनाश अपार्टमेंट दरम्यान टाकण्यात येणाऱ्या ड्रेनेज पाईपलाईन पाईपलाईन सलग न टाकता ठराविक अंतरावर मॅनहोल्स तयार करण्याचे त्यांनी आदेश दिले. प्रकल्पाच्या जागेतील अनधिकृत नर्सरींना तात्काळ नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले.

**पाणीपुरवठ्याच्या वेळेत बदल**

नगरसेविका वनिता पाटील यांनी उपस्थित केलेल्या पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर रात्री ९ ते १२ ही पाणी सोडण्याची सुधारित वेळ करु, असे आयुक्तांनी सांगितले. उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या विनंतीनुसार येथे देशी वृक्ष लागवडीच्या सूचनाही देण्यात आल्या.



## प्रसूतीगृहातील परिचारिकांवर वाढतोय कामाचा ताण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.५ मार्च-**

सोलापूर महापालिकेच्या प्रसूतीगृहातील परिचारिकांवरील वाढता कामाचा ताण कमी करण्यात यावी. ऑनलाईन जन्म नोंदणीचे काम थांबविण्यात यावी, अशी मागणी सोलापूर महानगरपालिका परिचारिका असोसिएशनने महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, आरोग्याधिकारी डॉ. राखी माने यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

महापालिका अंतर्गत सर्व प्रसूतीगृहांमध्ये परिचारिका रात्रपाळीत काम करत असून, सलग सात दिवस रात्रपाळी केल्यामुळे त्यांच्यावर शारीरिक व मानसिक ताण वाढत आहे. नवजात शिशूंची काळजी, रुग्णांची देखभाल आणि इतर दैनंदिन कामांसाठीही मोठा वेळ द्यावा लागतो. ऑनलाईन प्रणालीतील तांत्रिक अडचणी, टायपिंगमधील चुका आणि तांत्रिक ज्ञानाचा अभाव यामुळे अतिरिक्त ताण निर्माण होत आहे, असेही या निवदेनात म्हटले आहे. परिचारिका असोसिएशनच्या अध्यक्षा रेश्मा तलफदार यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी उपाध्यक्ष विद्यादेवी मोरे, सचिव लता काळे, सल्लागार समीर शेख, चांगदेव सोनवणे, वंदना गवळी, वनिता साठे, राणी कांबळे, विकास पवार, मोहम्मद यासीन, संगीता जाधव, रिबेका कार्यकर, प्रियाराणी वाघमारे आदी उपस्थित होते.

**जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्यावतीने**

## कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील माजी सैनिकांना त्यांच्या आवडीनुसार योग्य तो कौशल्य विकास अभ्यासक्रम निवडता यावा आणि त्यांचे प्रभावी पुनर्वसन व्हावे; यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने आयोजित शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.



जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे, माजी कौशल्य विकास अधिकारी दत्तात्रय देवळे, जिल्हा कौशल्य विकास सहाय्यक तज्ज्ञ समुपदेशक पार्थ तेरकर यांनी विविध कोर्सेसची व अल्पबचत गट स्थापनेबाबतची मार्गदर्शन केले. याप्रसंगी एकूण ५५ माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी तसेच कार्यालयाकडील कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी प्रास्ताविक केले. सहाय्यक जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी संजीव पवार यांनी आभार मानले.



## मुद्रा नागरी आरोग्य केंद्र येथील क्षयरोग तपासणी केंद्राचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

महानगरपालिकेच्या वतीने मुद्रा नागरी आरोग्य केंद्र येथे क्षयरोग अधिकृत सूक्ष्मदर्शक तपासणी केंद्र व अत्याधुनिक मशीनचे उद्घाटन महापौर विनायक कोंडयाल यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी नगरसेविका मीनाक्षी कडगंची, आरोग्याधिकारी डॉ.राखी माने, शहर क्षयरोग अधिकारी डॉ.अरुंधती हराळकर यांच्यासह राजकुमार हंचाटे, दत्तात्रय कडगंची यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.प्रसन्नजीत वाघचवरे व प्रियांका पवार यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अंबिका देढे, दीपिका रोडे, रजनी कोल्हापुरे, विजया चौगुले या आशा सेविकांचा गौरव करण्यात आला.

यावेळी क्षयरुग्णांना आभा कार्ड आणि फूड बास्केटचे वाटप करण्यात आले. यावेळी विनायक दळवी, प्रमोद मुळीक, ओंकार गवळी यांच्यासह मुद्रा नागरी आरोग्य केंद्रातील कर्मचारी उपस्थित होते.

## सोलापूर-श्रीशैलम् बससेवेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ मार्च-**

आंध्र प्रदेशातील श्रीशैलम् येथे उगादी अर्थात गुढीपाडवा दिनी मोठी यात्रा भरते. यासाठी सोलापुरातील भक्तगण मोठ्या संख्येने जात असतात. ही बाब लक्षात घेवून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या वतीने सोलापूर-श्रीशैलम् बससेवेचा शुभारंभ करण्यात आला.

सिध्देश्वर यात्रेचे प्रमुख मानकरी सागर हिरेहब्बू, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर यांच्या हस्ते बसचे पूजन करण्यात आले. ही बस पहाटे ५.३० वाजता सोलापूर बसस्थानकहून सुटणार आहे. सायंकाळी ७ वाजता श्रीशैलम् येथे पोहोचणार आहे. याप्रसंगी वाहतूक निरीक्षक कोळी, चालक श्रीशैल शिरोळकर व महाडिक, वाहक जक्का, सिध्देश्वर सेवा संस्थेचे सिध्दाराम येणगुरे, किसन गर्जे, शैलेश बाभुळकर, योगेश होळीमठ यांच्यासह महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे कर्मचारी, प्रवासी उपस्थित होते.



## आयआयटी परीक्षेत सोलापूरची वेदिका काबरा देशात दुसरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) मुंबईद्वारे घेण्यात आलेल्या मास्टर ऑफ डिझाईन प्रवेश परीक्षेत (CEED २०२६) सोलापूरच्या वेदिका आनंद काबरा हिने दैदिप्यमान यश संपादन केले आहे. अखिल भारतीय स्तरावर दुसरा क्रमांक पटकावून तिने सोलापूरच्या शैक्षणिक इतिहासात नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.

तिने सोलापूरच्या महेश इंग्लिश स्कूलमधून प्राथमिक, हिराचंद नेम चंद कॉलेज ऑफ कॉमर्समधून उच्च माध्यमिकचे शिक्षण घेतले. सध्या ती एनआयएफटी-हैदराबाद येथे फॅशन कम्युनिकेशनच्या अंतिम वर्षात शिकत आहे. आयआयटी-मुंबई येथे 'इंटरॅक्शन' किंवा 'कम्युनिकेशन डिझाइन'मध्ये तिला पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे आहे, असे तिने सांगितले. या यशाचे श्रेय देताना वेदिकाने आपल्या आईचे, सौ. अनुराधा आनंद काबरा यांचे विशेष आभार मानले आहेत. अनुराधा काबरा या स्वतः एक उत्तम 'फाईन आर्टिस्ट' आहेत. केंद्रप्रमुख धर्मेश टांक यांचे मार्गदर्शन लाभले.



**टांक, शाह, कुलकर्णी, आराध्ये यांचेही यश**

सोलापूरच्या प्राची टांक, ऋतू टांक, आत्मन शाह, मोनिका कुलकर्णी आणि चारुदत्त आराध्ये या विद्यार्थ्यांनीही आयआयटीमध्ये यश मिळवले असल्याचे सांगण्यात आले.

## सोलापूर महापालिका स्थापनेपासून सहा महिलांना स्थायी समितीच्या सभापदीपदावर मिळाली संधी

**● रंजीता चाकोते ह्या भाजपाच्या ६ व्या तर आतापर्यंतच्या ४९ व्या सभापती म्हणून विराजमान होणार**

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

सोलापूर महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीच्या ४९ व्या सभापतीपदी भाजपच्या रंजीता चाकोते यांची बिनविरोध निवड होणार आहे. महापालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत भाजपाचे पाच सभापती झाले असून सहाव्या सभापतीपदी रंजीता चाकोते या विराजमान होणार आहेत.

सोलापूर महानगरपालिकेची स्थापना १९६४ मध्ये झाली. महापालिकेत आर्थिक अधिकार असलेली महत्त्वपूर्ण समिती म्हणून स्थायी समितीकडे पाहिले जाते. महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या या समिती सभापतीकडे असतात. स्थायी समिती ही केवळ एक समिती नसून महापालिकेच्या आर्थिक, धोरणात्मक आणि विकासात्मक निर्णयांची 'केंद्रबिंदू' मानली जाते. महापालिकेच्या कामकाजात स्थायी समितीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

अंदाजपत्रक मंजुरीपासून विविध विकासकाम ांच्या निविदा, खर्च मंजुरी, निधी वितरण, प्रशासकीय मान्यता अशा अनेक निर्णायक बाबी या समितीमार्फत पार पडतात. त्यामुळे या समितीचा सभापती म्हणजे शहराच्या विकासाच्या गतीला दिशा देणारा प्रमुख घटक ठरतो.



आतापर्यंत एकूण ४८ जणांनी हे महत्त्वपूर्ण पद सांभाळले. सोलापूर महापालिकेत स्थायी समितीच्या पहिल्या सभापतीपदी एकनाथ तुळशीराम माने हे विराजमान झाले होते. दि.१ मे १९६४ ते ३० जून १९६६ या कार्यकाळात त्यांनी सभापतीपद भूषविले. दरम्यान, सन २०१८ नंतर आठ वर्षांनी सोलापूर महापालिकेला स्थायी समितीचा चेअरमन लाभणार आहे. भाजपाचे पहिले स्थायी समिती सभापती होण्याचा मान स्व.लिंगराज वल्याळ यांना १३ मे १९८५ ते ३० एप्रिल १९८६ या कालावधीत मिळाला. ते पुढे आमदार-खासदार झाले. त्यानंतर जगदीश पाटील ५ जून १९९८ ते ५ मार्च १९९९, सूर्यकांत (सुरेश) पाटील ५ मार्च १९९९ ते ४ मार्च २०००, प्रा.मोहिनी पतकी ४ मार्च २००० ते २ मार्च २००१ संजय कोळी १८ मार्च २०१७ ते १ मार्च २०१८ यांनी सभापती म्हणून काम पाहिले होते.

**या महिलांनी भूषविले सभापती पद**

स्थायी समिती सभापतीपदी आत्तापर्यंत एकूण पाच महिलांना संधी मिळाली आहे. रंजीता चाकोते ह्या सहाव्या महिला सभापती ठरणार आहेत. पहिल्या महिला सभापतीपदाचा मान प्रभावती मसरे यांना (१ मार्च १९९४ ते २१ मार्च १९९४) मिळाला होता. त्यानंतर शिवलिंगम्मा आसादे (२१ मार्च १९९४ ते १९ फेब्रुवारी १९९६), प्रा.मोहिनी पतकी (४ मार्च २००० ते २ मार्च २००१), विजया थोबडे (२ मार्च २००१ ते १ मार्च २००२), हणमंती करगुळे (५ मार्च २००८ ते ३ मार्च २००९) यांनी सभापती पदाची जबाबदारी पार पाडली.

## शहरातील दोन्ही उड्डाणपूलांबाबत आता मंत्रालयातून हालचाली !

**दोन दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी आशिर्वाद घेतला आढावा | मंत्रालयातील बैठकीत ४ एप्रिलचा अल्टिमेटम | आजतागायत १०० च्या वर झाल्या बैठका**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी २०१४ साली केंद्रीय रस्ते परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उड्डाणपुलाच्या कामाचे उद्घाटन होवून घोषणा झाली. या उड्डाणपुलाची घोषणा होवून एक तप (१२ वर्षे) उलटले तरी अद्याप महापालिकेकडून भूसंपादनाचे काम चालू झाले नाही. मंत्रालयात झालेल्या बैठकीत आता ४ एप्रिलचा अल्टिमेटम दिलेला आहे.

दरम्यान, याबाबत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आढावा बैठक घेतली आणि कामाला गती आणण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी मात्र या कामासाठी उदासिनच असल्याचे दिसून येत आहे. या उड्डाणपुलासाठी



११०० कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. इतकेच नाहीतर महापालिकेने भूसंपादित केलेल्या काही जणांना ६० ते ७० कोटी वाटपही केले असून, त्या जागाही पालिकेने ताब्यात घेतल्या नसल्याची माहिती मिळत आहे.

केवळ महापालिकेकडून वेळेत भूसंपादनाचे काम होत नसल्यानेच हे काम रखडले आहे. राज्याऐवजी केंद्राकडून निधी मिळवण्यासाठी शहरातील राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपूल तयार करण्यात येणार आहे. त्यास राज्य शासनाने मंजुरी दिली होती. शहरात उड्डाणपूल बांधण्यास राज्याच्या रस्ते विकास महामंडळाच्या संचालक मंडळात २७ मार्च २०१४ रोजी मंजुरी देण्यात आली आहे. शहरात जुना पुणे नाका ते पत्रकार भवन हा ७.७० किलोमीटर तसेच जुना बोरामणी नाका ते जुळे सोलापूर मोरारका बंगल्यापर्यंत ४.९२ किलो मीटर असे १२.६२ किमीचे दोन उड्डाणपूल होणार आहेत. त्यासाठी आवश्यक ते भूसंपादन करण्याची जबाबदारी महापालिकेची आहे.

या कामाच्या प्रगतीबाबत आजतागायत अंदाजे १०० च्यावर बैठका झाल्या असून, या पुलांच्या कामांना कधी मुहूर्त निघणार? असा सवाल नागरिकांतून विचारला जात आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३७४

**जैसा शिष्यांतें गुरु । सर्वथा नेणें अव्हेरु ।**
**कीं सरितांतें सागरु । त्यजी केंवीं ।।**

अर्जुन मोहात जरी अडकला असला, तरीही तो बोलतो मात्र खूप छान आहे. केवळ मोह हीच एक अडचण त्याच्या समोर नाही तर कोणापुढे बोलतो आहे ही पण एक अडचण त्याच्या समोर आहे. कारण श्रीकृष्ण परमात्म्या सारख्या जगदीश्वरासमोर बोलायचे म्हणजे साधी गोष्ट नाही. हे सर्व सत्य असले तरी अर्जुनाचे एक-एक वाक्य मानवी जीवनाला एक नवी दिशा देऊन जाण्यासारखे आहेत. माऊलींची हीच तर खुबी आहे. प्रत्येक ओवीतून मानवी जीवनाला दृष्टांत, सिध्दांत ते देत आहेत. अर्जुन मोहग्रस्त झाला आहे हे त्यालाही मान्य आहे. मोहग्रस्त होण्यामुळे त्याला चांगले-वाईट, हित-अहित काही समजेनासे झाले आहे, हे तो मान्य करतो आहे. आपणाला या गंभीर व द्विधा परिस्थितीत काही समजत नसल्याने श्रीकृष्ण परमात्म्यांनी मार्गदर्शन



करुन योग्य तो मार्ग दाखवावा अशी प्रांजळ ईच्छा तो कृष्णापुढे व्यक्त करीत आहे. प्रसंगानुरुप आपणालाही अशी प्रांजळ इच्छा व्यक्त करता आली पाहिजे.

माणूस अडचणीत सापडला किंवा मोहग्रस्त झाला तरी दुस-याला मार्ग विचारण्यात त्याला कमीपणा वाटतो. माझा मार्ग मी शोधेन ही मनोवृत्ती घातक ठरते. पहिली गोष्ट तर ही आहे की, आपण मोहग्रस्त झालो आहोत, आपणाला दुस-याच्या मार्गदर्शनाची गरज आहे हेच अनेकजण मान्य करीत नाहीत. त्यामुळे मार्गदर्शन घेण्याचा प्रश्नच त्यांच्यासमोर निर्माण होत नाही. त्यामानाने अर्जुनाला मानले पाहिजे. कारण तो स्वत:ला मार्गदर्शनाची गरज असल्याचे मान्य करतो आहे. द्विधा अवस्थेत मार्गदर्शन घेणे हा कमीपणा नसून ती एक चांगली बाब आहे. अर्जुन स्पष्ट म्हणतो आहे की, जैसा शिष्यांतें गुरु । सर्वथा नेणें अव्हेरु ।कीं सरितांतें सागरु । त्यजी केंवीं ।।. कर्तव्याच्या बाबतीत मी मोहग्रस्त झालो आहे. दुर्बलतेमुळे स्वाभाविक वृत्ती नष्ट होऊन मी भ्रमित झालो आहे. अशा अवस्थेत हितकारक काय ते मला सांग. यासाठी मी तुला शरण आलो आहे असेही तो श्रीकृष्णांना म्हणाला. कृष्णा तू माझा मार्गदर्शक, बंधू, पिता, आराध्यदेवता, संकटकाळी रक्षण करणारा आहेस. त्यामुळे तू माझ्याकडे दुर्लक्ष करुच शकत नाहीस असे हक्काने तो म्हणतो आहे. आपल्या परम शिष्यांचा त्याग सद्गुरु कधीच करु शकत नाहीत. सागराला कितीही नद्या मिळाल्या तरी सागर नद्यांना कधी दूर लोटीत नाही किंवा सागरात मिळण्यास प्रतिबंध करीत नाही. शिष्य आणि गुरुचे नाते हे नदी आणि सांगराच्या नात्या प्रमाणे असते. आपले हे नाते या प्रमाणेच आहे. त्यामुळे तू मला मार्गदर्शन करणाच आहेस व तुला हे मार्गदर्शन करावेच लागणार आहे असे अर्जुन म्हणाला. गुरुवर हक्क गाजविण्यासाठी आपणही गुरुच्या कसोटीत उतरुन सद्गुरुंचे मन आपल्या वर्तनातून जिंकले पाहिजे हा अर्थबोध येथे घ्यायला हरकत नाही, असे आम्हास वाटते. नि:स्वार्थ भावाने मार्गदर्शन करणारा मिळाला तर आपले भाग्य थोर समजायला हवे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# सोलापुरात राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक कौशल्यांचा महाकुंभ

## ‘बिग्सी’च्या वतीने ७ मार्चला टेक्नोक्रेस्ट २०२६ चे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

शहरातील नामांकित शैक्षणिक संस्था भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ‘‘टेक्नोक्रेस्ट २०२६’’ या भव्य राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ७ मार्च रोजी होणाऱ्या या महोत्सवासाठी ऑनलाइन आणि ऑफलाइन नोंदणी प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. अनिल देशमाने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कार्यक्रमाचे उद्घाटन ७ मार्च रोजी सकाळी १० वाजता कॉलेज कॅम्पसमध्ये होणार आहे. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मिळणार हक्काचे व्यासपीठ या महोत्सवाच्या माध्यमातून राज्यातील अभियांत्रिकी , पदविका तसेच विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांना त्यांचे तांत्रिक कौशल्य आणि नाविन्यपूर्ण कल्पना सादर करण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध राहणार आहे. या एक दिवसीय तांत्रिक कुंभात वैविध्यपूर्ण स्पर्धा होणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने या नॅशनल हॅकाथॉन, प्रोजेक्ट आयडिया कॉम्पिटिशन, रोबोटिक्स व ब्रिज मेकिंग, पेपर व पोस्टर प्रेझेंटेशन, क्विज कॉम्पिटिशन व रील मेकिंग, मॉडेल एक्झिबिशन असे या स्पर्धेच्या विषयाचे आयोजन करण्यात आले आहे

या महोत्सवात महाराष्ट्रसह कर्नाटक, तेलंगणा आणि देशातील विविध राज्यांमधून सुमारे १५०० विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विजेत्या स्पर्धकांसाठी एकूण १ लाख ५० हजार रुपयांची भरघोस रोख पारितोषिके आणि सन्मानचिन्हे देण्यात येणार आहेत. सहभागी होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला राष्ट्रीय स्तरावरील सहभागाचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.राज्यातील जास्तीत जास्त अभियांत्रिकी आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी या तांत्रिक महाकुंभात सहभागी होऊन आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करावे, असे आवाहन केले आहे.

या पत्रकार परिषदेस प्रा. विजय कोळ्कुरे, प्रा. अझरुद्दीन पेरमपल्ली, प्रा.अमित वडवेराव, प्रा.सौरभ देशमाने आदी उपस्थित होते.



## भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवापूर्वी कीर्तीस्तंभ परिसरात सर्व सुविधा पुरविणार : महापौर कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

जगाला अहिंसेचा मार्ग दाखविणारे भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवाच्या आदी आचार्य शांतीसागर चौकातील कीर्तीस्तंभ परिसरात सर्व सुविधा पुरवणार असल्याचे आश्वासन महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले.

या कीर्ती स्तंभाची महापौर हे पाहणी करणार असून जैन समाजातील पदाधिकाऱ्यांशी ते चर्चाही करणार आहेत. भारतीय जैन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी महापौर विनायक कोंड्याल यांना निवेदन दिले. त्यावेळी त्यांनी हे आश्वासन दिले. यावेळी भारतीय जैन संघटनेचे श्याम पाटील, अभिनंदन विभूते, देशभूषण व्हसाळे, णमोकार सामाजिक संस्थेचे माणिक उपाध्ये, कोमल पाचोरे, जैन कासार समाजाचे स्नेहा वनकुद्रे, हिराचंद कासार, विक्रांत बशेट्टी, महिला विभागाच्या माया पाटील, पंकजा पंडित, मंगल पांढरे, प्रशांत वर्धमाने, आस्ता रोटी बँकेचे आनंद तालीकोटी, विजय छंचुरे, सुहास छंचुरे उपस्थित होते.



## ए.जी. पाटील अभियांत्रिकीचे एनपीटीईएल परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

ए.जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विभागातील २०२५-२६ बॅचच्या विद्यार्थ्यांनी नॅशनल प्रोग्रॅम ऑन टेक्नॉलॉजी एन्हांस्ड लर्निंग या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत यश संपादन केले आहे. एकाच सत्रात विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश महाविद्यालयासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरले आहे.

या यशामागे विभागप्रमुख डॉ. आर. व्ही. दरेकर यांचे मार्गदर्शन लाभले असून, विभागातील प्राध्यापिका प्रा. आर. डी. मैत्री आणि प्रा. एस. एस. मेटगार यांनी ही परीक्षा सिल्व्हर एलिट ग्रेडमध्ये उत्तीर्ण होऊन विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. एनपीटीईएल समन्वयक प्रा. एम. एस. बिराजदार यांच्या यशस्वी नियोजनामुळे आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हे यश साध्य करणे शक्य झाले. संस्थेचे अध्यक्ष सिद्धेश्वर ए. पाटील, सचिव शिवानंद एस. पाटील, कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले आणि प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. पोतदार यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

# शहर विकास हेच सर्व नगरसेवकांचे प्रथम प्राधान्य

## महापौर विनायक कोंड्याल; उद्योगवर्धिनी, केतन वोरा मित्र परिवारातर्फे ५३ नगरसेवकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

प्रगतीसाठी सोलापूरकरांनी विश्वासाने सर्व नगरसेवकांना निवडून दिले आहे. सोलापूरकरांनी दिलेली शहर विकासाची जबाबदारी पूर्ण करण्याला सर्व नगरसेवकांचे प्राधान्य असेल, असे प्रतिपादन महापौर विनायक कोंड्याल यांनी केले. उद्योगवर्धिनी संस्था आणि केतन वोरा मित्र परिवारातर्फे ५३ नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.

उद्योगवर्धिनी संस्थेत झालेल्या या कार्यक्रमाच्या प्रसंगी व्यासपीठावर महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान, केतन वोरा, उद्योगवर्धिनी संस्थेचे मार्गदर्शक समिती सदस्य आनंद जोशी उपस्थित होते. याप्रसंगी नूतन नगरसेवकांचा शाल, पुस्तक, नॅपकिन बुके देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी माजी महापौर श्रीकांचना यन्नम, शिवसेनेचे गटनेते आणि जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, काँग्रेसचे गटनेते आणि शहराध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक वैभव हत्तुरे, उद्योगवर्धिनीच्या सचिवा मेधा राजोपाध्ये यांची प्रमुख उपस्थिती होती. वैष्णवी पवार आणि कांचन श्रीराम यांनी श्लोक सादरीकरण केले. ॲड. गीतांजली चौहान यांनी संस्था परिचय करून दिला. प्रा. उत्तरा बरडे-बचुटे यांनी सूत्रसंचालन तर केतन वोरा यांनी आभार मानले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : शुक्रवार,**
**दि. ६ मार्च २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - फाल्गुन कृ. द्वितीया**
**ऋतु - वसंत ।**
**नक्षत्र- हस्त (०९.२९)**
**योग - गंड, वृध्दि(०७.०५)**
**करण - बव (३०.३१)**
**राहू काल : शुक्रवार**

**शुक्रवार : दु. १.३० ते ३.००**
**दिनविशेष :**
**१९९८: गझल गायक जगजितसिंग यांना मध्य प्रदेश सरकारतर्फे लता मंगेशकर पुरस्कार जाहीर झाला.**
**१९९७: स्वाध्याय परिवाराचे संस्थापक पांडुरंगशास्त्री आठवले यांची टेंपलटन पुरस्कारासाठी निवड.**
**१९९२: मायकेल अँजेलो हा संगणक विषाणू पसरण्यास सुरवात झाली.**

# डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीपूर्वी विविध विकास कामे करावीत

### राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती पूर्वी विविध विकास कामे करावी. प्रभाग क्रमांक ५ मध्ये बाळे हद्दवाढ भागातील विविध ठिकाणी दुरुस्ती व विकास कामे करावी आदी मागण्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्याकडे केली.यावेळी गणेश पुजारी, भीमा मस्के, आशिष कदम उपस्थित होते.



महानगरपालिकेत मानधन व कंत्राटी पध्दतीवर कार्यरत असलेल्या संगणक, अवेक्षक, पाणीपुरवठा, मंडई, मलेरिया व इतर विभागातील कर्मचाऱ्यांना कायम करावे, लाड समितीच्या शिफारशीनुसार २ पेक्षा अधिक अपत्य असणाऱ्या सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती द्यावी आदी मागण्यांकडे त्यांनी लक्ष वेधले.

# स्थायी समितीचा नवा अध्याय : पारदर्शक निर्णय, विकासाला नवी दिशा देण्याची संधी

## सभापती पदाचा सन्मान अन् जबाबदारीची परीक्षा?

सोलापूर महापालिकेची स्थायी समिती ही केवळ एक समिती नसून महापालिकेच्या आर्थिक, धोरणात्मक आणि विकासात्मक निर्णयांची ‘केंद्रबिंदू’ मानली जाते.

महापालिकेच्या कामकाजात स्थायी समितीचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. अंदाजपत्रक मंजुरीपासून विविध विकासकामांच्या निविदा, खर्च मंजुरी, निधी वितरण, प्रशासकीय मान्यता अशा अनेक निर्णायक बाबी या समितीमार्फत पार पडतात. त्यामुळे या समितीचा सभापती म्हणजे शहराच्या विकासाच्या गतीला दिशा देणारा प्रमुख घटक ठरतो. निर्णयांची पारदर्शकता, आर्थिक शिस्त आणि विकासकामांची गुणवत्ता यावर त्याची छाप पडत असते.

सोलापूर शहरासमोर सध्या पायाभूत सुविधांचे प्रश्न, पाणीटंचाई, रस्त्यांची दुरवस्था, नालेसफाई, कचरा व्यवस्थापन आणि प्रभागनिहाय असमतोल विकास अशी अनेक आव्हाने उभी आहेत. अशा परिस्थितीत स्थायी समितीच्या सभापतींनी केवळ पक्षीय राजकारण न करता शहरहिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. बहुमताच्या बळावर निर्णय घेणे सोपे असते; पण ते निर्णय सर्वसमावेशक, अभ्यासपूर्ण आणि दीर्घकालीन परिणामांचा विचार करून घेतले गेले पाहिजेत.

अंदाजपत्रक हे केवळ आकड्यांचे गणित नसते तर ते शहराच्या भवितव्याचा आराखडा असतो. त्यामुळे निधींचे योग्य प्राधान्यक्रम ठरवणे, अनावश्यक खर्चांना आळा घालणे आणि प्रभागनिहाय विकासात समतोल राखणे ही स्थायी समितीची जबाबदारी आहे.

गेल्या काही वर्षांत विकासकामांबाबत पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या पार्श्वभूमीवर नव्या सभापतीकडून अपेक्षा आहे की निविदा प्रक्रिया, कामांची गुणवत्ता आणि वेळेवर पूर्णता याबाबत कठोर भूमिका घेतली जाईल. राजकीय दृष्ट्या ही निवड सत्ताधारी पक्षासाठी प्रतिष्ठेची असली तरी लोकशाहीच्या दृष्टीने विरोधकांची भूमिका देखील महत्त्वाची ठरते. स्थायी समितीमध्ये प्रभावी चर्चा, मुद्देसूद आक्षेप आणि रचनात्मक सूचनांमुळे निर्णय अधिक सक्षम होतात. त्यामुळे सभापतीने सर्व सदस्यांना समान संधी देत संवादाचा विचारमंच खुले ठेवणे गरजेचे आहे.

शहरातील करदाते नागरिक आज अधिक सजग झाले आहेत. त्यांना केवळ घोषणांची नव्हे तर प्रत्यक्ष परिणामांची अपेक्षा आहे. निधी कुठे खर्च होतो, कोणत्या प्रकल्पांना प्राधान्य दिले जाते, कामांची गुणवत्ता कशी आहे यावर नागरिक बारकाईने लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे स्थायी समितीचे नेतृत्व पारदर्शक आणि उत्तरदायी असणे ही काळाची गरज



आहे. सभापतींची निवड ही केवळ पदनिवड नाही तर ती सोलापूरच्या विकासदिशेची निवड आहे.

सोलापूर महापालिकेच्या स्थायी समिती




सभापतीपदी रंजीता चाकोते या यांची आज बिनविरोध निवड होत आहे. सोलापूर महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीच्या ४९ व्या सभापती पदी भाजपच्या रंजीता चाकोते यांची बिनविरोध निवड होत आहे. स्थायी समितीच्या सहाव्या महिला सभापतीपदाच्या मानकरी रंजीता चाकोते या ठरणार आहेत. तर महापालिकेच्या स्थापनेपासून आजपर्यंत भाजपचे पाच सभापती झाले असून सहाव्या सभापती पदी रंजीता चाकोते या विराजमान होणार आहेत.

स्थायी समिती सभापतीपदी आतापर्यंत एकूण ४८ जणांनी हे महत्त्वपूर्ण सांभाळले. सोलापूर महापालिकेत स्थायी समितीच्या पहिल्या सभापतीपदी एकनाथ तुळशीराम माने हे विराजमान झाले होते. एकूण ४८ सभापतींनी कामकाज पाहिले. यामध्ये आत्तापर्यंत एकूण ५ महिलांना सभापतीपदी संधी मिळाली होती. त्यानंतर आता सहाव्या महिला सभापती पदी भाजपच्या रंजीता चाकोते यांना मान मिळत आहे.सन २०१८ नंतर आठ वर्षांनी सोलापूर महापालिकेला स्थायी समितीचा चेअरमन लाभणार आहे.

सभापतीपद भूषविणाऱ्या व्यक्तीने पक्षनिष्ठेपेक्षा शहरनिष्ठा, राजकीय गणितांपेक्षा जनहित आणि तात्पुरत्या लोकप्रियतेपेक्षा दीर्घकालीन विकासाला प्राधान्य दिले तरच सोलापूरच्या नागरिकांचा विश्वास संपादन करता येईल. स्थायी समितीची ताकद केवळ अधिकारात नसून जबाबदारीत आहे आणि ही जबाबदारी सक्षम, पारदर्शक व दूरदृष्टी असलेल्या नेतृत्वानेच पेलता येईल... आपणास पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..!

# ‘दक्षिण’च्या १४ विकासकामांना हिरवा-कंदील!

### आ. सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नास यश

### बांधकाम मंत्री भोसले यांच्याशी केली चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील विविध प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी दक्षिण सोलापूरचे आमदार सुभाष देशमुख यांनी महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांची मंत्रालय येथे भेट घेऊन महत्त्वपूर्ण बैठक घेतली.



या बैठकीत मतदारसंघातील रस्ते, पूल तसेच इतर पायाभूत सुविधांशी संबंधित एकूण १४ महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीदरम्यान संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना बांधकाम मंत्री भोसले यांनी प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

बैठकीत राजूर (ता. द. सोलापूर) येथील पुलाचे काम तातडीने सुरू करण्याचा विषय प्राधान्याने मांडण्यात आला. तसेच पाकणी ते राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावरील निकृष्ट कामाची दुरुस्ती करणे, होटगी-आहेरवाडी-मद्रे-हत्तूर रस्ता एमएसआरडीसीमध्ये समाविष्ट करणे आणि सोलापूर-अक्कलकोट-दुधनी-गाणगापूर (दुधनी बायपास) रस्ता विकसित करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. याशिवाय सिमेंट कंपनीसमोरील रस्त्यावर उड्डाणपुलाचे बांधकाम, रस्त्याच्या दुतर्फा वृक्षलागवड, शिरवळ-जेऊर रस्त्यावरील धुबधुबी तलावावर पूल उभारणे, मंद्रुप येथील मंजूर ट्रामा केअर सेंटरचे बांधकाम पूर्ण करणे आणि मंद्रुप येथे शासकीय विश्रामगृहास मंजुरी देणे या मुद्द्यांवरही विचारविनिमय करण्यात आला.

हिरज रेशीम पार्कच्या सुधारित अंदाजपत्रकास मंजुरी देणे, केंद्रीय मार्ग निधीतील मंजूर कामांची अंदाजपत्रके तात्काळ तयार करून निविदा प्रक्रिया राबविणे, भंडारकवठे सबस्टेशन समोरील रस्त्यासाठी प्रलंबित भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करणे, २५१५ व सामाजिक न्याय विभागांतर्गत तसेच अर्थसंकल्पीय योजनांतील मुदत संपलेली पुलांची कामे मार्गी लावणे आणि नाबार्ड अंतर्गत प्रस्तावित विकासकामांना मंजुरी देणे या विषयांवरही सविस्तर चर्चा झाली.

बैठकीदरम्यान संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. दक्षिण सोलापूर मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी शासनस्तरावर सकारात्मक निर्णय घेतले जातील, असा विश्वास आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केला.




## मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये मराठी राजभाषा गौरव दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ मार्च-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे मराठ राजभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान मुख्याध्यापक रमेश दिंडोरे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अण्णाराया तुप्पद उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन व कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी दत्तात्रय अगरखेड यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक सुकेशन गंगोंडा यांनी केले. सूत्रसंचालन दत्तात्रय अगरखेड यांनी केले तर आभार संतोष हिरेमठ यांनी मानले. यावेळी ग्रंथपाल प्रकाश कुंभार, बसवराज कोरे, भारत राऊत, गंगाराम घोडके, अनिलकुमार गावडे, बाबूराव कलशेट्टी, महेश चिवरे, परमेश्वर चांदोडे, अनिता हौदे, प्रतिक्षा बिडवे, अमरनाथ कदारे, संतोष स्वामी उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### गौडगाव हायस्कूलमधील गुणवंत शिक्षकांचा संस्थेच्यावतीने सत्कार

**बार्शी दि.५ मार्च-**

तालुक्यातील गौडगाव येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मल्टीपर्पज हायस्कूल गौडगाव या प्रशालेतील मार्गदर्शक शिक्षक संदीप चव्हाण व अभिजीत कापसे यांच्या विशेष काम गिरीबद्दल त्यांचा सन्मान संस्थेच्यावतीने करण्यात आला. (छचचड) या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये ६३ विद्यार्थ्यांपैकी ५४ विद्यार्थी चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले, यापैकी किमान दहा ते बारा विद्यार्थी वर्षाला १२,००० रुपये शिष्यवृत्ती घेण्यास पात्र ठरतील. तसेच तालुक्यात सर्वोच्च १४६ गुण मिळवणारी साक्षी शिंदे या शाळेची विद्यार्थ्यांनी ठरली. या विशेष कामगिरीमुळे संस्थेचे अध्यक्ष विनायक (बप्पा) गरड, सचिव पंडितराव लोहोकरे, सहसचिव अरुण भड, खजिनदार मदनलाल खटोड, संचालक जीवन लोहोकरे, डॉ. संतोष भड, वसंत काकडे यांच्यावतीने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य सुरज काकडे, पंचायत समिती सदस्य तथा क्रीडाशिक्षक संजय भड, मुकुंद पाटील, रणजीत गरड आदी शिक्षक उपस्थित होते.

### महिलेचा विनयभंग, मारहाण करत गळ्यातील मंगळसूत्र पळवले, दोघांवर गुन्हा दाखल


**बार्शी दि.५ मार्च-**

तालुक्यातील बावी (आ) येथे एका विवाहित महिलेच्या घरात घुसून तिचा विनयभंग केल्याची आणि मारहाण करत गळ्यातील मंगळसूत्र हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरुन प्रशांत बाबासाहेब आगलावे आणि बाबासाहेब दत्तात्रय आगलावे (दोघेही रा. बावी (आ), ता. बार्शी) यांच्यावर बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांच्या घरासमोरच आरोपी आगलावे कुटुंब राहते. यापूर्वी कचरा टाकण्याच्या कारणावरुन त्यांची आरोपींच्या घरातील महिलेसोबत किरकोळ भांडणे झाली होती. दरम्यान, २५ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास फिर्यादी महिलेचे पती खत आणण्यासाठी बावी स्टँडवर गेले होते. घरात कोणीही नसून महिला एकटीच असल्याची संधी साधून सायंकाळी साडेपाचच्या सुमारास प्रशांत आगलावे आणि बाबासाहेब आगलावे हे त्यांच्या घरात घुसले. घरात घुसताच प्रशांत आगलावे याने कुऱ्हाडीच्या दांडक्याने महिलेला मारहाण करण्यास सुरुवात केली तर बाबासाहेब आगलावे याने महिलेचे केस धरुन तिला खाली वाकवले. याचवेळी प्रशांत याने महिलेला अयोग्य स्पर्श करुन तिचा विनयभंग केला. महिलेने आरडाओरडा करत विरोध केला असता, झालेल्या झटापटीत महिलेच्या अंगावरील कपडे फाटले आणि आरोपींनी तिच्या गळ्यातील मणी-मंगळसूत्र जबरदस्तीने काढून घेतले. जाताना आरोपींनी तुझ्या नवऱ्याला सांग, आमच्याविरुद्ध तक्रार देतो का? असे म्हणत पतीला जीवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच, प्रशांतने तू या वेळी वाचलीस, नंतर तुला बघून घेतो. तू जर माझ्या वाट्याला गेलीस तर तुझ्यावर बलात्कार करेन, अशी भयंकर धमकी देत तेथून पोबारा केला. यापूर्वीच्या किरकोळ वादाच्या पार्श्वभूमीवर आणि भीतीपोटी तक्रार देण्यास उशीर झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अखेर धाडस करत महिलेने ४ मार्च रोजी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात धाव घेत सविस्तर फिर्याद दिली. या तक्रारीवरुन पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### केंद्रीय मंत्री आठवलेंकडून सरतापेंचे अभिनंदन

**वेळापूर, दि.५ मार्च-**

जिल्हा परिषद निवडणुकीत वेळापूर गटातून नवनिर्वाचित सदस्या मिनाक्षी मिलिंद सरतापे यांच्या दणदणीत विजयानंतर रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी दूरध्वनीद्वारे अभिनंदन केले. प्रचंड मताधिक्याने मिळालेल्या विजयाबद्दल त्यांनी मनःपूर्वक शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी यशाच्या सदिच्छा व्यक्त केल्या. या अभिनंदनाच्या क्षणाने मिलिंद सरतापे व त्यांच्या कुटुंबीयांसाठी हा दिवस अत्यंत भावनिक व अभिमानाचा ठरला. हा विजय राष्ट्रवादी शरद पवार पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तसेच महाविकास आघाडीच्या एकत्रित नेतृत्वाखाली मिळालेल्या जनतेच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे त्यांनी सांगितले. माढा लोकसभेचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील आणि माळशिरस तालुक्याचे आमदार उत्तमराव जानकर यांच्या नेतृत्वाखाली व मित्रपक्षांच्या भक्कम पाठबळावर हा विजय साध्य झाल्याचे सरतापे यांनी नमूद केले. गेल्या दोन ते अडीच दशकांपासून रामदास आठवले आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वावर अढळ विश्वास ठेवून, शिव-फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारधारेवर आधारित रिपब्लिकन चळवळीतून सामाजिक कार्य करत असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला. हा विजय केवळ पदाचा नसून विचारांचा, संघर्षाचा आणि जनसेवेच्या निष्ठेचा आहे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अधिक ताकदीने व समर्पणाने काम करत राहण्याचा निर्धार, असा निर्धार सरतापे यांनी व्यक्त केला.




### माळशिरस येथे तुकाराम बीज उत्साहात साजरी

**माळशिरस, दि.५ मार्च-**

येथील मारुतीदेव व श्रीरामदेव मंदिरात तुकाराम बीज उत्साहात साजरी करण्यात आली. काल रात्री १० ते १२ यावेळेत मंदीरात जागर करण्यात आला, त्यानंतर आज सकाळी १० ते १२ या वेळेत ह .भ. प. संतोष महाराज ननवरे (दसुर) यांचे किर्तन झाले, त्यानंतर दुपारी १२ वाजता उपस्थित भावीकांनी गुलाल व फुले टाकुन तुकाराम बीज साजरी केली. तुकाराम बीजे निमित्त मंदीरात आर्कषक सजावट करण्यात आली होती. बीजे निमीत्त मंदीरात भावीकांनी गर्दी केली होती. **अशी आहे आख्यायिका :** श्री संत तुकाराम महाराज आळंदी वरून पंढरपूरला जाताना या मंदिरात त्यांनी रात्री किर्तन केले .किर्तन सुरु असताना सर्व श्रोते निघून गेले .तेव्हा तुकाराम महाराज मारुती कडे पाहून म्हणाले देवा तुम्ही झोपा.तेव्हापासून या मंदिरातील मारुतीची मूर्ती कललेली असून त्यास झोपाळू हनुमान म्हणतात.

# पंढरपूर नगरपालिकेची विशेष ‘अभय योजना’

### मालमत्ता करावरील शास्ती माफी लागू; मुख्याधिकारी महेश रोकडेंची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ मार्च -**

पंढरपूर नगरपालिकेने पंढरपूरकरांसाठी मालमत्ता करावरील शास्ती माफीसाठी विशेष 'अभय योजना लागू केल्याची माहिती पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.



या विशेष योजने संदर्भात माहिती देताना मुख्याधिकारी रोकडे यांनी सांगितले की, पंढरपूर नगरपरिषद क्षेत्रातील सर्व मिळकतधारकांसाठी ही एक महत्त्वाची बातमी आहे.

कारण जर तुमच्या मालमत्ता कराची शास्ती (दंडात्मक व्याज) थकली असेल, तर ती माफ करून घेण्याची हीच ती वेळ आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा अधिनियमानुसार, नगरपरिषदेने विशेष 'अभय योजना' लागू केली आहे. या विशेष योजनेसाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम मुदत १५ मार्च २०२६ असल्याचे देखील मुख्याधिकारी रोकडे यांनी सांगितले.

**असे आहे या विशेष योजनेचे स्वरूप :** या योजनेअंतर्गत, ज्या मिळकतधारकांची दि. १९ मे २०२५ पर्यंत शास्ती थकबाकी आहे, त्यांना ५०% शास्ती माफीचा लाभ घेता येईल.

**ही आहे महत्त्वाची अट :** लाभार्थ्यांना मालमत्ता कराची पूर्ण रक्कम आणि उरलेली ५०% शास्ती भरून विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल.

**आवश्यक कागदपत्रे :** आधार कार्डची छायाप्रत.सन २०२५-२६ च्या मालमत्ता कराच्या मागणी बिलाची छायाप्रत. ५०% शास्ती वगळून उर्वरित संपूर्ण कर भरल्याच्या पावतीची छायाप्रत आणि विहित नमुन्यातील अर्ज (जो नगरपरिषदेच्या कार्यालयात उपलब्ध आहे).

**योजनेसाठीचा कालावधी :** ही योजना फक्त आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता आणि एकदाच लागू आहे.

## वरवडे टोल नाक्याजवळील महामार्ग पोलिस कारवाईमुळे स्थानिक व्यवसायांवर परिणाम

▸▸तपासणीच्या भीतीने वाहनधारकांचा काढता पाय ▸▸छोटे व्यावसायिक आर्थिक संकटात?



**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.५ मार्च-**

सोलापूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील माढा तालुक्यातील वरवडे टोल नाक्याच्या दोन्ही बाजूंना महामार्ग पोलिसांकडून वाहनांची तपासणी केली जात असल्याचे दिसून येते. या कारवाईच्या भीतीपोटी अनेक वाहनचालक त्या परिसरात थांबणे टाळत असल्याची चर्चा व्यावसायिकांकडून व्यक्त होत आहे.

यामुळे परिसरातील हॉटेल, चहा कॅन्टीन, पान दुकाने तसेच अल्पोपहार विक्री करणाऱ्या छोट्या व्यावसायिकांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले. वाहनधारकांना खाण्या-पिण्याची सोय व्हावी तसेच स्थानिकांना रोजगार मिळावा या उद्देशाने अनेक सुशिक्षित बेरोजगारांनी या भागात विविध व्यवसाय सुरू केले आहेत. महामार्ग पोलिसांकडून वाहनांची तपासणी केली जाते,मात्र वाहनांची वर्दळ कमी झाल्याने काही व्यावसायिक अडचणीत सापडल्याची माहिती समोर येत आहे.

परजिल्हा, परराज्यातील पर्यटक, यात्री, भक्त, ओव्हरलोड वाहतूक यांना खास करून टार्गेट केले जाते. महामार्ग पोलिस कारवाईचे ठिकाण बदलत नसल्यामुळे नियोजन करत नसल्यामुळे व्यावसायिकांवर मोठे संकट ओढावले आहे. वाहन तपासणी दरम्यान काही वाहनधारकांना विलंब होत असल्याच्या तक्रारीही ऐकू येत असून, या बाबींकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी स्थानिक व्यावसायिकांकडून होत आहे. तपासणीची प्रक्रिया सुरळीत व नियोजनबद्ध पद्धतीने राबवली गेल्यास वाहनधारकांनाही सोय होईल आणि परिसरातील छोट्या व्यावसायिकांनाही दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## बार्शी तालुक्यात तरुणावर जीवघेणा हल्ला; सातजणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि.५ मार्च-**

तालुक्यातील ताडसौंदणे येथील गौरव गंगाधर शिंदे (वय २९) यांच्यावर लोखंडी गज व लाकडी काठ्यांनी हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी संबंधित सातजणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून प्रकरणाची पुढील चौकशी सुरु आहे.



गौरव शिंदे हे शेती व्यवसाय करत असून ताडसौंदणे, ता. बार्शी येथील रहिवासी आहेत. दि. २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास ते मांडेगावहून ताडसौंदणेकडे मोटारसायकलवरुन येत असताना मौजे बेलगाव शिवारातील पप्पू पाटील यांच्या शेताजवळ काही व्यक्तींनी त्यांना अडविल्याचे तक्रारीत नमूद आहे. सकाळी गावात झालेल्या बाळूमामाच्या पालखी सोहळ्यात धक्काबुक्की केल्याचा आरोप करत वाद घालत संबंधितांनी शिंदे यांच्यावर अचानक हल्ला केल्याचे म्हटले आहे. यामध्ये लोखंडी गजाने डोक्यावर प्रहार करण्यात आला, तर इतरांनी लाकडी काठ्यांनी हात, पाय व छातीवर मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच काहींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी केली आणि जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. जखमी अवस्थेत शिंदे यांना १०८ रुग्णवाहिकेद्वारे प्रथम ग्रामीण रुग्णालय, बार्शी येथे दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना धाराशिव येथील जिल्हा रुग्णालयात हलविण्याचा सल्ला देण्यात आला होता; मात्र गैरसोयीमुळे त्यांना बार्शी येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून सध्या त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. पूर्ण शुद्धीवर आल्यानंतर त्यांनी आपला जबाब नोंदविला असल्याचे समजते.

या प्रकरणी ऋषिकेश चौधरी, पुरुषोत्तम चौधरी, जयंत चौधरी, दत्तात्रय चौधरी, संतोष चौधरी, महादेव मांगडे, विठ्ठल सुतार या सात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), १८९, १९०, १९१(२), ३५२, ३५१(२), ११५(२) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम १३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

## डिजिटल पीक कर्जाचा लाभ घ्या : मॅनेजर मंगेश घोडके

### स्टेट बँक ऑफ इंडिया अक्कलकोट शाखेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि.५ मार्च**

केंद्र सरकारच्या डिजिटल पीक कर्ज योजना अंतर्गत महाराष्ट्रात पहिल्यांदा प्रायोगिक तत्वावर अक्कलकोट स्टेट बँक ऑफ इंडिया येथे डिजिटल पीक कर्ज योजना राबविली जात आहे.चार कागद पत्रांचा आधारावर फक्त वीस मिनिटात शेतकऱ्याना डिजिटल पीक कर्ज वाटप सुरू आहे. शेतकऱ्यांनी बँकेत न जाता घरात बसून डिजिटल पीक कर्जाच्या अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन मॅनेजर मंगेश घोडके यांनी केली आहे.

३ नोव्हेंबर २०२५ रोजी केंद्र सरकारने देशात पहिल्यांदा डिजिटल पीक कर्ज योजना सुरू केली असून महाराष्ट्रात पहिल्यांदा प्रायोगिक तत्वावर अक्कलकोट येथील स्टेट बँक ऑफ इंडिया येथे डिजिटल पीक कर्ज योजना सुरू केली आहे. शेतकऱ्या कडे फार्मर आयडी, डिजिटल ७/१२ उतारा, एकच मोबाईल क्रमांकवर आधार कार्ड व बँक लिंक असलेली मोबाईल आणि सिव्हिल स्कोअर ६५० वर असल्यास या चार कागदाच्या आधारावर फक्त वीस मिनिटात डिजिटल पीक कर्ज वाटप करण्यात येत आहे.या बाबत चक्क बँक कर्मचारी शेतकऱ्यांचा घरा घरापर्यंत जाऊन नोव्हेंबर या एका महिन्यात तब्बल अट्टाविस शेतकऱ्यांना सुमारे ४१ लाख रुपये डिजिटल पीक कर्ज वाटप करून बँकिंग क्षेत्रात आदर्श निर्माण केले आहे. नोव्हेंबर ते आजपर्यंत १ कोटी ४२ लाख रु.चे डिजिटल पीक कर्ज वाटप केली आहे.आता सोलापूर जिल्हा मध्ये सर्व बँक मध्ये डिजिटल कर्ज योजना सुरू करण्यात येणार आहे.

आज पर्यंत पीक कर्जासाठी शेतकऱ्यांना बँकेत अनेकवेळा चकरा मारूनही पीक कर्ज मिळत नव्हते. मात्र यंदा शेतकऱ्याना बँकेत न जाता डिजिटल पीक कर्ज डायरेक्ट शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.डिजिटल पीक कर्जासाठी गरजू शेतकऱ्यांनी बँकेचे क्षेत्राधिकारी अभय देवारे यांच्या मो. क्र. ८६००९४४३६९ वर संपर्क साधावी.

> अक्कलकोट शहर व ग्रामीण, बसलेगाव, बागेहल्ली, बोरगाव, सेवालालाल नगर असे बँकेचे शेती कर्जासाठी कार्यक्षेत्र आहे.या कार्यक्षेत्रात कृषी विषयक मध्ये आत्तापर्यंत २५ कोटी रु कर्ज वाटप केली असून चालू वर्षामध्ये साडेतीन कोटीचा उद्दिष्ट असताना प्रत्यक्षात ६ कोटी ५० लाखचे पीक कर्ज वाटप केले आहेत.
>
> **- मंगेश घोडके**
> मॅनेजर, स्टेट बँक ऑफ इंडिया अक्कलकोट



## जळोली चौक ते धाकटी वेस रस्त्याचे काँक्रिटीकरण करून पथदिवे बसवा

### अजितसिंह देशमुख मित्र परिवार व करकंब ग्रामस्थांतर्फे रणजीतसिंह शिंदे यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ५ मार्च-**

करकंब येथील जळोली चौक ते धाकटी वेस हा मुख्य रस्ता असून या रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्यावरून जेष्ठ नागरिक,महिला,शालेय विद्यार्थी, शेतमालाची वाहतूक करणारे शेतकरी,व्यापारी वाहनधारकांची नेहमीच वर्दळ असते. खराब रस्त्यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिक व वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.या रस्त्यावरूनच मोठ्या प्रमाणात आषाढी वारीसाठी येणारे लाखो वारकरी,पालख्यांना रात्रीच्या वेळी अंधारातून यावे,जावे लागत असल्या कारणाने येथे आधुनिक पद्धतीच्या पथदिव्यांची अतिशय गरज आहे.या रस्त्याचे काँक्रिटीकरण करून रस्त्याच्या दोन्ही बाजूस पथदिवे बसविण्यात यावेत यासाठी शासन दरबारी योग्य तो प्रयत्न करून भरीव निधीची तरतूद करण्यात यावी अशा प्रकारच्या मागण्यांचे निवेदन अजितसिंह देशमुख मित्रपरिवार व ग्रामस्थांच्या वतीने सोलापूर जिल्हा परिषद मा.सदस्य रणजीतसिंह बबनदादा शिंदे यांच्याकडे देण्यात आले.

या रस्त्यावरूनच संत निवृत्तीनाथ महाराज,संत मुक्ताबाई जळगाव, संत सोपान काका, संत एकनाथ महाराज, संत जनार्दन स्वामी महाराज अशा अनेक साधू संतांच्या पालख्या करकंब गावामधे प्रवेश करून मुक्कामी असतात.

या रस्त्याचा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हायस्कूल,कॉलेजचे विद्यार्थी, भारतीय स्टेट बँक, मुख्य व्यापारी पेठेत जाणारे नागरिक उंबरे, जळोली, सांगवी, बदलकोट या गावातील नागरिकही याच मार्गाचा वापर करतात. रस्ता दुरुस्ती करून पथदिवे बसवल्यास या मार्गावरून प्रवास करणाऱ्या सर्वांचाच प्रवास सुखकर होणार आहे.



## मंद्रूपच्या युवकांची विधायक कृती; धुळवडीला स्मशानभूमी स्वच्छता

### ‘रानवेध फाउंडेशन’ व ‘आम्ही मंद्रूपकर’ टीमचा उपक्रम; युवकांचे श्रमदान

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि.५ मार्च-**

मंद्रूप येथील युवकांनी धुळवडीच्या निमित्ताने हिंदू स्मशानभूमीची स्वच्छता करून समाजापुढे विधायक कार्याचा आदर्श ठेवला. ‘रानवेध फाउंडेशन’ व ‘आम्ही मंद्रूपकर’ उपक्रमाच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे.

मंगळवारी सकाळी ६.३० वाजता युवकांनी स्मशानभूमी परिसरात स्वच्छता मोहिमेला सुरुवात केली. काहींनी हातात खराटा घेऊन परिसर झाडला, तर काहींनी काटेरी झुडपे हटवून परिसर स्वच्छ केला. दहनशेडमधील राख झाडांच्या मुळाशी टाकून परिसरातील स्वच्छतेची कामे करण्यात आली. जमा झालेला कचरा व पालापाचोळा गोळा करून खत निर्मिती प्रकल्पाकडे पाठविण्यात आला. स्वच्छता मोहिमेत मुकेश खराडे यांनी शेतातून तुरीच्या काड्या आणून स्वतः खराटे तयार केले. विकास शिळ्ळे व जगन्नाथ खरात यांनी दहनशेडमधील राख झाडांभोवती टाकून स्वच्छता केली. सिद्धेश्वर नंदुरे व सचिन साठे यांनी दहनशेड परिसर साफ केला.

तसेच रवी केवटे यांनी अंत्यसंस्कारासाठी वापरलेल्या बांबूंना झाडांना आधार म्हणून वापरले. श्याम गोसावी, अक्षय झेंडेकर आणि नितीन खराडे यांनी कचरा व अनावश्यक वस्तू हटवून परिसर स्वच्छ केला. या मोहिमेत अवघ्या ८ वर्षांचा रितुल गोसावी व ११ वर्षांची तनुजा केवटे या चिमुकल्यांनीही खराटा हाती घेत स्वच्छतेत सहभाग नोंदवला. मंद्रूपच्या युवकांनी सुरू केलेल्या या उपक्रमातून इतर गावांतील युवक मंडळांनाही प्रेरणा मिळत असून काही गावांमध्येही स्मशानभूमी स्वच्छतेचे असे उपक्रम सुरू झाल्याचे सांगण्यात आले.

**ग्रामपंचायतीचे योगदान.**

गावातील युवकांनी स्मशानभूमीची स्वच्छता मोहिम सुरु केल्याचे समजातच माजी सभापती अप्पाराव कोरे, ग्रामसेवक नागेश जोडमोटे यांनी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना मदतीसाठी पाठविले. महिला सफाई कामगारांसह, लिपीक अमोल बाळगी, सतीश म्हेत्रे, सुधीर लोभे, वाहन चालक चांद शेख आदी ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता अभियानामध्ये सहभाग घेतला.

**यांनी घेतला पुढाकार..**

नितीन खराडे, मुकेश खराडे, सचिन साठे, श्याम गोसावी, रवी केवटे, जगन्नाथ खरात, पत्रकार विनोद कामतकर, रितूल गोसावी, तनुजा केवटे, ओंकार झेंडेकर



## वेळापूर म्हेत्रेमळा येथे संत तुकाराम महाराज बीज उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.५ मार्च-**

वेळापूर म्हेत्रे मळा येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी म्हेत्रे परिवाराच्या वतीने परंपरेने चालत आलेली २०७ वी संत तुकाराम महाराज बीज साजरी करण्यात आली. भजन कीर्तन झाल्यानंतर दुपारी बारा वाजता संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली.

यावेळी भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तुकाराम बीज सोहळ्याच्या कार्यक्रमाला पं.स. सदस्या विमलताई जानकर, जि.प. सदस्या मीनाक्षी सरतापे, वेळापूर सरपंच रजनिश बनसोडे, महादेव देवालय ट्रस्टचे अध्यक्ष अमृतराज माने-देशमुख, रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, सावता परिषद प्रदेश उपाध्यक्ष महादेव ताटे, माजी ग्रामपंचायत सदस्य काशीनाथ आडत, माजी सरपंच विश्वास वाघे, गोपाळ घाडगे, काकासाहेब जाधव, महादेव म्हेत्रे, मल्हारी शिंदे, शिवाजी मोहिते, सावता म्हेत्रे, शंकर आडत, भागवत गायकवाड, डॉ. धनंजय म्हेत्रे, शिवाजी सावंत, महादेव बनकर, उमेश भानवसे, ओंकार खराडे, प्रदिप सरवदे, ओंकार आडत, सचिन नाळे, सुर्यकांत मोहिते, रणजीत सरवदे, रायचंद खाडे, श्रीराम कुदळे, संतोष म्हेत्रे, गणेश म्हेत्रे, राहुल साठे, ज्ञानेश्वर सोनवने तसेच बाळासाहेब म्हेत्रे, माणिक म्हेत्रे, शिवाजी म्हेत्रे, श्रीरंग म्हेत्रे, महादेव म्हेत्रे, सुनील म्हेत्रे, विजय म्हेत्रे, स्वप्निल म्हेत्रे, स्वरूप म्हेत्रे, अमर म्हेत्रे, ओंकार म्हेत्रे, दीपक म्हेत्रे यांच्यासह महिला, पुरुष भाविक ग्रामस्थ उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विनय चौधरी यांचेकडून सहारा वृध्दाश्रमास ७५ हजारांची मदत

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.५ मार्च-**

गौडगांव (ता. बार्शी) येथील विना अनुदानित सहारा वृद्धाश्रमास सार्थक इंडिया लि., पुणे येथील कार्यकारी संचालक विनय चौधरी यांनी ७५ हजार रुपयांची देणगी दिली आहे.



देणगीमुळे अनेकांच्या आयुष्यात आशेचा किरण पेटवला. राहुल भड चालवत असलेल्या या वृद्धाश्रमातील प्रत्येक ज्येष्ठाच्या डोळ्यांत आज समाधान आहे. ही मदत केवळ अन्नधान्याची नव्हती; ती होती प्रेमाची, माणुसकीची आणि आपुलकीची. अशा कार्यातून समाजाला एक मोठा संदेश मिळतो. आपण दिलेलं थोडंसं, कोणाचं तरी आयुष्य बदलू शकतं.' आज गरज आहे ती अशाच संवेदनशील मनांची. जी दुसऱ्यांच्या वेदना समजून घेतील आणि मदतीचा हात पुढे करतील. कारण शेवटी, माणूस मोठा त्याच्या पदामुळे नसतो तर त्याच्या कर्तृत्वाने आणि हृदयाच्या मोठेपणामुळे असतो.



## महत्त्वाचे

### सांगली-परळी-सांगली रेल्वेस जवळा स्थानकावर थांबा द्या : अशोक कामटे संघटनेची मागणी

**सांगोला,दि.५ मार्च -**

रेल्वे क्र.११४११ व ११४१२ परळी-सांगली डेमो एक्सप्रेस रेल्वेस जवळा स्टेशनवर थांबा मिळावा या मागणीकरीता सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्या वतीने मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांना निवेदन देण्यात आले आहे. सांगली मधून परळीकडे जाण्याकरीता रात्रीची शेवटची ही ट्रेन आहे. सद्य परिस्थितीत प्रवाशांना एकतर जत रोड किंवा सांगोला येथे उतरून परत उलट दिशेने खाजगी वाहनाने रात्री-अपरात्री प्रवास करावा लागत आहे. सदरच्या उलट प्रवासामुळे या परिसरातील प्रवासी त्रस्त आहेत. जवळा स्टेशनला अधिकृत थांबा दिल्यानंतर मानेगाव, निजामपूर, डोंगरगाव, सोनंद, जवळा, बुरंगेवाडी, भोपसेवाडी, आगलावेवाडी, तरंगेवाडी, हून्नूर, भोसे, घेरडी या मोठ्या गावातील लोकांची दररोज सोय होणार आहे. व रेल्वेचेही पर्यायाने उत्पन्न वाढणार आहे. जवळा स्टेशन वरून बाकी गावामध्ये जाण्यासाठी वाहतूक व्यवस्था आहे. तरी दोन्ही साईड वरून जवळा स्टेशन थांबा तात्काळ मंजूर होणे गरजेचे आहे असे निवेदनात नमूद करण्यात आले. या निवेदनाच्या प्रती खा.धैर्यशील मोहिते पाटील, खा.विशाल पाटील, विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुणे, सोलापूर, नांदेड, अध्यक्ष प्रवासी सेवा संघ, सोलापूर, महाव्यवस्थापक सिकंदराबाद विभाग यांनाही देण्यात आले आहेत.






### अक्कलकोट शहरात अतिक्रमणावर हातोडा; एप्रिल अखेर शहर अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्धार

**अक्कलकोट दि ४ मार्च**

अक्कलकोट शहरातील नाल्यावरील ५५ अतिक्रमणे काढली. मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्याची मोहिम चालू आहे. एप्रिलअखेर सर्व अतिक्रमणे काढणार असल्याचे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी सांगितले. कारंजा चौक, बसस्थानक परिसर समाधी मठ परिसरातील अतिक्रमण काढणार आहोत . एप्रिल अखेर टप्प्या टप्प्याने शहरातील सर्व अतिक्रमणे काढणार आहोत. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार शहरातील काही अतिक्रमण काढण्याला स्थगिती आहे. २६ मार्च २०२६ नंतर शहरातील काही मोठे अतिक्रमण काढण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यानंतर वटवृक्ष मंदिर परिसरातील काही मोठे अतिक्रमण काढण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रहदारीस अडथळा असलेली अतिक्रमण नागरिकांनी व्यापाऱ्यानी स्वतःहुन काढावे व नुकसान टाळावे असे आवाहन मुख्याधिकारी डाके यांनी केले आहे. पोलीस निरिक्षक दिपक भिताडे यांच्या नेतृवात तगडा पोलीस बंदोबस्त नपाचे कर्मचारी फौज फाट्यासह मोठी अतिक्रमण विरोधी मोहिम राबविली जात आहे. याचा धसका अनेकांना बसला आहे. अतिक्रमण काढताना सूचना द्या काढण्यासाठी वेळही द्या नुकसान टाळा अशी मागणी व्यापारी वर्गानी केली आहे. दरम्यान मोहिमेचे स्वागत करून शहरातील सर्व अतिक्रमण काढण्याची मागणी वसंत देडे यांनी केली आहे.




### मंगळवेढ्यात पडक्या इमारतींमुळे समस्या; कारवाईसाठी दिले निवेदन

**मंगळवेढा दि.४ मार्च**

मंगळवेढा शहरात अंदाजे २०० पडक्या इमारती अस्तित्वात आहेत. या इमारतींमुळे शहरवासीयांना मोठ्या प्रमाणात समस्या भेडसावत आहेत. पडक्या इमारतींमध्ये कुत्र्यांना सुरक्षित आश्रयस्थान मिळाल्याने त्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. या कुत्र्यांनी आतापर्यंत अनेक नागरिकांचा चावा घेतला असून, विशेषतः लहान मुले आणि वृद्ध नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. याशिवाय या इमारतीत घुशी , उंदीर, डास आणि सापांची वाढ झाली आहे. डेंग्यू, मलेरिया सारख्या आजारांचा धोका वाढला आहे. नगरपालिकेच्या वारंवारच्या स्वच्छता मोहिमा अपयशी ठरत आहेत, कारण पडक्या इमारती असल्यास कचरा पुन्हा साठतो. आरोग्य धोका, पर्यावरणीय प्रदूषण आणि सुरक्षा खतरे वाढले आहेत. मंगळवेढा नगरपरिषदेने तातडीने कारवाई करावी. पडक्या इमारतींच्या मालकांना १५ दिवसांची नोटीस बजावून परिसर स्वच्छ करणे आणि मुरुमकरण करण्याचे आदेश द्यावेत. न केल्यास नगरपालिकेने स्वतः स्वच्छता करून खर्च मालकांच्या मालमत्ता उताऱ्यावर चढवावा. यामुळे कायमस्वरूपी उपाययोजना होईल.या संदर्भात 'एक दिवस गावासाठी' मोहिमेअंतर्गत आज नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी प्रफुल्ल सोमदळे, सतीश दत्तू उपस्थित होते. शहरवासीयांनी एकत्र येऊन या समस्येवर तोडगा काढावा, असे आवाहन करण्यात आले.

## रंगपंचमीनिमित्त आधुनिक, फॅन्सी पिचकाऱ्या बाजारात दाखल

### पंढरपुरात खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी... रेडिमेड रंग आधीच भरलेला असतो

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ मार्च -**

रंगाचा उत्सव म्हणजे रंगपंचमी. अंगाची लाही लाही करणाऱ्या कडक उन्हाळ्यात गारगार पाण्याने रंगपंचमी खेळण्याचा आनंद काही औरच असतो. रंगपंचमी हा एकमेव सण असा आहे, जो बाल गोपाळांपासून मोठ्यांसह सर्वांना आवडतो. या सणा मध्ये बाल गोपाळांचे आकर्षण म्हणजे पिचकारी हेच असते. बदलत्या काळानुसार आता बाजारपेठेत पिचकारींचे विविध प्रकारचे फॅन्सी प्रकार दाखल झाले आहेत.



आजच्या एय.आय. तसेच इंटरनेट आणि संगणकीय युगात विविध आधुनिक पिचकाऱ्यांचे फॅन्सी प्रकारात येत आहेत. वॉटर टैंक, वॉटरगन, पुष्पा कुऱ्हाड हातोडा, गॅस सिलिंडर असे नवीन व्हरायटी दिसून येत आहेत. वॉटर टँक या प्रकारात रेडिमेड रंग आधीच भरलेला असतो. पाठीवर वॉटर टैंक बांधून रंग उडविण्याचा आनंद घेतला जातो. बाजारात याची किमत ३०० पासून एक हजार रुपयांपर्यंत आहे. वॉटर गनचे अगदी पाचशे रुपयां पासून ते दोन हजार, रुपये असे दर आहेत.

दरम्यान रंगपंचमी सणानिमित्त बाजारात दाखल झालेल्या पिचकाऱ्या व रंग, पुष्पा कुऱ्हाड, ३०० ते एक हजार या किमतीम ध्ये उपलब्ध आहेत. गाजलेल्या 'पुष्पा' चित्रपटात अल्लू अर्जुन याने जी कुऱ्हाड वापरली आहे, त्या आकाराची पिचकारी विक्रीसाठी उपलब्ध आहे. गॅस सिलिंडर एक हजार ते दोन हजार रुपयाच्या रेंजमध्ये आहे. सिलिंडर आकाराची मोठी पिचकारी असते. ही पिचकारी दोन लिटर, चार लिटर तसेच सहा लिटर एवढ्या रंगाची क्षमता असलेली आहे. या व्यतिरिक्त नेहमीच्या पारंपरिक पिचकाऱ्या उपलब्ध आहेत. मुंबई, पुणे, अहमदाबाद, हैद्राबाद, छत्रपती संभाजीनगर येथून मोठ्या प्रमाणात माल आला आहे.

#### बाजारात वाढू लागली गर्दी

रंगपंचमी हा सण आनंदाचा असतो काळानुसार सणातसुध्दा मोठा बदल झालेला दिसून येतो. बाजारातील मागणीनुसार आम्हाला रंगपंचमीच्या साहित्याची मागणी करावी लागते. लहान मुलांना आवडणाऱ्या आकाराच्या व विविध रंगामध्ये पिचकाऱ्या व रंग उपलब्ध आहेत. बुधवार पासूनच बाजारात गर्दी वाढत असून रंग तसेच इतर साहित्य घेण्यासाठी गर्दी होत आहे अशी माहिती विक्रेते संजय पांडुरंग होनराव यांनी दिली.

#### शहरातील या भागात आहेत दुकाने

पंढरपूर येथील लोणार गल्ली, भादुलेचौक, अर्बन बैंक चौक, स्टेशन रोड, नवी पेठ, झेंडा चौक, महावीर नगर या मागात पिचकाऱ्याचे दुकाने सजली आहेत.पिस्तुल, रायफल, एअर गन, ड्रॅगन आकारातील आकर्षक पिचकाऱ्या ग्राहकांची प्रतीक्षा करीत आहेत, या सीझनमध्ये अंदाजे दहा ते पंधरा लाख रुपयांची उलाढाल होईल, असा अंदाज होलसेल व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## सोलापूरच्या शेतकऱ्यांना पीक विम्याची प्रतीक्षा

### आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विधानमंडळात मांडला मुद्दा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.५ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पीक विमा भरूनही अनेकांना अद्याप नुकसानभरपाई मिळत नसल्याचा गंभीर प्रश्न आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी विधानमंडळात उपस्थित करून पीक विम्याच्या नुकसानभरपाईस होत असलेल्या विलंबावर लक्ष वेधले.

खरीप हंगाम २०२५ मध्ये सोलापूर जिल्ह्यात सुमारे ३ लाख ३२ हजार ३११ शेतकऱ्यांनी सुमारे २ लाख ५१ हजार हेक्टर क्षेत्रासाठी पीक विमा घेतला आहे. मात्र अतिवृष्टी, पूर, पाणी साचणे तसेच पिके वाहून जाणे यामुळे नुकसान झालेल्या अनेक शेतकऱ्यांना अद्याप नुकसानभरपाई मिळाली नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून होत असल्याचे आमदार मोहिते पाटील यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. यावर उत्तर देताना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, प्रधानमंत्री पीक विमा योजनेतील निकषांनुसार पीक कापणी प्रयोगावर आधारित उत्पादन घट लक्षात घेऊन नुकसानभरपाई दिली जाते. सोलापूर जिल्ह्यात खरीप २०२५ हंगामात ३.३२ लाख विमा अर्जदार शेतकऱ्यांनी सुमारे २.५१ लाख हेक्टर क्षेत्रासाठी विमा घेतला असून केंद्र व राज्य शासनाकडून सुमारे १५१.१७ कोटी रुपये विमा हप्ता भारतीय कृषी विमा कंपनीला उपलब्ध करून देण्यात आला आहे. सध्या योजनेंतर्गत पीक उत्पादनाची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरू असून उत्पादनातील घट लक्षात घेऊन नुकसानभरपाई दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



दरम्यान,सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रत्यक्ष झालेल्या नुकसानाच्या आधारे न्याय मिळावा आणि विमा कंपन्यांनी जबाबदारीने नुकसानभरपाई द्यावी यासाठी शासनाने ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी सभागृहात केली.

## कासेगावच्या विकासकामांना गती

### सीईओ जंगम यांनी केली पाहणी

### शाळेच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवासाठी मुख्यमंत्री येणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.४ मार्च**

कासेगाव (ता.द. सोलापूर) ग्रामपंचायतीत सुरू असलेल्या विविध विकासकामांच्या पाहणीसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी भेट देत पाहणी दिली. यावेळी जि.प. शाळेच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवासाठी मुख्यमंत्री फडणवीसांना निमंत्रण दिल्याची माहिती सरपंच यशपाल वाडकर यांनी दिली.



मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांच्या अनुषंगाने श्री. जंगम यांनी पाहणी केली. सरपंच वाडकर यांच्या नेतृत्वाखाली गावात विविध विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये स्वच्छता मोहीम, वृक्ष लागवड, तसेच ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय कामकाजाची अंमलबजावणी यांचा समावेश आहे. सीईओ जंगम यांनी ग्राम पंचायतीच्या दप्तरांची तपासणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या.

**सर्वांगीण विकासाकडे वाटचाल**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून कासेगाव ग्रामपंचायत विकासाच्या दिशेने भक्कम पावले टाकत आहे. प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून गावाचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

#### १५० वर्षांच्या शाळेचा गौरव सोहळा

कासेगाव जिल्हा परिषद शाळेला यंदा १५० वर्षे पूर्ण होत आहेत. या ऐतिहासिक कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे निमंत्रण देण्यात आले असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याची माहिती सरपंच वाडकर यांनी दिली. सीईओ जंगम यांनी सरपंच व ग्रामपंचायतीच्या सदस्यांसह शाळेच्या इमारतीची पाहणी केली. तसेच शिक्षकांकडून शाळेतील शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांची माहिती जाणून घेतली.

## वाळू माफियांचा भरारी पथकावर हल्ला; सांगोला तालुक्यातील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.४ मार्च -**

अवैध वाळू उपसा करून वाहतूक करताना पकडलेले सहा टायर टिपर पुढील कारवाईसाठी तहसिल कार्यालय, सांगोला येथे घेवून जात असताना नेमलेल्या भरारी पथकावर हल्ला करण्यात आल्याची घटना बुधवार दि.४ मार्च रोजी पहाटे पावणे चार वाजता सांगोला तालुक्यातील कडलास येथे घडली.

याबाबत अधिक माहिती अशी, सांगोला तालुक्यात विनापरवाना अवैधरित्या वाळू वाहतूकीवर कारवाई करण्यासाठी भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे. या पथकातील सांगोला मंडल अधिकारी महेश जाधव, ग्राम महसूल अधिकारी गौरव कुंभार, वाडेगाव महसूल सेवक समाधान सुर्यगंध, मेडशिंगी महसूल सेवक सुनिल गोडसे, सरकारी वाहन चालक दिलीप काळे, खाजगी वाहन चालक रणजित देशमुख यांनी बुधवार दि.४ मार्च रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास कडलास ते जवळा रोडवरील म्हसोबा मंदिरा जवळ एक विना नंबरचा पांढ-या रंगाचा सहा टायर टिपर अवैधरित्या शासनाची कोणतीही परवानगी न घेता कोरडा नदीपात्रातुन चोरी करून घेवून जात असताना पकडला. त्यावरील वाहन चालक अंधाराचा फायदा घेवून पळून गेला. सदर टिपर पुढील कारवाईसाठी तहसिल कार्यालय, सांगोला येथे घेवून जात असताना कडलास येथे अतूल गावडे व पप्पू बिचूकले (रा. दोघे जवळा, ता.सांगोला) यांनी त्यांचेकडील विना नंबरची क्रेटा वाहन आडवी लावून पथकाच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न करून, शिवीगाळी व दमदाटी करून तेथे पडलेले दगड उचलून सरकारी वाहन (एम एच.४५ एएल.८१७१) व खाजगी वाहन (एम एच.४५ एयु.६७३१) यावर फेकून मारून दोन्ही वाहनाचे काचा फोडल्या. तसेच मंडल अधिकारी महेश जाधव यांना मारहाण करत सुनिल गोडसे यांना दगडाने मारहाण करून डावे हाताच्या अंगठ्याचे नख तोडून गंभीर जखमी केले. याबाबत सांगोला मंडल अधिकारी महेश जाधव यांनी अतूल गावडे, पप्पू बिचूकले (रा.दोघे जवळा, ता.सांगोला) व टिपर वाहनावरील अज्ञात चालक यांच्याविरुद्ध सांगोला पोलीस ठाणे येथे कायदेशीर तक्रार दिली असून तपास सुरु आहे.

#### महसूल कर्मचाऱ्यांचे बेमुदत काम बंद आंदोलन

विना परवाना अवैध्यरित्या वाळू वाहतुकीवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या भरारी पथकावर भ्याड हल्ला करत शासकीय वाहनाची तोडफोड केल्याच्या निषेधार्थ महसूल कर्मचारी संघटना शाखा-सांगोला यांच्यावतीने निषेध करत आरोपींवर तात्काळ कारवाई करावी तसेच कारवाई होईपर्यंत बेमुदत काम बंद आंदोलन सुरु केले आहे, असे निवेदन सांगोला तहसीलदार बाळूताई भागवत यांना संघटनेच्या वतीने देण्यात आले आहे.

## पिलीव परीसरात पाचशे रुपयाच्या बनावट नोटा

**पिलीव, दि.४ मार्च-**

पिलीव परिसरात काही दिवसांपासून पाचशे रुपयाच्या बनावट नोटा व्यवहारात जास्त प्रमाणात आढळून येत आहेत. यामुळे सर्व सामान्यांची मोठी फसवणूक होत आहे. नोटेवरील महात्मा गांधीजींच्या चित्रांमध्ये सुद्धा बदल आहे.सर्वसामान्य नागरिकांना खरी नोट व बनावट नोट यामधील फरक सहजासहजी ओळखूच येत नाही. पिलीव परीसरात बोगस नोटांबाबत नागरिकांतून चर्चा असून पोलिसांनी लक्ष घालण्याची मागणी होत आहेत.

## मुरघास योजनेचा 10 लाखांचा निधी पोल्ट्री दुरुस्तीसाठी वर्ग

### पशुसंवर्धन विभागाच्या सचिवांची नाराजी दूर करण्यासाठी पोल्ट्री दुरूस्ती प्रस्ताव

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि.५ मार्च -**

जिल्हा परिषदेने पशुपालकांना चारा साठवण्यासाठी सुरू केलेल्या मुरघास योजनेला पशुपालकांकडून अल्प प्रतिसाद मिळत असल्यामुळे पशुसंवर्धन विभागाने मुरघास बागेसाठी तरतूद केलेला दहा लाख रुपये कुक्कुटपालन दुरुस्तीसाठी खर्ची टाकण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. पशूसंवर्धन विभागाकडून या योजनेचा प्रचार व प्रसार न झाल्यामुळे अल्प प्रतिसाद आहे. त्यामुळे या योजनेचा निधी अन्यत्र वर्ग करण्यात येत असल्यामुळे पशुपालकांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

ग्रामीण भागातील पशुपालकांसाठी मुरघास करण्यासाठी सहा बॅगा देण्यात येतात. त्यासाठी तीन हजार रुपये अनुदान देण्यात येते. मात्र यासाठी पशुपालकांना ऑनलाइन अर्ज करून लाभ घ्यावे लागते. तीन हजार रुपयांच्या लाभासाठी पाचशे रुपये खर्च येत असल्यामुळे पशुपालकांचा मुरघास योजनेला प्रतिसाद मिळताना दिसून येत नाही. त्यामुळे मार्चअखेर मुरघास योजनेचे रक्कम खर्ची टाकण्यासाठी शासकीय पोल्ट्री दुरुस्ती करण्याचा ठराव पशूसंवर्धन विभागाच्या बैठकीत करण्यात आला आहे. ग्रामीण भागामध्ये पावसाळा व हिवाळ्यात मोठ्या प्रमाणात हिरवा चारा असतो. त्याचे मुरघास करून तो उन्हाळ्यात वापरण्यासाठी जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाकडून मुरघास बॅग योजना सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण भागात जिल्हा परिषद पशूवैद्यकीय अधिकार्यांकडून या योजनेचा म्हणावे तसे प्रचार व प्रसार झाला नाही. त्यामुळे अनेक पशुपालकांना मुरघास योजनाच माहीत नसल्याचे सांगण्यात येते. शिवाय लाभ रक्कमही कमी असल्यामुळे पशुपालकांकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे.

#### मुरघास योजना पशूपालकांच्या हक्काची

जिल्हा परिषदेकडून पशूपालकांना चारा टंचाई जाणवू नये, म्हणून मुरघास योजना सुरू करण्यात आली आहे. पशूसंवर्धन विभागाने या योजनेच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न करावे. या योजनेचे अखर्चित निधी दुसऱ्या योजनेकडे वर्ग करू देणार नाही.

**- सोनाली कडते,**
**जिल्हा परिषद सदस्या, मंद्रूप**

#### लाभार्थ्यांच्या अल्प प्रतिसादामुळे निधी वर्ग

जिल्हा परिषदेच्या मुरघास योजनेला पशूपालकांकडून अल्प प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे निधी अखर्चित आहे. शिवाय पशूसंवर्धन विभागाच्या सचिवांनीही पोल्ट्री दुरूस्ती करण्याच्या सूचना केले आहेत. त्यामुळे मुरघास योजनेतील दहा लाख निधी पोल्ट्री विभागाकडे वर्ग करण्याचे ठरले असून लवकरच त्याची कार्यवाही होणार आहे.

**- डॉ. अनिल तांबे, उपायुक्त,**
**पशूसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सोलापूर**

#### डेडस्टॉकवर निधी खर्च

कुकुटपालन विभाग राज्य सरकारकडे वर्ग झाल्यामुळे शासनाकडून निधी येणे बंद झाले आहे. पशूपालकांच्या हक्काचे दहा लाख निधी सोलापूरात बंद अवस्थेतील डेडस्टॉक असणार्या पोल्ट्रीसाठी खर्च करणे नियमबाह्य असल्याचे सांगण्यात येते. मुळातच पोल्ट्री दुरूस्तीसाठी कोट्यावधी रूपयांची गरज असताना दहा लाख रूपये खर्च करून काय साध्य होणार आहे. त्यामुळे हा निधी मार्चअखेरला पोल्ट्री दुरूस्तीसाठी कि ठेकेदार जोपासण्यासाठी खर्ची टाकण्यात येत आहे, याविषयी उलटसुलट चर्चा सुरू आहे.